

सुवर्ण महोत्सव

शेतकऱ्यांच्या विश्वासाचं अर्धशतक

१९७६-२०२६

बियाणं अनेक अरसल मात्र एक

महामंडळाचं महाबीज

# ४८ वा
# वार्षिक अहवाल
# २०२४-२५

तुमच्या विश्वासाचं बियाणं

महाबीज®

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला

# सातत्य गुणवत्तेचे, व्रत बळीराजाच्या सेवेचे



## मका

फुले केसरी,
उदय



## सोयाबीन

एमएयुएस - ६१२
एमएयुएस - ७२५
जेएस - २०-२९
पीडीकेव्ही अंबा, एमएसीएस - १४६०



## ज्वार

फुले यशोमती,
परभणी शक्ति,
परभणी सुपर मोती



## मुंग

उत्कर्ष, फुले चेतक,
शिखा



## बाजरी

महाबीज - १००५,
धनशक्ति



## हरभरा

फुले विश्वराज,
पुसा पार्वती,
बीजीएम - १०२१६



## कपाशी

महाबीज - १२४
(BG-II)



## तुर

पि.डी.के.व्ही अश्लेशा
फुले तृप्ती, गोदावरी

# ४८ वा वार्षिक अहवाल

# २०२४ – २०२५

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| ०१. | आमसभेची सुचना | ०३ |
| ०२. | संचालक मंडळाचा अहवाल | ०८ |
| ०३. | सचिवीय अंकेक्षण अहवाल | २९ |
| ०४. | स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल | ३२ |
| ०५. | ताळेबंद | ४९ |
| ०६. | नफातोटा पत्रक | ५० |
| ०७ | ताळेबंदाशी संबंधित अनुसूची | ५३ |



टिप : हा वार्षिक अहवाल इंग्रजी वार्षिक अहवालाचे भाषांतर करून तयार केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| **विद्यमान संचालक मंडळ (सद्यस्थिती)** | श्री. विकास चंद्र रस्तोगी, भा.प्र.से.(नं.०२२–२२०२९३४२) | अध्यक्ष |
| | श्रीमती. बुवनेश्वरी एस., भा.प्र.से.(मो.नं.७५८८६०९६००) | व्यवस्थापकीय संचालक |
| | श्री. सुरज मांढरे, भा.प्र.से.(नं.०२२–२६१२६१५०) | संचालक |
| | श्री. वल्लभराव तेजराव देशमुख (मो.नं.९८५०३२०३७७) | संचालक |
| | डॉ. श्री.रणजित निळकंठराव सपकाळ (मो.नं.९०७५८५९४८८) | संचालक |
| | डॉ. सौ.मनिंदरकौर व्दिवेदी,भा.प्र.से.(नं.०११–२५८४२०९) | संचालक |
| | श्री. पि. के. पटनाईक (नं.०११–२५८४००५६) | संचालक |
| | श्री. हेमंत चिमुरकर (नं.०२०–२४२६४५८७/२४२६६५८४) | संचालक |
| **लेखा परीक्षक** | मे. शाह बाहेती चांडक ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, "श्रीधाम", अरविंद घोष मार्ग, रामदास पेठ, अकोला (महा.) ४४४००१. श्री. राम ठक्कर ॲन्ड असोसिएटस, सेक्रेटेरीअल ऑडीटर, अकोला. | |
| **बॅंकर्स** | बॅंक ऑफ महाराष्ट्र, एचडीएफसी बॅंक, बॅंक ऑफ बडोदा. | |
| **पंजीकृत कार्यालय** | 'महाबीज भवन', कृषि नगर, अकोला. | |
| **कार्यकारी अधिकारी (सद्यस्थिती)** | डॉ. श्री.प्रफुल्ल लहाने (मो.नं.७५८८६०९२२०) | महाव्यवस्थापक (गु.नि.व संशोधन) व प्रभागी प्रशासन |
| | श्री. मनिष यादव (मो.नं.७५८८६०९६५९) | महाव्यवस्थापक (वित्त) |
| | श्री. विवेक ठाकरे (मो.नं.७५८८६०९५५८) | महाव्यवस्थापक (उत्पादन) |
| | श्री. विजयकुमार देशमुख (मो.नं.७५८८६०९६७०) | महाव्यवस्थापक (विपणन) |
| | श्री. प्रशांत पागृत (मो.नं.७५८८६०९४०७) | महाव्यवस्थापक (प्रक्रिया व अभियांत्रिकी) |
| | श्री. विनय एच. वर्मा (मो.नं.७५८८६०७६९२) | कंपनी सचिव तथा उपमहाव्यवस्थापक (अंतर्गत अंकेक्षण) |

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
नोंदणीकृत कार्यालय, 'महाबीज भवन' कृषि नगर, अकोला–४४४ १०४
दूरध्वनी क्र.०७२४–२४५२०६०, २४५५०९३
टोल फ्री क्रमांक.– १८०० २३३ ८८७७
Email – hocs@mahabeej.com, CIN U01200MH1976SGC018990
(कंपनी कायदा १९५६ नुसार पंजीकृत संस्था)

# आमसभेची सूचना

प्रति,
सर्व सन्माननीय भागधारक,

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या भागधारकांची अठ्ठेचाळीसावी (४८ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा **डॉ. पंजाबराव देशमुख कृषि महाविद्यालय, कृषि नगर, अकोला–४४४ १०४ येथील के. आर. ठाकरे सभागृहात, सोमवार दिनांक २९ डिंसेबर, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता** पुढील कार्यवाही पूर्ण करण्यासाठी भरविण्यात येत आहे. त्या अनुषंगाणे सर्व भागधारकांना आमसभेला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

## सामान्य कार्यवाही

१. *महामंडळाचे दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता तयार केलेल्या नफातोटा पत्रक व त्या तारखेपर्यंतची स्थिती दर्शविणारे ताळेबंद व त्या वरील संचालक मंडळाचा अहवाल, महालेखापरीक्षकाची लेख्यावरील टिपणी, लेखापरीक्षकांचे अभिप्राय आणि सचिवीय अंकेक्षण अहवाल यावर विचार करणे आणि त्यास मान्यता देणे.

२. भागधारकांना २५.०० टक्के लाभांश देणे बाबत विचार करणे व त्यास मान्यता देणे.

अकोला संचालक मंडळाच्या आदेशानुसार
म.रा.बि.म.मर्या. करिता,

(विनय वर्मा)
कंपनी सचिव

ठिकाण: अकोला
दिनांक: ०६/१२/२०२५

**टिप :**

१) ज्यांना सभेत उपस्थित राहण्याची व तेथे मतदान करण्याची अर्हता असेल, अशा भागधारकांना प्रतिनिधी मार्फत सभेत उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क आहे. प्रतिनिधी हा महामंडळाचा भागधारक असणे आवश्यक नाही.

२) मात्र सन्माननीय भागधारकांनी नेमलेल्या प्रतिनिधींना, आमसभेत होणाऱ्या कार्यवाही संबंधीत ठरावांबाबत जर मतदान झाल्यास फक्त मतदानातच भाग घेता येईल. परंतु सभेच्या चर्चेत प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार राहणार नाही अथवा सभा स्थानी मंचावर येऊन कसल्याही प्रकारचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही.

३) वार्षिक अहवाल स्वतंत्ररित्या भागधारकांच्या अधिकृत पत्त्यावर पाठविण्यात येत आहेत. अहवाला सोबत प्रतिनिधी नेमावयाचा सर्वसाधारण फॉर्म जोडलेला आहे. प्रतिनिधित्वाचा फॉर्म वैध ठरविण्यासाठी त्यावर एक रूपया फक्त इतक्या किंमतीचे महसूल मुद्रांक (रेव्हेन्यु स्टॅम्प) लावुन त्यावर भागधारकाची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे. असे फॉर्म महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय, 'महाबीज भवन', कृषिनगर, अकोला ४४४ १०४ येथे सभेच्या वेळेच्या ४८ तासांपूर्वी पोहचणे आवश्यक आहे.

४) महामंडळाच्या आमसभेत घोषित केलेले लाभांश सन २०१७—२०१८, २०१८—२०१९, २०१९—२०, २०२०—२१, २०२१—२२, २०२२—२३ आणि २०२३—२४ ह्या वर्षाचे अनक्लेम आहेत अशा भागधारकांना पुन:श्च विनंती की, मुदत संपल्याने स्वत:जवळच राहीलेल्या लाभांश वारंटस्‌ची मुदत वाढवून देण्यासाठी कंपनी सचिव यांचे कार्यालयात, 'महाबीज भवन', कृषिनगर, अकोला या पत्त्यावर संपर्क साधावा. कारण जर भागधारकांनी वर्ष २०१७—२०१८ चे लाभांश वॉरंटस् वटविले नाही तर, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४ नुसार इन्व्हेस्टर एज्युकेशन आणि प्रोटेक्शन फंडमध्ये हस्तांतरीत करण्यात येईल व त्यानंतर हस्तांतरीत केलेल्या रकमेवर अथवा महामंडळावर कुठलाही हक्क राहणार नाही.

५) भागधारकांना विनंती की, त्यांनी आपल्या पत्त्यातील बदल महामंडळास त्वरीत कळवावा.

६) सभासदास नामनिर्देशन करावयाचे असल्यास अहवालासोबत नामनिर्देशनाचा फॉर्म संलग्न केला असून या सुविधेचा लाभ घ्यावा. सदर फॉर्म पुर्ण माहिती भरून व स्वाक्षरी

केल्यानंतर महामंडळाच्या नोंदणीकृत कार्यालयात 'महाबीज भवन', कृषिनगर, अकोला ४४४ १०४ येथे पाठविणे आवश्यक आहे.

७) कंपनी कायदा मंत्रालयाच्या हरित पुढाकार योजने अंतर्गत भागधारकास ई—मेल सुविधेप्रमाणे अहवाल प्राप्त करुन घेता येईल. सदर्हु भागधारकांनी त्यांचा ई—मेल आयडी कंपनी सचिव कार्यालयास hocs@mahabeej.com या ई—मेल आयडी वर कळविण्यात यावा.

८) कॉर्पोरेट सभासद/विद्यापीठ यांनी आपल्या प्रतिनिधींना आमसभेकरीता पाठवावे. त्यांना विनंती की, अशा प्रतिनिधी सोबत कंपनीच्या संचालक मंडळाच्या निर्णयाची/कंपनीतर्फे सभेला उपस्थिती राहणे आणि ई—मतदान करावयाच्या अधिकारपत्राची प्रमाणित सत्यप्रत सोबत आणावी.

९) के.वाय.सी. फॉर्म वार्षिक अहवालासोबत तसेच **महाबीज संकेत स्थळावर इन्व्हेस्टर कॉर्नर** मध्ये सुध्दा उपलब्ध करण्यात आलेला आहे. भागधारकांना विनंती की, सदर फॉर्म भरुन मुख्य कार्यालयास हस्तांतरीत करावा.

१०) मृतक भागधारकांच्या वारसदारांना विनंती करण्यात येते की, समभाग संक्रमणाची प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी. जेणे करुन त्यांना सभेकरीता हजर राहता येईल.

११) कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने कंपनी कायदा २०१३ च्या कलम १२४ अंतर्गत दावा न केलेल्या लाभांशाशी संबंधित तरतुदी अधिसूचित केल्या आहेत. ज्यांचे लाभांश सलग सात वर्षाच्या कालावधीसाठी दावा केलेला नाही किंवा वठवलेले नाहीत, नियमानूसार कंपन्याना अशा भागधारकांचे समभाग हस्तांतरित करण्याचे आदेश दिले आहे. भागधारकाना विनंती करण्यात येते की, त्यांनी विहीत कालावधीत लांभाश वठवावे. लाभांशाना दावा न केलेल्या रक्कमसह भागधारकांचा तपशील महामंडळाच्या कार्यालयीन संकेतस्थळ www.mahabeej.com वर पाहू शकता.

१२) कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ च्या तरतूदीनुसार सर्वसाधारण सभा व ई—मतदान बाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

....

**अ. इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन मतदान:—**

१. कंपनी कायद्याच्या कलम १०८ च्या तरतूदीनुसार तसेच वेळोवेळी त्यामध्ये झालेल्या दुरूस्ती व कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० सह वाचावे (या नंतर 'नियम' म्हणून दिलेल्या अधिसूचनेच्या संदर्भात उल्लेखीत करण्यात येईल) कंपनी आमसभेच्या नोटीसमध्ये दिलेल्या मुद्यांवर मत देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीव्दारे रिमोट ई—मतदान सुविधा देत आहे. **दिनांक ०६/१२/२०२५** (अंतिम दिवस) ही तारीख ई—मतदान प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पात्र असलेल्या भागधारकांच्या मतदानाचे हक्क निश्चित करण्यासाठी अंतिम तारीख (कट ऑफ) निश्चित केली जात आहे. या रोजी भागधारक असलेल्या सभासदांना, CDSL व्दारे उपलब्ध करून दिलेल्या रिमोट ई—मतदान प्रक्रियेत भाग घेता येईल. जे भागधारक ई—मतदान प्रक्रियेव्दारे मतदान करू शकणार नाही त्यांना सभेच्या दिवशी व्यासपिठाव्दारे सर्वसाधारण सभेत मतदान करण्याची संधी आहे. ज्या व्यक्ती निश्चित केलेल्या तारखे पर्यंत सदस्य नाही त्यांनी फक्त हया सूचनांचा माहीती करीता उपयोग करावा.

२. रिमोट ई—मतदानाची प्रक्रिया व पध्दतीचा तपशील खाली दिलेला आहे:
(क) प्रथमत : www.evotingindia.com या ई—मतदान संकेतस्थळावर लॉग इन करा.

(ख) आता 'भागधारकांच्या' टॅब वर क्लिक करा.

(ग) आता तुमचा युझर आय डी प्रविष्ट करा. (तुमच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस व्दारे पाठवलेला)

**(प्रत्यक्ष स्वरूपात समभाग असलेल्या सदस्यांनी कंपनीकडे नोंदणीकृत फोलीओ क्रमांक प्रविष्ट केला पाहीजे.)**

(घ) पुढील प्रमाणे ईमेज प्रविष्ट करावे आणि लॉग इन वर क्लिक करावे.

(च) आपण प्रथम वापरकर्ता असाल तर खालील चरणांचे अनुसरण करावे:

| टॅबचे नाव | डिमॅट स्वरूपात आणि भौतिक स्वरूपात समभाग असलेल्या सदस्यांसाठी |
|---|---|
| पॅनटॅब मध्ये भरावयाची माहिती. | आपल्याला प्रदान केलेला १० अंकी क्रमांक प्रविष्ट करा. (नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस व्दारे पाठविण्यात आलेला) |
| लाभांश बँकेचे विवरण किंवा जन्मतारीख या टॅब मध्ये भरावयाची माहिती | फोलिओ क्रमांक प्रविष्ट करा. |

(छ) वरील सर्व माहिती योग्यरित्या भरल्यानंतर 'सबमिट' टॅब वर क्लिक करा.

१. यशस्वीरित्या लॉग इन केल्यावर, सिस्टम आपल्याला इव्हेंट निवडण्यासाठी सुचित करेल म्हणजेच महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित या लिंकवर क्लिक करावे.

२. मतदान पानावर, निश्चित तारखेनूसार आपलयाकडे असलेल्या समभागाची संख्या (मतांची संख्या दर्शविणारी) दिसेल, जर आपण सर्व मते ठरावाला मान्य/विरूध्द दर्शवू इच्छित असाल तर सर्व शेअर्स प्रविष्ट करा आणि 'मान्य'/'विरूध्द' यावर क्लिक करा किंवा अंशत: 'मान्य'साठी आणि अंशत: 'विरूध्द' साठी आवश्यक माहिती भरून क्लिक करावे, परंतु एकत्रित 'मान्य' आणि/किंवा 'विरूध्द' मधील एकुण संख्या निश्चित तारखेनुसार आपल्या एकुण समभागापेक्षा जास्त नसावी. आपण 'टाळा' 'Abstain' हा पर्याय देखील निवडू शकता आणि आपले समभाग कोणत्याही मथळयाखाली मोजले जाणार नाहीत.

३. एक आणि अधिक फोलिओ/डिमॅट खाती असलेले सदस्य प्रत्येक फोलीओ/डिमॅट खात्यासाठी स्वतंत्रपणे मतदान प्रक्रिया निवडतील.

४. योग्य पर्याय निवडून आपली मते दया आणि 'सबमिट' वर क्लिक करावे. एक पुष्टीकरण बॉक्स दर्शविता जाईल, पुष्टीसाठी 'OK' वर क्लिक करावे किंवा बदल साठी 'CANCLE' वर क्लिक करावे. एकदा आपण पुष्टी केल्यावर त्यानंतर आपले मत बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. मतदानाच्या कालावधीत, आपण ठरावावर मतदान केल्याची पुष्टी केल्याशिवाय आपण एक किंवा अधिक वेळा लॉग इन करू शकता.

५. कॉर्पोरेट/संस्थात्मक सदस्यांनी (म्हणजेच व्यक्तीशिवाय, एचयुएफ, एनआरआय इत्यादी व्यतिरिक्त) संबंधित बोर्ड ठराव/अधि. पत्राची प्रमाणित प्रत याचा स्कॅन केलेला फोटो (पीडीएफ/जेपीजी स्वरूपात) पाठविणे आवश्यक आहे, एकत्रितपणे अधिकृत मतदाराची सही असलेल्या नमुन्यांच्या स्वाक्षऱ्यासह, जो मतदानास अधिकृत आहे, तपासणीकार (crutinizer) यांना ramthakkar.cs@gmail.com वर ई—मेल व्दारे पाठवावे आणि सदस्य त्यांच्या लॉग इन मध्ये ई—मतदान मोडयुलमध्ये अपलोड करू शकतात.

६. सदस्य **दिनांक २२/१२/२०२५ ते २८/१२/२०२५ (संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत)** ऑनलाईन मते देऊ शकतात, दिलेल्या तारखेनंतर मतदान करण्यास परवानगी नाही आणि रिमोट ई—मतदान सुविधा अक्षम केली जाईल.

७. कोणत्याही शंका/तक्रारी असल्यास आपण सदस्यांसाठी नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQ) वर पाहु शकता आणि https://evotingindia.com या संकेतस्थळावरील 'डाउनलोड' विभागात उपलब्ध असलेल्या ई–मतदान युझर मॅन्युअलचा संदर्भ घेऊ शकता.

८. ज्या भागधारकांनी ई–मतदान पध्दतीने मत नोंदविलेले नसेल, ते भागधारक आमसभेस उपस्थित असल्यास प्रत्यक्ष पध्दतीने मतदान नोंदवू शकतात.

९. ज्या भागधारकांचे समभाग त्यांनी इलेक्ट्रॉनिक फार्म मध्ये धारण केलेले आहेत, असे भागधारक स्वत:चा डिमॅट खात्याच्या माध्यमातूनही मतदान करु शकतात.

सीडीएसएल कडे डिमॅट पध्दतीने समभागधारण करणाऱ्या वैयक्तिक भागधारकांनी खालील सूचनांचे पालन करुन मत नोंदवावे.

१. ज्या भागधारकांना CDSL Easi/Easlest सुविधा निवडली आहे, ते त्यांच्या विद्यमान आयडी आणि पासवर्डव्दारे लॉग इन करु शकतात. पुढे कोणत्याही प्रामाणीकरणाशिवाय ई–मतदान पानावर पोहोचण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिला जाईल. CDSL Easi/Easlest सुविधेवर लॉग इन करण्यासाठी वापरकर्त्यांनी http://web.cdslindia.com/myeasi/home/login किंवा www.cdslindia.com ला भेट द्या आणि लॉग इन चिन्हावर क्लिक करा आणि नविन प्रणाली Myeasi निवडा.

२. यशस्वी लॉग इन केल्यानंतर CDSL Easi/Easlest सुविधा वापरकर्त्यांना पात्र कंपन्यासाठी ई–मतदान पर्याय पाहण्यास सक्षम असेल जेथे कंपनीने दिलेल्या माहितीनूसार ई–मतदान चालू आहे. ई–मतदान पर्यायावर क्लिक केल्यावर वापरकर्ते रिमोट ई–मतदान कालावधीत आपले मत देण्यासाठी किंवा प्रत्यक्ष सभेमध्ये सामील होण्यासाठी सक्षम असेल. याव्यतिरीक्त, सर्व ई–मतदान सेवा मतदात्याच्या प्रणालीमध्ये प्रवेश करण्यासाठी खालील लिंक प्रदान केल्या आहेत. उदा. CDSL/NDSL/KARVY/LINKINTIME जेणे करुण वापरकर्ता थेट ई–मतदान सेवा देणाऱ्या संकेतस्थळाला भेट देऊ शकेल.

३. भागधारक जर CDSL Easi/Easlest सुविधेसाठी नोंदणीकृत नसल्यास नोंदणी करण्याचा पर्याय http://web.cdslindia.com/myeasi/Registration/Easi येथे उपलब्ध आहे.

४. वैकल्पिकरित्या मतदानकर्ते संकेतस्थळाच्या पानावर उपलब्ध असलेल्या ई–मतदान लिंकवर डिमॅट खाते क्रमांक आणि पॅन क्रमांकाची नोंद करुन थेट ई–मतदान पानावर प्रवेश करु शकतात. प्रणालीमध्ये नोंदणीकृत मोबाईल क्रमांक आणि ई–मेलवरील ओटीपी पाठवून मतदानकर्त्यास डिमॅट खात्यास प्रमाणित करेल. यशस्वी प्रमाणीकरणानंतर मतदानकर्ते ई–मतदान पर्याय पाहण्यास सक्षम असतील व जेथे ई–मतदान प्रगतीपथावर आहे आणि सर्व ई–मतदान सेवा देण्याऱ्या प्रणालीमध्ये थेट प्रवेश करण्यास सक्षण असतील.

१० ई–मतदानाबाबत काही अडचणी असल्यास सन्माननीय भागधारक खालील नंबर वर संपर्क साधून आवश्यक मार्गदर्शन प्राप्त करु शकतात.

**दूरध्वनी क्रमांक: (०७२४) — २४५५०९३, २२५८४८०**

**मोबाईल क्रमांक: ७६२०५१२५९५**

◆◆◆◆◆

## संचालक मंडळाचा अहवाल

**प्रति,**
**सर्व सन्माननीय भागधारक,**

महामंडळाचा ४८ वा वार्षिक अहवाल दि. ३१, मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाची आर्थिक स्थिती दर्शविणारा अंकेक्षीत लेखा अहवाल आपणासमोर सादर करण्यास संचालक मंडळास आनंद होत आहे.

### १) वित्तीय उपलब्धी:—

महामंडळाने वित्तीय विवरण तयार केले आहेत, ज्यात दि. ३१ मार्च, २०२५ अखेरचा ताळेबंद समाविष्ट आहे. दि. ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी, नफा—तोटा पत्रक, रोख प्रवाह विवरण आणि भागभांडवलात झालेल्या बदलाचे विवरण, आणि महत्वाची लेखा धोरणे आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा सारांश (यानंतर आर्थिक ताळेबंद म्हणून संदर्भित) यांचा समावेश आहे.

**महामंडळाच्या आर्थिक स्थिती बाबत चालू वर्ष आणि मागील वर्षाच्या आकडेवारीसह पुनर्विलोकन खालीलप्रमाणे आहे.**

(रूपये लाखात)

| विवरण | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ |
|---|---|---|
| व्यवसायातून उत्पन्न | ५९०२५.३० | ५३७५६.७४ |
| इतर उत्पन्न | २४१४.६१ | २३७३.२१ |
| **एकूण उत्पन्न** | **६१४३९.९१** | **५६१२९.९५** |
| (वजा) एकूण खर्च | ५९१८७.३७ | ५२९५८.३९ |
| **असामान्य बाबी आणि करपुर्व नफा** | **२२५२.५४** | **३१७१.५७** |
| चालु करखर्च | ६३५.५३ | ८०२.८२ |
| प्रलंबित करखर्च/देयता | —६१.८८ | —४२.३१ |
| मागील वर्षासंबंधीचा कर | ० | ० |
| इतर सर्वसमावेश उत्पन्न | २२९.६२ | १५२.५३ |
| **निव्वळ नफा/तोटा (अहवाल वर्षाकरिता)** | **१९०८.५१** | **२५६३.५९** |
| सामान्य भागावरील मुळ प्रतीभाग लाभ**(रूपयात)** | ४०१.२२ | ५७६.१९ |
| सामान्य भागावरील सौम्य प्रतीभाग लाभ**(रूपयात)** | **४०१.२२** | **५७६.१९** |

### २) लाभांश :—

संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२४—२०२५ या कालावधीत रू.२५/— प्रतिसमभाग (२५ टक्के दराने) निव्वळ लाभांश देण्याची शिफारस केलेली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांनी लाभांश देण्यासाठी मंजुरी दिल्यास रू.१०४.६१ लक्ष एवढी रक्कम लाभांश म्हणून देण्यात येईल.

### ३) व्यावसायिक कृती आणि भविष्यातील संभाव्य पुनरावलोकन :—

चालू वर्षी झालेली महामंडळाची व्यावसायिक कृती आणि भविष्यातील संभाव्य पुनरावलोकन बाबतचा तपशिल संचालक मंडळ खालीलप्रमाणे करीत आहे.

**बिजोत्पादन:**

अहवाल वर्षामध्ये महामंडळाने ६,२२,६४२ क्विंटल प्रमाणित/सत्यप्रत बियाणे आणि ८१,१५१ क्विंटल पायाभुत बियाणे भाजीपाला बियाण्यासह अनुक्रमे ५८,०४१ हेक्टर आणि १०,०१५ हेक्टर क्षेत्रावर बिजोत्पादक/तालुका बिज गुणन केंद्रामार्फत बियाण्याचे उत्पादन केलेले आहे. या एकुण उत्पादित प्रमाणित बियाण्यामध्ये तृणधान्य १,५९,०५१ क्विंटल, कडधान्य २,६८,८१९ क्विंटल, गळित धान्य १,८७,३६३ क्विंटल, कपाशी व तंतुमय ५०२ क्विंटल, हिरवळीचे खत ५,१०२ क्विंटल, चारावर्गीय १,७८५ क्विंटल आणि भाजीपाला १,७८५ क्विंटल आहेत. सलग क्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम आयोजित करण्याकरीता बिजोत्पादकांना प्रोत्साहीत करण्याचे दृष्टीने महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या तपासणी फी मध्ये १०० टक्के, ७५ टक्के व ५० टक्के सुट बिजोत्पादकांना **''ग्राम बिजोत्पादन योजना कार्यक्रम''** योजने अंतर्गत देण्यांत येते. ही योजना स्वतंत्रपणे तांदुळ, तुर, ताग आणि भाजीपाला पिके यासाठी राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत उत्पादकांना चांगला फायदा होत आहे. त्याचा प्रतिसाद खुप उत्साहवर्धक आहे.

- **६,२२,६४२ क्विंटल प्रमाणित/ सत्यप्रत**
- **बियाणे उत्पादन**
- **८१,१५१ क्विंटल पायाभुत बियाणे उत्पादन**
- **५८,०४१ हेक्टर क्षेत्रावर बिजोत्पादन**
- **''ग्राम बिजोत्पादन योजना कार्यक्रम''योजनेअतंर्गत तपासणी फी मध्ये १०० टक्के, ७५ टक्के व ५० टक्के सुट**
- **३००० क्विंटल पेक्षा जास्त प्रमाणित बियाणेचे उत्पादन घेणा–या गावांना पुरस्कार**

त्याचप्रमाणे महामंडळाने **''बियाणे गुणवत्ता''** वाढविण्याच्या दृष्टीने विशेष योजना जाहीर केली असुन त्या अंतर्गत ३००० क्विंटल पेक्षा अधिक प्रमाणित बियाण्याचे उत्पादन घेणाऱ्या गावांचा महाबीज मार्फत पुरस्कार देवून गौरव करण्यात येतो. महामंडळाने बियाणे दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीने कमीत कमी निम्नस्तर बियाणे असणारे लॉट व उच्चतम उगवण क्षमता असणारे लॉट याकरीता अतिरिक्त प्रोत्साहन योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेमुळे बिजोत्पादकांना फायदा होत असून महामंडळाच्या प्रक्रिया खर्चामध्ये बचत होऊन गुणवत्ता युक्त बियाणे मात्रेमध्ये वाढ झालेली आहे

**'राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान'** अंतर्गत कडधान्य, तेलबिया आणि तृणधान्य बियाण्याची मागणी लक्षात घेता महामंडळाने कडधान्य पिकामध्ये तुर, मुग, हरभरा व उडीद, तेलबियामध्ये सोयाबिनचे तसेच तृणधान्य पिकामध्ये रब्बी ज्वार, बाजरा व धान पिक वाणाचे लक्षांक उत्पादन करून बियाणे वितरीत करण्यात आले. त्यामुळे सदर पिकामध्ये बियाणे बदलाचे प्रमाणामध्ये वाढ होण्यास मदत झाली तसेच महामंडळाने गळीत धान्य, कडधान्य व तृण धान्य पिकामध्ये नवीन वाणाचे बियाणे उत्पादीत करून राज्यातील शेतकऱ्यांमध्ये प्रसार होण्याकरिता उपलब्ध करून दिले.

राष्ट्रीय तृणधान्य मिशन लक्षात घेता महामंडळाने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांना वेळेवर पुरवठा करण्यासाठी उच्च पोषण मूल्य असलेल्या विविध प्रकारचे तृणधान्य व वरई तृणधान्य उत्पादन करत आहे.

**बिजोत्पादनात नवीन वाणाचा समावेश:**

महामंडळाने अहवाल वर्षात पुढील नवीन वाणाचा बिजोत्पादनामध्ये समावेश केलेला आहे. **भात** पीडीकेव्ही साधना, आरटीएन—८, कर्जत—८, कर्जत—९, **नागली** सीएफएमव्ही—२, सीएफएमव्ही—३, वेगावती, दापोली—३, फुले केसरी, **तुर** पीडीकेव्ही अश्लेशा, फुले तुप्ती, गोदावरी, **मुंग** उत्कर्ष, फुले चेतक, आणि शिखा, **उडीद** फुले वसू, **सोयाबिन** एमएयुएस—६१२, एमएयुएस—७२५, फुले संगम, फुले किमया, जेएस—२०—२९, पीडीकेव्ही अंबा, फुले दुर्वा, एमएसीएस—१४६०, एनआरसी—१३०, सुवर्ण सोया. **तीळ** फुले पुर्णा, **गहु** फुले अनुपम, **रब्बी ज्वार** परभणी सुपर मोती, **करडई** पीबिएनस—१५४, **हरभरा** फुले विश्वराज इत्यादी कृषी विद्यापीठाने आणि आयसिएआर यांनी विकसित केलेल्या नवीन वाणाचा बिजोत्पादनामध्ये समावेश केलेला आहे.

- **भात** पीडीकेव्ही साधना, आरटीएन—८, कर्जत—८, कर्जत—९
- **तुर** पीडीकेव्ही अश्लेशा, फुले तुप्ती व गोदावरी
- **सोयाबिन** फुले **दुर्वा, फुले किमया,** एमएयुएस—७२५, पीडीकेव्ही अंबा, एमएसीएस—१४६०, जेएस २०—२९, सुवर्ण सोया
- **हरभरा** फुले विश्वराज
- **गहु** फुले अनुपम
- **रब्बी ज्वार** परभणी सुपर मोती.
- **करडई** पीबिएनस—१५४
- **तीळ** फुले पुर्णा
- **नागली** फुले केसरी, दापोली—३

**बियाणे प्रक्रिया व अभियांत्रिकी:**

कच्चे बियाण्यावर भिन्न वातावरणाच्या परिस्थितीत प्रक्रिया करून चांगल्या प्रतीचे बियाणे विपणना करीता योग्य वेळी हंगामामध्ये उपलब्ध करून देणे हे एक मोठे आव्हान महाबीज करीता राहत आलेले आहे. अहवाल वर्षात एकंदरीत ९,८९,२२३ क्विंटल कच्च्या बियाण्यावर खरीप, रब्बी तथा उन्हाळी हंगामामध्ये विहित कालमर्यादित प्रक्रिया करून उच्च प्रतीचे बियाणे तसेच बाजरी आणि पौष्टिक तृणधान्यांच्या ४.८५ लाख पॉकेट सोबत जैविक खते महाराष्ट्र शासनाला पुरविण्यात आली आणि शेतकऱ्यांना वेळेच्या मर्यादित बियाणे उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

- **एकंदरीत ९,८९,२२३ क्विंटल कच्च्या बियाण्यावर खरीप, रब्बी तथा उन्हाळी हंगामामध्ये विहित कालमर्यादित प्रक्रीया.**
- **महामंडळाची स्वत:ची मालसाठवणूकीची क्षमता ७,९३,५०० क्वि.**

अनेक नविन कल्पना आणि संकल्पनासह प्रक्रिया आणि साठवणूक अभियांत्रिकीच्या विस्तृत अनुभवावर प्रक्रियेचे कामकाज मशिनीकृत करण्यात आलेले आहे. महामंडळाने महाराष्ट्रातील बऱ्याच बिज प्रक्रिया केंद्रामध्ये स्वयंचलीत भरणा मशीन, बॅगिंग आणि टॅगिंग मशीन, स्वयंचलीत इलेक्ट्रॉनिक लेबल छपाई मशीन, माल वाहक फोर्क लीफ्टर ट्रक अशा प्रकारे यांत्रिकीकरण करून मनुष्यबळाच्या कमतरतेवर मात केली आणि त्यानंतर प्रक्रिया खर्च कमी झालेला आहे. बियाण्याची शास्त्रीय साठवण आणि प्रक्रिया केल्याने उत्तम दर्जाचे बियाणे उत्पादित महाराष्ट्रातील शेतकरी बांधवासाठी उपलब्ध करून देण्यात येत असते.

महामंडळाच्या स्वत:च्या गोदामाची बियाणे साठवण क्षमता ७,९३,५०० क्विंटल आहे आणि आम्ही बाहयप्रक्रिया केंद्रासह ९,८९,२२३ क्विंटल बियाण्यावर यशस्वीरित्या प्रक्रिया केली आहे. यामुळे बिजोत्पादकांना त्यांचे बियाणे प्रक्रियेसाठी त्यांच्या जवळच्या प्रक्रिया केंद्र व गोदामामध्ये नेणे—आणने हे सोयीस्कर झालेले आहे.

महामंडळाला राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत चार ठिकाणी गोडाऊन बांधण्यासाठी अनुदान प्राप्त झाले आहे. आणि बांधकाम सुरू आहे, त्याचप्रमाणे बिज प्रक्रिया केंद्र शिवनी येथे १५०KW आणि बिज प्रक्रिया केंद्र चिखली जि. बुलढाणा येथे १२०KW क्षमतेचे सौर उर्जा निर्मिती युनिट बसवणे पुर्ण झाले आहे आणि त्यामुळे वीज बिल व प्रक्रिया खर्च कमी होण्यास मदत

होत आहे. वर्षभरात ढोकी, तपोवन, सटाणा, खामगाव, बुटीबोरी आणि शिवणी या बिज प्रक्रिया केंद्रावर दुरूस्ती आणि देखभालीचे काम पूर्ण झाले आहे ज्यामुळे बियाणे प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आहे. शाश्वत विकासाचा भाग म्हणून अकोला येथील मुख्य कार्यालयाच्या इमारतीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टम लागू करण्यात आली आहे. चांगल्या आणि प्रगत पायाभूत सुविधा महामंडळाचे उत्पादन आणि साठवण क्षमता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतील.

**बियाणे विपणन :**

- **सन २०२४–२५ या वर्षात एकूण ५,८२,८१६ क्विंटल बियाणे विक्री केलेले आहे.**
- **खरीप २०२४ हंगामात महामंडळाने एकुण २,८९,५९४ क्विंटल बियाणे विक्री केलेली आहे.**
- **रब्बी २०२४ हंगामात २,५८,०५९ क्विंटल बियाणे विक्री केलेली आहे.**
- **भारत सरकारच्या विविध योजने अंतर्गत २०२४–२५ मध्ये खरीप व रब्बी हंगामात एकुण ३,१६,५५८ क्विंटल बियाणे वाटप.**
- **१,३८,००० लिटर जैविक खते आणि २,७६२ क्विंटल जैविक बुरशीनाशकांची विक्री.**

खरीप २०२४ हंगामात महामंडळाने एकूण २,८९,५९४ क्विंटल बियाणे विक्री केलेली आहे. उपलब्धतेच्या ८० टक्के बियाणे विक्री झालेली आहे. रब्बी २०२४ हंगामात २,५८,०५९ क्विंटल बियाणे विक्री झालेली आहे. उन्हाळी २०२४–२५ हंगामात शेंगदाणा १३,०६० क्विंटल आणि २२,१०३ भाजीपाला, वैरण पिके व हिरवळीचे बियाणे विक्री केलेले असून बियाण्याची किंमत ५०.५० कोटी आहे. यापैकी १३,५०६ क्विंटल चारा पिकांचे बियाणे, ५,४३८ क्विंटल हिरवळीचे खते आणि ३,१५९ क्विंटल भाजीपाला पिकाचे बियाणे शासकीय योजने अंतर्गत व सर्वसाधारण विपणना अंतर्गत बियाणे विक्री केलेले आहे. महामंडळाने वर्षभरात १,३८,००० लिटर जैविक खते आणि २,७६२ क्विंटल जैविक बुरशीनाशक याची विक्री केली आहे. ज्याची किंमत अनुक्रमे ३.३९ कोटी व ३.४५ कोटी एवढी आहे. योग्य नियोजन, वेळेत बियाणे उपलब्धता व रास्त दर यामुळे बियाणे विक्री शक्य झालेली आहे. सन २०२४–२५ या वर्षात एकूण ५,८२,८१६ क्विंटल बियाणे विक्री केलेले आहे.

भारत सरकारच्या "राष्ट्रीय अन्न सुरक्षा मोहीमे" अंतर्गत धान्य उत्पादन वाढविण्याकरीता गहू, भात व कडधान्य बियाणे निवडक जिल्हयांमध्ये अनुदानावर वाटप केलेले आहे. सदर योजने अंतर्गत महामंडळामार्फत ७,७२६ क्विंटल भात, तुर, मुंग उडीद, ज्वार, बाजरा आणि मका खरीप २०२४ हंगामात वाटप केलेले आहे आणि रब्बी २०२४–२५ हंगामात ९१,९३० क्विंटल गहू आणि हरभरा बियाणे, १७१ क्विंटल लीन बियाणे व ४५२ क्विंटल करडई योजने अंतर्गत अनुदानावर वाटप केलेले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान OSOP योजने अंतर्गत महामंडळाने ५३,४९४ क्विंटल सोयाबिन व भुईमुग बियाणे पुरविले आहे. आणि राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत खरीप २०२४ मध्ये २३,९५२ क्विंटल आणि ग्राम बिजोत्पादन योजने अंतर्गत ४७,०८७ क्विंटल सोयाबिन बियाणेची विक्री झाली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत महामंडळाने खरीप २०२४ मध्ये ७१४ क्विंटल बाजरा आणि नाचणी व रब्बी २०२४ च्या हंगामात २४,००० क्विंटल रब्बी ज्वारीचे बियाणे विकले आहे. तसेच महामंडळाने ग्राम बिजोत्पादन योजने अंतर्गत रब्बी २०२४–२५ च्या हंगामात ५४,१८७ क्विंटल गहु आणि उन्हाळी २०२४–२५ हंगामात १२,८४५ क्विंटल भुईमूग बियाणे विकले आहे.

**गुणवत्ता नियंत्रण व संशोधन :**

- **एकूण ३८,०४२ बियाणे/रोपाचे नमुन्यांची उगवण चाचणी तपासणी.**
- **१३,९४८ क्षेत्रीय उगवण चाचणी घेण्यांत आलेली आहे.**

अहवाल वर्षात विविध पिक/वाणांच्या बियाण्याची एकूण ३८,०४२ नमुन्याची उगवणक्षमतेसह भौतिक शुध्दता चाचणी महामंडळाचे बिज परीक्षण प्रयोगशाळेमध्ये घेण्यात आली आहे. या सोबतच राज्य व

बाहेर राज्यातून विविध पिक/वाणाचे ३५९ बियाणे नमुन्यांची अनुवांशीक शुध्दता तपासणी आणि २६६२ नमुन्यांची एलिझा चाचणी करण्यात आली आहे. सोयाबिन बियाणे उगवणशक्ती बाबतच्या तक्रारीस आळा घालण्याचे दृष्टीकोनातुन उन्हाळी हंगाम २०१२ पासुन सोयाबिन बियाण्याची क्षेत्रीय उगवण चाचणी घेण्यात येत आहे. याअंतर्गत अहवाल वर्षामध्ये १३,९४८ बियाणे नमुन्यांची क्षेत्रीय उगवण चाचणी घेण्यांत आलेली आहे. महामंडळाव्दारे शेतकऱ्यांना दरवर्षी पुरवठा होत असलेल्या बियाण्याच्या वितरणापुर्वी विविध चाचण्या घेण्यात येऊन पात्र ठरलेले दर्जेदार बियाणेच राज्यातील शेतकरी बांधवाना उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांचा महाबीज बियाणे प्रती असलेला विश्वास अबाधित आहे.

महामंडळाने केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजने अंतर्गत प्राप्त अर्थसहाय्याने बिज परीक्षण प्रयोगशाळेचे बळकटीकरण केलेले आहे तसेच महाराष्ट्र शासनाकडे प्रमाणित बियाणे चाचणी प्रयोगशाळा म्हणून नोंदणीकृत झाली आहे आणि मानक कार्यप्रणाली व गुणवत्ता नियमावली लागू करत आहेत. बिज परीक्षण प्रयोगशाळा अकोला येथील बिज परीक्षण प्रयोगशाळेस National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL) संस्थेचे मान्यता मिळाली आहे. आणि इतर बिज परीक्षण प्रयोगशाळेची माान्यता प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. बिज परीक्षण प्रयोगशाळा व्दारे अहवाल वर्षात बियाणे कायद्यांअंतर्गत २,८८४ नमुन्यांची तपासणी केली आहे.

**इतर संलग्नित व्यवसाय:**

महामंडळ विविध जैविक खते आणि जैविक किटकनाशके तयार करीत आहे जी कृत्रिम रसायनांना पर्यावरणपूरक पर्याय आहेत, तसेच मातीचे आरोग्य वाढवतात, प्रदुषण कमी करतात आणि शाश्वत शेतीला आधार देतात. महामंडळाने वर्षादरम्यान नविन जैविक संघ ''पीके'' (पीएसबी+केएमबी) तयार केले आहे आणि विपनणासाठी विविध जिल्हयांमध्ये उपलब्ध आहे.

यासोबतच महाबीज मार्फत गेल्या दोन दशकापासून महाबीज रोपवाटीका अकोला व नागपूर यांचे व्दारे शेतकरी बांधवांना तसेच इतर ग्राहकांना विविध प्रकारची गुणवत्तापुर्ण फुल–झाडे सं. पपई रोपे, ऊर्ती संवर्धीत केळी रोपे, शोभीवंत झाडांची रोपे, भाजीपाला बियाणे पॅकेटस, कुंपणासाठी लागणारी रोपे, जैवीक खते–बुरशीनाशक इ. रास्त दरात उपलब्ध करून देण्यात येतात. गुणवंतापुर्ण रोपे, माफक दर तसेच विक्रीपश्चात सेवा यामुळे महाबीज रोपवाटीकेचा व्यवसाय मोठया प्रमाणावर वाढला आहे. अहवाल वर्षात आजतागायत रू. ८.२६ कोटी चा व्यवसाय महाबीज रोपवाटीकाव्दारे करण्यात आलेला आहे.

**४) साहित्य बदल व जर कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकासंबधित वर्षामध्ये आर्थिक स्थितीवर प्रभाव पाडणारे घटकात बदल झाल्यास त्यासंबधीचा तपशील व बांधिलकी :—**

कंपनीच्या आर्थिक स्थितीवर प्रभाव पाडणारे कोणतेही विशेष बदल या वर्षात घडुन आलेले नाहीत.

**५) उर्जा संवर्धन, तंत्रज्ञान उपयोग, परकीय चलन मिळकत व खर्च :—**

उर्जा संवर्धन, तंत्रज्ञान उपयोग, परकीय चलन मिळकत व खर्चा संबंधित माहिती कंपनी कायदा २०१३ चे कलम १३४ (३) (एम) नुसार व कंपनी खाते नियम, २०१४ च्या नियम ८ (३) अंतर्गत खालील प्रमाणे दिलेले आहेत.

**उर्जा संवर्धन:**

महामंडळ नेहमीच उर्जेचे संवर्धन करण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्नशील असते. नैसर्गिक उर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रक्रिया केंद्राच्या ठिकाणी महामंडळाकडून एलईडी दिवे व सौर उर्जेचा वापर करण्यात येत आहे. महामंडळाचे भाजीपाला बीज प्रक्रिया केंद्र एमआयडीसी अकोला येथे सौर उर्जेवर चालणारे शितगृह (१०,००० क्विं.) आहे. ज्याचा वापर बियाणे साठवणूकीसाठी केला जात आहे. महामंडळाच्या विविध बिज प्रक्रिया केंद्रामध्ये सौर उर्जा

निर्मिती संच बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे जेणेकरून हरित उर्जेला प्रोत्साहन मिळेल आणि संबंधित बिज प्रक्रिया केंद्रावरील वीजेचा वापर कमी होईल. महामंडळाने ३३ ठिकाणी स्वयंचलित पीएफ पॅनल्स बसविले आहेत आणि चार बिज प्रक्रिया केंद्रावरील एचटी कनेक्शनचे एलटी कनेक्शनमध्ये रूपांतर केले आहे जे बिज प्रक्रिया केंद्रावरील वीज वापर कमी करण्यासाठी उपयुक्त आहेत. तसेच मुख्य कार्यालय महाबीज भवन अकोला येथे उर्जा कार्यक्षम उपकरणे बसविली आहेत ज्यामुळे उर्जेची बचत होत आहे. महामंडळाचा मुख्य व्यवसाय बियाणे उत्पादन आणि बिज प्रक्रिया आहे आणि त्यानुसार वीज बचतीसाठी नविन स्वयंचलित उपकरणाचा वापर नियमितपणे करण्यासाठी जे काही करावे लागेल त्याचा सखोल अभ्यास केला गेला आहे आणि त्यानुसार अंमलबजावणी केली गेली आहे.

**नवीन तंत्रज्ञान:**

महामंडळाचा संशोधन आणि विकास विभागाव्दारे नवीन बाजारपेठेला अनुकूल संकरित बीटी कापूस, संकरित बाजरा, संकरित मका, तृणधान्य पिके, कडधान्य पिके आणि भाजीपाला बियाणे विकसित करण्यात प्रभावीपणे व्यस्त आहे. अलीकडेच महामंडळाव्दारे मूग, संकरित चारा ज्वारी, सुधारीत ज्वारी पिकांच्या विविध वाण राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्थेकडे पुढील चाचणी आणि मंजुरीसाठी सादर केले आहेत. महामंडळाने शेतकऱ्यांची मागणी पुर्ण करण्यासाठी सोयाबीन, तीळ, गहू आणि भात यासारख्या विविध पिकांचे शुध्दीकरण/संशोधन कार्यक्रम राबवला आहे.

**विदेशी मुद्राविनीमय**

१) विदेशी मुद्रा प्राप्ती — रू. (निरंक)

२) विदेशी मुद्रा खर्च — रू. (निरंक)

**६) महामंडळाचे जोखीम व्यवस्थापन धोरण विकास आणि अंमलबजावणी बाबत निवेदन :—**

महामंडळाच्या संचालक मंडळाने जोखीम व्यवस्थापन धोरण तयार केले आहे. जोखीम व्यवस्थापन योजनेचा आढावा घेण्याची आणि त्याचा प्रभावीपणा सुनिश्चित करण्याची जबाबदारी संबंधित प्रमुख अधिकारी यांच्यावर आहे. महामंडळाकडे एक विस्तृत उद्योग जोखीम व्यवस्थापन धोरण आणि अधिकार आहेत. जे की जोखीम व्यवस्थापनामधील प्रशासन नमुना, जोखीम मूल्यांकन आणि प्राधान्यक्रम प्रक्रिया परिभाषित करते. महामंडळाच्या जोखीम व्यवस्थापन चौकटीत मुख्य जोखीम व्यवस्थापन मांनके आणि पध्दती एकत्रित केलेल्या आहेत.

**७) सामाजिक जबाबदारीच्या अंमलबजावणीवर महामंडळाच्या प्रगतशिल धोरणाचा तपशिल :—**

महामंडळाने संयुक्त सामाजिक जबाबदारीसाठी धोरण विकसित केलेले आहे आणि संचालक मंडळाने संयुक्त सामाजिक जबाबदारी प्रभावीपणे अंमलबजावणी करीता पुढाकार घेतलेला आहे, सन २०२४—२५ या वर्षातील सीएसआर कृतीचे विवरण **परिशिष्ट—१** प्रमाणे आहे.

**८) कंपनी कायदा, २०१३ चे कलम १८६ नुसार कर्ज हमी किंवा गुंतवणुकीचे विवरण :—**

कंपनी कायदा, २०१३ चे कलम १८६ नुसार कर्ज हमी किंवा गुंतवणुकीचे विवरण आर्थिक अहवालामध्ये दिलेले आहे.

**९) संबंधित व्यक्तींनी केलेले करार किंवा ठराव याचा तपशिल :—**

कंपनीने आर्थिक वर्षात संबधित पक्षासह प्रविष्ट केलेले सर्व करार/व्यवस्था/व्यवहार हे सर्वसाधारणपणे बाजार भावाच्या किंमतीत होते. कलम १८८ संबधित व्यक्तींनी केलेले करार किंवा व्यवहार याचा तपशिल सोबत जोडलेल्या फॉर्म AOC-2 प्रमाणे आहे.

**१०) वैधानिक लेखापात्रता, आरक्षण आणि लेखा परिक्षक/सेकेटरीयल ऑडीटर यांच्या अहवालावर स्पष्टीकरणे :—**

वैधानिक लेखापरीक्षक आणि व्यावसायिक कंपनी सचिव यांचे अहवालावर लेखापात्रता, आरक्षण बाबत स्पष्टीकरण संचालक मंडळाचे अहवालासोबत जोडलेले आहेत.

**११) संचालकांची नियुक्ती, त्यांचे मानधन व कर्तव्याबाबत महामंडळाचे धोरण :—**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १७८(१) च्या तरतुदीनुसार नामनिर्देशन आणि वेतन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारच्या भारतीय सामुहीक उद्योग मंत्रालयाचे दि. ५ जुन २०१५ च्या सुचनेनुसार वरीष्ठ व्यवस्थापन आणि इतर कर्मचारी यांची नियुक्ती वगळता कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १७८(२) (३) (४) च्या अटीतुन सरकारी कंपन्याना सुट देण्यात आलेली आहे. म्हणुन महामंडळ कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १७८(३) नूसार संचालकांची नियुक्ती, व्यवस्थापकीय मानधनाचे शोधन आणि इतर संबंधित बाबी याकरीता बाध्य नाही. त्याकरिता समितीमध्ये एक स्वतंत्र संचालक असणे आवश्यक असुन संचालकाची नियुक्ती झाल्यानंतर नामनिर्देशन व वेतन समिती कार्यान्वित होईल. या नियुक्ती संबंधित सुचना राज्य शासनाचे अभिप्राय प्राप्त करुन घेणे करिता सादर करण्यात आलेली आहे.

**१२) वार्षिक विवरण :—**

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १२ व कायद्याचे कलम ९२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने वार्षिक विवरण अहवाल **परिशिष्ट —२** मध्ये दिलेला आहे.

**१३) अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या झालेल्या सभा आणि संचालक/मुख्य व्यवस्थापकीय व्यक्तीची निवड याचा तपशिल :—**

अहवाल वर्षात आयोजित संचालक मंडळाच्या सभाची संख्या आणि संचालक/मुख्य व्यवस्थापकीय व्यक्तीच्या निवडी संबधीचा तपशिल **परिशिष्ट—३** मध्ये दिलेला आहे.

**१४) संचालकाचे जबाबदारी बाबत निवेदन :—**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३४(५) उपबंधानुसार आर्थिक वर्ष २०२४—२५ साठी संचालक मंडळ, संचालकांचे जबाबदारी बाबतचे निवेदन सादर करीत आहे.

(अ) वार्षिकलेखे तयार करतांना लेख्याबाबत लागु असलेली मापदंडे अवलंबिलेली आहेत. ज्या बाबतीत लेखानियमानुसार वेगळी पध्दत अवलंबिलेली आहे अशा बाबींबाबत लेखानियमानुसार योग्य स्पष्टीकरणासह पध्दत अवलंबिलेली आहे.

(ब) संचालक मंडळाने अशा प्रकारच्या लेखांकनाच्या पध्दतीचे अनुसरन केलेले आहे, ज्यात समन्वय व संभाव्यता याचा मेळ लागेल व त्याबाबत सर्वंकष अशी पाठराखन केली आहे की, ज्याद्वारे महामंडळाच्या कामकाजाबाबत तथा आर्थिक वर्षाशी संबंधित नफातोटा पत्रक हे खरे व वस्तुनिष्ठ स्वरूप प्रकट करेल.

(क) संचालकांनी कंपनी कायद्याअंतर्गत आवश्यक असलेले लेखे ठेवण्याबाबत काळजी घेतलेली आहे, जेणे करून महामंडळाची मालमत्ता सुरक्षित राहील तथा अपहार व अनियमितना होणार नाही व झाल्यास उघडकीस येईल.

(ड) संचालकांनी वार्षिक लेखे प्रचलीत पध्दतीनुसार तयार केलेले आहेत.

(इ) संबंधित सर्व कायदे व तरतुदीनुसार प्रभावीपणे कार्य होते किंवा कसे याची खातरजमा करण्यासाठी संचालकांसाठी योग्य प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

**१५) दुय्यम, संयुक्त आणि सहाय्यक कंपनी :—**

महामंडळ हे राष्ट्रीय बिज निगम लि. या कंपनीची सहायक कंपनी असुन या कंपनीने महामंडळाचे ३५.४४ टक्के समभाग धारण केलेले आहेत व आर्थिक वर्षात यामध्ये कोणताही बदल नाही.

**१६) ठेवी :—**

अहवाल वर्षात महामंडळाने कोणत्याही ठेवी स्विकारलेल्या नाहीत किंवा ठेवीचे नूतणीकरण केलेले नाही.

**१७) वैधानिक लेखापरीक्षक :—**

वैधानिक लेखापरीक्षक आणि त्यांचा अहवाल मे. शाह बाहेती चांडक अॅन्ड कंपनी., सनदी लेखापाल, अकोला यांची भारताच्या नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यांच्याव्दारे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, जे एक वर्षाच्या कालावधीसाठी पदावर आहेत. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ७ मे २०१८ रोजी लागू केलेल्या कंपनी सुधारणा कायदा, २०१७ नुसार, अशा वैधानिक लेखापरीक्षकांच्या नियुक्तीला प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता देणे आवश्यक नाही, त्यामुळे मंजुरीसाठी कोणताही ठराव प्रस्तावित नाही.

**खर्च लेखापरीक्षक**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४८ नुसार कंपनी (कॉस्ट रेकॉर्ड आणि ऑडिट) नियम, २०१४ नुसार कॉस्ट ऑडिट महामंडळाला लागू नाही.

**सचिविय अंकेक्षक**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २०४ आणि कंपन्या (व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि पारिश्रमिक) नियम, २०१४ च्या तरतुदींनुसार मे. राम ठक्कर अँड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरी, अकोला यांची एक वर्षाच्या कालावधीसाठी सचिविय अंकेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे व ते त्या कालावधीपर्यंत पदावर आहेत.

**१८) अनक्लेम लाभांश वारंट्सची ची रक्कम (IEPF) ला हस्तांतरण :—**

सन २०२४—२५ मध्ये २०१६—१७ या वर्षाची अनक्लेम लाभांश वारंट्सची रक्कम रू. ३,८२,६७५.०० Investor Education and Protection Fund ला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

**१९) लेखापरीक्षा समितीची रचना आणि यंत्रणा : —**

संचालक मंडळाने कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १७७ च्या तरतुदीनुसार लेखापरीक्षा समितीच्या रचनेला मान्यता दिलेली आहे. या समितीमध्ये स्वतंत्र संचालक असणे आवश्यक असुन संचालकाची नियुक्ती झाल्यानंतर लेखापरीक्षा समिती कार्यान्वित होईल. या नियुक्ती संबंधी सुचना राज्य शासनाला त्यांचे मत घेण्याकरीता सादर करण्यात आलेली आहे.

**२०) समभाग :—**

अहवाल वर्षात अधिकृत भागभांडवल आणि भरणा केलेले भागभांडवल यामध्ये बदल झालेला नाही.

**समभाग परत घेणे :**

अहवाल वर्षात महामंडळाने कोणतेही समभाग विकत घेतलेले नाहीत.

**सामान्य** (Sweat) **समभाग :**
अहवाल वर्षात महामंडळाने कोणतेही सामान्य समभाग वाटप केलेले नाहीत.

**बोनस समभाग :**
अहवाल वर्षात महामंडळाने कोणतेही बोनस समभाग वाटप केलेले नाहीत.

**कर्मचारी समभाग पर्याय योजना :**
महामंडळाने कर्मचाऱ्यांसाठी कोणतीही समभाग पर्यायी योजना प्रदान केलेली नाही.

**२१) अंतर्गत आर्थिक नियंत्रण :—**

महामंडळाच्या महत्वपुर्ण व्यवसाय प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याकरीता, वित्तीय अहवाला अंतर्गत नियंत्रण तसेच क्रियात्मक नियंत्रण हे अंतर्गत वित्तीय नियंत्रण आराखडयामध्ये आहे. महामंडळाच्या व्यवसायाला संरक्षित करण्यासाठी व बदलत्या पर्यावरणाबाबत कमीत कमी जोखीम स्विकारणे निर्णय क्षमता विकसित करणे व सुव्यवस्थापन याबाबत महामंडळाने अंतर्गत नियंत्रण पध्दतीचा अराखडा तयार केलेला आहे.

**वित्तीय विवरणाच्या संदर्भात अंतर्गत नियंत्रण प्रणाली संबंधी विस्तृत बाबी खालील प्रमाणे:**

अ) महामंडळाची कार्यव्यवस्था मान्य केलेल्या धोरणानुरूप आहे किंवा नाही, याबाबत तपासणी करीता महामंडळाने अंतर्गत अंकेक्षकाची नियुक्ती केलेली आहे.

ब) महामंडळ ठराविक कालावधीच्या अंतराने नियमित साठा तपासणी करीत आहे, आणि

क) व्यवसायावर परीणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी, लबाडी/चोरी आणि चुका शोधुन काढण्यासाठी, महामंडळाच्या मालमत्तेची सुरक्षा, लेख्या संबधीच्या रेकॉर्डमध्ये अचुकता आणण्यासाठी आणि संबंधित वित्तीय माहिती वेळेवर तयार करण्यासाठी महामंडळाने संबंधित पक्ष व्यवहार धोरण व्हीसल ब्लोअर पॉलीसी आणि इतर धोरणांचा अवलंब केलेला आहे.

**२२) महिला लैंगिक छळ (प्रतिबंध आणि तक्रार निवारण) अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रगटीकरण :—**

अहवाल वर्षात महिला लैंगिक छळ (प्रतिबंध आणि तक्रार निवारण) अधिनियम, २०१३ अंतर्गत कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

**२३) लेखापरिक्षकांनी नोंदवलेल्या फसवणुकींच्या संदर्भात तपशील :—**

अहवाल वर्षात लेखा परिक्षकाने कंपनीच्या कारभारात कलम १४३ प्रमाणे कोणत्याही फसवणुकीची नोंद केलेली नाही किंवा नोंदवली नाही. त्यामुळे संचालक मंडळाकडे वरील विषयात/संदर्भात तपशील देण्यासारखे काहीच नाही.

**२४) महत्त्वपुर्ण आणि प्रभाव टाकणारे आदेश :—**

नियामक किंवा न्यायालये किंवा न्यायाधिकरणाव्दारे कंपनीच्या चालु असलेल्या स्थितीवर आणि भविष्यात कामकाजावर परिणाम करणारे कोणतेही महत्वपुर्ण आणि प्रभाव करणारे आदेश दिलेले नाहीत.

**२५) सचिवीय मानकांचे पालन :—**

कंपनीने अहवाल वर्षात लागू असलेल्या सचिवीय मानकांच्या सर्व तरतुदीचे योग्य पालन केलेले आहे.

**२६) कर्मचाऱ्यांचे तपशील :—**

व्यवस्थापकीय कर्मचारी नियम, २०१४ च्या नियम ५(२) अंतर्गत नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वेतन घेणारे कोणतेही कर्मचारी नसल्यामुळे तरतुदी अंतर्गत कोणतेही माहिती दिली जात नाही.

**२७) वार्षिक अहवाल प्रदर्शित करण्यासाठी संकेतस्थळ :—**

कंपनीचे संकेतस्थळ www.mahabeej.com हे आहे आणि या संकेतस्थळावर कंपनीचा वार्षिक अहवाल प्रसिध्द करण्यात आला आहे.

**कृतज्ञता :**

अहवाल वर्षातील उपलब्धी ही महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रामाणिक व सर्वंकष प्रयत्नाचे फळ आहे. या व्यतिरिक्त निम्ननिर्देशीत संस्था व कंपनी प्रती संचालक मंडळ कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

- भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा सातत्याने असणारा पाठींबा व मार्गदर्शनाबाबत.
- राज्य बिज प्रमाणीकरण यंत्रणा
- राष्ट्रीय बिज निगम व अन्य बिज निगम तसेच देशातील सर्व कृषी विद्यापीठे
- आयसीएआर व इक्रीसॅट यांच्या बहुमोल पाठींब्याबाबत
- माजी व वर्तमान संचालक मंडळावरील सहयोगी यांनी दिलेल्या पाठींब्याबाबत व मार्गदर्शनाबाबत.
- महामंडळाचे बॅंकर्स
- महामंडळाचे अंकेक्षक व वकील यांच्या सहकार्या बाबत
- जे सातत्याने आमच्या शक्तीचे स्त्रोत राहीले आहेत असे बिजोत्पादक, बियाणे विक्रेते, आमच्या बियाण्याच्या ब्रॅंड चे प्रस्तुतकर्ते व आश्रयदाते या सर्वांचे
- महामंडळाचे भागधारक की ज्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये महामंडळ वर्षानुवर्षे करीत आलेल्या अथक प्रयत्नांना प्रोत्साहन दिले व विश्वास आणि पाठींबा व्यक्त केला.

**संचालक मंडळाच्या वतीने व करीता**

**(श्री. विकास चंद्र रस्तोगी, भा.प्र.से.)**
**अध्यक्ष**
**DIN:-०८८८१५७३**

**स्थान :— मुंबई**
**दिनांक:— २९/०९/२०२५**

*******

## परिशिष्ट — १

**संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) बाबत विवरण :—**

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. (महाबीज) समाजघटकांच्या सामाजिक व आर्थिक विकासाबाबत कटीबध्द असुन ही जबाबदारी संयुक्त सामाजिक जबाबदारी **(CSR)** धोरणाअंतर्गत अंगीकारलेली आहे. महामंडळाव्दारे संयुक्त सामाजिक जबाबदारी अंतर्गत केल्या गेलेल्या कार्याची सूची खाली देण्यात आलेली आहे. ग्रामीण विकास, शेती कौशल्य वाढविणे, शिक्षणाकरीता प्रोत्साहन, आरोग्याची काळजी, दारिद्रय आणि कुपोषण नष्ट करणे, उपासमारी निर्मुलन, पिण्याकरीता शुध्द पाण्याची उपलब्धता आणि पर्यावरणीय शाश्वतता व समतोल या संयुक्त सामाजिक जबाबदारी **(CSR)** कार्यात महामंडळ विशेष लक्ष देत आहे

**१. संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) समितीचे गठन :—**

| | |
|---|---|
| १— श्री. योगेश कुंभेजकर, भाप्रसे | व्यवस्थापकीय संचालक |
| २— श्री. वल्लभराव टी देशमुख | सभासद |
| ३— डॉ. श्री. रणजित एन. सपकाळ | सभासद |

मागील तीन आर्थिक वर्षातील सरासरी नफा रूपये २,५८६.७० लक्ष

संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) करीता नियोजित खर्च (वरील मुददा क्रं. २ च्या २.०० टक्के) रूपये — **५१.७३** लाख

**२.** अहवाल वर्षामध्ये संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत केलेला खर्च

अ) आर्थिक वर्षामध्ये केलेला एकूण खर्च — महामंडळाने संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) करीता **रू. ५१,७५,३२८/—** खर्चाची बांधीलकी स्विकारलेली आहे.

ब) सन २०२४—२५ या आर्थिक वर्षामध्ये अखर्चित झालेली रक्कम रू. **निरंक**

क) आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये खर्चीत रकमेचा तपशिल:—

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | अधिनियमाच्या अनुसूची VII मधील क्रियाकलापांच्या यादीतील वस्तुसूची | स्थानिक ठिकाण (हो/नाही) | प्रकल्पाचे ठिकाण | | प्रकल्प कालावधी | प्रकल्पासाठी वाटप केलेली रक्कम (रु.मध्ये) | चालु आर्थिक वर्षात खर्च केलेली रक्कम (रु.मध्ये) | कलम १३५(६) नुसार प्रकल्पासाठीन खर्च केलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केलेली रक्कम (रु.मध्ये) | अंमलबजावणीची पद्धत — थेट (हो/नाही) | अंमलबजावणीची पद्धत — अंमलबजावणी एजन्सीद्वारे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | राज्य | जिल्हा | | | | | | नाव | CSR नोंदणी क्रमांक |
| १ | **आरोग्यसेवा आणि महिला सक्षमीकरण** | | हो | महाराष्ट्र | | ८ महिने | २८.३० लक्ष | — | — | नाही | १) संत तुकाराम कॅन्सर हॉस्पीटल, अकोला.<br>२) राष्ट्रीय अंध संघ.<br>३) डॉ. हेडगेवार हॉस्पीटल अकोला. | १) CSR ०००१२९०८<br>२) CSR ००००२७२३<br>३) CSR ०००१४०२१ |
| २ | **शेती कौशल्य प्रोत्साहन — ग्रामीण विकास आणि कल्याण** | | हो | महाराष्ट्र | | १ महिना | १९.८८ लक्ष | — | — | हो | — | — |
| ३ | **शिक्षण प्रोत्साहन** | | हो | महाराष्ट्र | | १ महिना | ९.८५ | — | — | हो | — | — |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | — ग्रंथालयीन पुस्तके | | | | | | लक्ष | | | | |
| | एकूण | | | | | | ४९.२३ लक्ष | | | | |

ड) कर्मचारी पगारावरील वर्षभरातील प्रशासकीय खर्च रु २,५२,००० आहे.

**मागील तीन आर्थिक वर्षासाठी खर्च न केलेल्या सामाजिक दायित्व निधीचा तपशील:**

| अ. क्र. | मागील आर्थिक वर्ष | कलम १३५(६) अंतर्गत न खर्च केलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केलेली रक्कम (रु. मध्ये) | आर्थिक अहवाल वर्षात खर्च केलेली रक्कम (रु. मध्ये) | कलम १३५(६) नुसार अनुसूची VII अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निधीमध्ये हस्तांतरित केलेली रक्कम, इतर काही. | | | पुढील आर्थिक वर्षांमध्ये खर्च करायची शिल्लक रक्कम. (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निधीचे नाव | रक्कम (रु. मध्ये) | हस्तांतरनाची तारीख | |
| १ | २०२१—२२ | ५०,००,००० | १७,८५,००० | — | — | — | निरंक |
| २ | २०२२—२३ | निरंक | ४९,९३,२९७ | — | — | — | निरंक |
| ३ | २०२३—२४ | निरंक | ५१,७५,३२८ | — | — | — | निरंक |

३. **खर्च न झाल्याबद्दल स्पष्टीकरण**

कंपनीने चालू आर्थिक वर्ष २०२४—२५ या वर्षात संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) निधी पुर्णपणे खर्च करण्यात आला आहे. संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) अखर्चित निधी शून्य आहे.

४. आम्ही संयुक्त सामाजिक जबाबदारी (CSR) विषयक धोरणाचा पाठपुरावा व देखरेख करीत आहोत, ज्यायोगे या बाबीचे धोरण व उद्दीष्ट साध्य करता येईल.

*******

# परिशिष्ट — २

## फॉर्म नं. एम जी टी — ९
## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित चे
## वार्षिक अहवालाचे निष्कर्ष
## दि. ३१.०३.२०२५ रोजी अखेर

*(कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९२(३) च्या अनुषंगाने आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) २०१४ च्या नियम १२ (१) नुसार)*

### १. नोंदणी आणि इतर तपशिल:—

| | |
|---|---|
| १. नोंदणी क्र./संख्या | U01200MH1976SGC018990 |
| २. नोंदणी दिनांक | २८ एप्रिल, १९७६ |
| ३. कंपनीचे नाव | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित |
| ४. कंपनीचा वर्ग/उपवर्ग | राज्य शासनाव्दारे अंगीकृत कंपनी |
| ५. नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्काचा तपशिल | ''महाबीज भवन'' कृषिनगर, अकोला—४४४१०४ |
| ६. कंपनी सुचीबध्द आहे काय? | नाही |
| ७. नोंदणी व हस्तांतर एजन्सीची माहिती | बिगशेअर सर्व्हिसेस प्राइवेट लिमीटेड १ला माळा, भारत टिनवर्कस बिल्डीग, अंधेरी ईस्ट मुंबई—४०००५९ |
| ८. आंतरराष्ट्रीय सिक्युरिटीज ओळख क्रमांक(आयसीन) डिपॉझिटरी— सीडिएसएल | INE04Q501018 |

### २. महामंडळाचा मुख्य व्यवसाय व कार्य :—

महामंडळाची एकुण उलाढाल १० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असलेल्या व्यवसाय व कार्याबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे .

| अ. क्र. | मुख्य उत्पादन/सेवांचे विवरण | उत्पादन व सेवांचा एनआयसी कोड | महामंडळाच्या उलाढालीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बियाणे उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन | १२०९९९० | १०० टक्के |

### ३. दुय्यम व सहाय्यक सहकारी कंपनीधारकांचा तपशिल:—

| अ. क्र. | कंपनीचे नाव व पत्ता | सीआयएन | धारक/दुय्यम /सहाय्यक | समभागाची टक्केवारी | लागु कलम |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय बिज निगम मर्या.(**NSC**) | **U74899DL1963GOI003913** | सहाय्यक | ३५.४४ टक्के | |

* महामंडळाच्या एकूण समभागापैकी राष्ट्रीय बिज निगम मर्या यांचा ३५.४४ वाटा आहे

### ४. समभाग धारकांचा आकृतीबंध (समभाग भांडवल वर्गवारी समभागाची टक्केवारी)

#### १) समभागधारक वर्गवारी

| समभाग धारकांचा वर्ग | वर्षाच्या सुरुवातीला असलेली समभागाची संख्या | | | | वर्षाच्या शेवटी असलेली समभागाची संख्या | | | | वर्षात बदललेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गैरभौतीक | भौतीक | एकूण | एकूण टक्केवारी | गैरभौतीक | भौतीक | एकूण | एकूणभागाची टक्केवारी | |
| **अ) प्रवर्तक** | | | | | | | | | |
| **१ ) भारतीय** | | | | | | | | | |
| अ) वैयक्तिक | | | | | | | | | |
| ब) केंद्र सरकार व | -- | १४८३३० | १४८३३० | ३५.४४ | | १४८३३० | १४८३३० | ३५.४४ | लागु नाही |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त्यांची संस्था | | | | | | | | | |
| क) राज्य सरकार व त्यांची संस्था | — | २०५००० | २०५००० | ४९.०० | | २०५००० | २०५००० | ४९.०० | लागु नाही |
| ड) संस्था / महामंडळ (ब व क व्यतिरिक्त) | — | ० | ० | | | ० | ० | ० | लागु नाही |
| इ) बँका / वित्तीय संस्था | — | ० | ० | | | ० | ० | ० | लागु नाही |
| फ) इतर | — | | | | | | | ० | लागु नाही |
| **एकूण अ(१)** | — | **३५३३३०** | **३५३३३०** | **८४.४४** | | **३५३३३०** | **३५३३३०** | **८४.४४** | लागु नाही |
| **२) विदेशी** | | | | | | | | | |
| अ) अनिवासी व्यक्ती | — | ० | ० | ० | | ० | ० | ० | लागु नाही |
| ब) इतर व्यक्ती | — | ० | ० | ० | | ० | ० | ० | लागु नाही |
| क) संस्था / महामंडळ | — | ० | ० | ० | | ० | ० | ० | लागु नाही |
| ड) बँका / वित्तीय संस्था | — | ० | ० | ० | | ० | ० | ० | लागु नाही |
| इ) इतर | — | ० | ० | ० | | ० | ० | ० | लागु नाही |
| **एकूण (अ ) २** | — | ० | ० | ० | | ० | ० | ० | |
| **एकूण प्रवर्तक भागधारक अ—१ + अ—२** | — | **३५३३३०** | **३५३३३०** | **८४.४४** | | **३५३३३०** | **३५३३३०** | **८४.४४** | लागु नाही |
| **ब) सार्वजनिक भागधारक** | | | | | | | | | |
| **१) संस्था** | | | | | | | | | |
| अ) म्युच्युअल फंड | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| ब) बँक / संस्था | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| क) केंद्र सरकार | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| ड) राज्य सरकार | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| इ) जोखीम भांडवली फंड | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| फ) विमा कंपन्या | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| ग)एफआयआय | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| ह)विदेशी जोखीम भांडवली फंड | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| इतर — गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी | १८०८२ | — | १८०८२ | ४.३२ | १७९५५ | — | १७९५५ | ४.२९ | ०.०३ |
| **एकूण ब—१** | — | ० | ० | ० | १८०८२ | — | १८०८२ | ४.३२ | ४.३३ |
| **२) गैर संस्था** | | | | | | | | | |
| **अ) कार्पोरेट संस्था** | | | | | | | | | |
| १) भारतीय | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| २) विदेशी | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| **ब ) वैयक्तिक** | | | | | | | | | |
| १) रू. एक लाखापर्यंत भाग धारण केलेले वैयक्तिक भागधारक | **१०९** | **३४९२१** | **३५०३०** | **८.३८** | **२४९** | **३४९०८** | **३५१५७** | **८.४१** | ०.०३ |
| २) रू. एक लाखापेक्षा जास्त भाग धारण केलेले वैयक्तिक भागधारक | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| **क)इतर** | — | **१२००३** | **१२००३** | **२.८६** | — | **१२००३** | **१२००३** | **२.८६** | लागु नाही |
| **एकूण ब—२** | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| **एकूण ब—१ + ब—२** | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |
| **क) जीडीआर व** | — | ० | ० | ० | — | ० | ० | ० | लागु नाही |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एडीआर यांच्या ताब्यातील भाग | | | | | | | | | |
| एकूण अ + ब+ क | १८१ ९१ | ४००२५४ | ४१८४४५ | १०० | १८२०४ | ४००२४१ | ४१८४४५ | १०० | लागु नाही |

## २) भागधारकांची सूची

| अ. क्र. | भागधारकाचे नाव | वर्षाच्या सुरूवातीला धारण भाग | | | वर्षाच्या शेवटी धारण भाग | | | वर्षातील बदलाचे प्रतीशत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भागाची संख्या | कंपनीच्या भागाची टक्केवारी | भागावरील तारण/ प्रभार टक्केवारी | भागाची संख्या | कंपनीच्या भागाची टक्केवारी | भागावरील तारण/ प्रभार टक्केवारी | |
| १ | महाराष्ट्र शासन | २०५००० | ४९.०० | लागु नाही | २०५००० | ४९.०० | लागु नाही | निरंक |
| २ | राष्ट्रीय बिज निगम मर्या. | १४८३३० | ३५.४४ | लागु नाही | १४८३३० | ३५.४४ | लागु नाही | निरंक |
| ३ | कृषी विद्यापीठे | १२००३ | २.८६ | लागु नाही | १२००३ | २.८६ | लागु नाही | निरंक |
| ४ | शेतकरी | ३५००० | ८.३७ | लागु नाही | ३५१५७ | ८.४१ | लागु नाही | ०.०१ |
| ५ | गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी | १८११२ | ४.३३ | लागु नाही | १७९५५ | ४.२९ | लागु नाही | ०.०१ |
| | एकूण | ४१८४४५ | १००.०० | | ४१८४४५ | १००.०० | | लागु नाही |

## ३) प्रवर्तकांच्या भागधारणामधील बदल (बदल नसेल तर स्पष्ट करा)

| अक्र | दिनांक | शेरा | भागांची संख्या | वर्षामध्ये संचीत भाग धारण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागाची टक्केवारी |
| काही नाही | | | | | |

## ४) उच्चतम श्रेणीतील पहिल्या दहा भागधारकांचा आकृतीबंध (प्रवर्तक, संचालक,जीडीआर,एडीआर या धारकांव्यतिरिक्त)

| अ.क्र | शेरा | भागांची संख्या | वर्षामध्ये संचित भाग धारण | |
|---|---|---|---|---|
| | | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागाची टक्केवारी |
| १ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला. | ४००१ | ४००१ | ०.९५ |
| २ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | ४००१ | ४००१ | ०.९५ |
| ३ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | ४००१ | ४००१ | ०.९५ |
| ४ | श्री दिवाकर शामराव धोत्रे | ८३ | ८३ | ०.०१ |
| ५ | श्री शिवाजी रघुत्तमराव देशमुख | ७० | ७० | ०.०१ |
| ६ | श्री रोहन प्रकाशराव काकड | ७० | ७० | ०.०१ |
| ७ | श्री विनोद रामकृष्ण इंगळे | ६० | ६० | ०.०१ |
| ८ | श्री बाबाराव यशवंतराव विखे | ५३ | ५३ | ०.०१ |
| ९ | श्री उमेश हरी पाटील | ५२ | ५२ | ०.०१ |
| १० | श्रीमती विमल दामोधर राऊत | ५० | ५० | ०.०१ |

५) संचालक व व्यवस्थापनातील वरिष्ठ व्यक्ती यांनी धारण केलेले भाग

| अ. क्र. | दिनांक | शेरा | भागांची संख्या | वर्षामध्ये संचित भाग धारण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागाची टक्केवारी |
| | | श्री वल्लभराव तेजराव देशमुख | | | |
| १ | ०१/०४/२०२४ | वर्षाच्या सुरुवातीस धारण केलेले भाग | | ३ | ०.००१ |
| २ | ३१/०३/२०२५ | वर्षाच्या अखेरीस धारण केलेले भाग | | ३ | ०.००१ |
| | | डॉ. श्री रणजित एन. सपकाळ | | | |
| १ | ०१/०४/२०२४ | वर्षाच्या सुरुवातीस धारण केलेले भाग | | १० | ०.००१ |
| २ | ३१/०३/२०२५ | वर्षाच्या अखेरीस धारण केलेले भाग | | १० | ०.००१ |

**ऋणबध्दता**

महामंडळावरील व्याजासहीत कर्ज थकीत/मिळविलेले परंतु शोधनदेय नसलेले.

| विवरण | ठेवी वगळता सुरक्षित कर्ज | असुरक्षित कर्ज | ठेवी | एकूण ऋणबध्दता |
|---|---|---|---|---|
| वर्षाच्या सुरुवातीला ऋणबध्दता<br>अ) मुळ रक्कम<br>ब) व्याज देय परंतु अशोधित<br>क) व्याज प्राप्त परंतु देय नाही | नाही | नाही | नाही | |
| **एकुण अ+ब+क** | | **नाही** | **नाही** | |
| आर्थिक वर्षामध्ये ऋणबध्दता बदल<br>— वाढ<br>— घट | नाही | नाही | नाही | |
| आर्थिक वर्षाचे शेवटी ऋणबध्दता<br>१ मुळ रक्कम<br>२ व्याज देय परंतु अशोधित<br>३ व्याज प्राप्त परंतु देय नाही | नाही | नाही | नाही | |
| **एकूण १+२+३** | **नाही** | **नाही** | **नाही** | |

**६) संचालक आणि व्यवस्थापनातील वरिष्ठ व्यक्ती यांना दिलेले मानधन**

**अ) व्यवस्थापकीय संचालक/पूर्णवेळ संचालक/किंवा व्यवस्थापक यांना दिलेले मानधन**

| अक्र | आर्थिक मानधनाचा तपशिल | व्यवस्थापकीय संचालक/पुर्णवेळ संचालक/किंवा व्यवस्थापक यांचे नाव | एकूण रूपये लाखात |
|---|---|---|---|
| १ | एकूण सकल वेतन<br>आयकर कायदा १९६१ च्या कलम १७(१) तरतुदीनूसार वेतन,<br>आयकर कायदा, १९६१ च्या कलम १७(२) तरतुदीनुसार इतर प्राप्ती<br>आयकर कायदा, १९६१ च्या कलम १७(३) तरतुदीनुसार वेतनाऐवजी इतर लाभ. | १) श्री सचिन कलंत्रे, (भाप्रसे)<br>रू. ९,६१,०००/—<br>२) श्री. योगेश कुंभेजकर (भाप्रसे)<br>रू. ८,७५,०००/— | रू.१८,३६,०००/— |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | सामान्य पर्याय | — | — |
| ३ | सामान्य पारिश्रमिक | — | — |
| ४ | कमीशन<br>लाभाचे प्रतीशत<br>प्रवास भत्ते | —<br><br>रू. ३,१७,०००/— | —<br><br>रू. ३,१७,०००/— |
| | **एकूण अ** | रू. २१,५३,०००/— | रू २१,५३,०००/— |
| | **कायद्यानुसार कमाल मर्यादा** | — | — |

**ब) इतर संचालकांचे मानधन**

| अ. क्र. | मानधनाचा तपशिल | संचालकाचे नाव | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | डॉ. रणजित एन.सपकाळ | श्री वल्लभराव टी. देशमुख | |
| १ | स्वतंत्र संचालक<br>• बोर्ड समिती सभा उपस्थिती शुल्क<br>• कमिशन<br>• इतर चार्जेस | —— | —— | —— |
| | **एकूण १** | —— | —— | —— |
| २ | इतर अकार्यकारी संचालक बोर्ड समिती सभा उपस्थिती शुल्क | रु. ११,०००<br>रु. ४,००० | रु. १२,०००<br>रु. १,३४,००० | रु. १,६१,००० |
| | **एकूण २** | **रु. १५,०००** | **रु. १,४६,०००** | **रु. १,६१,०००** |
| | एकूण (ब) = १+२ | | | |
| | **संचालकांचे एकूण मानधन** | | | |
| | **कायद्याप्रमाणे मर्यादा** | | | **मर्यादेच्या आत** |

**क) व्यवस्थापकीय संचालक/पूर्णवेळ संचालक/व्यवस्थापक यांचे व्यतिरिक्त इतर व्यवस्थापनातील प्रमुख व्यक्तींना दिलेले मानधन**

| अ.क्र | मानधनाचा तपशिल | संचालकाचे नाव | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वेतन | विनय वर्मा, कंपनी सचिव | रू. १९.३० लाख |

**७) दंड/शिक्षा/आपसी समझोत्याने मिटविलेले गुन्हे**

| प्रकार | कंपनी कायद्याचे कलम | विस्तृत विवरण | दंड/शिक्षा /आपसी समझौता शुल्क | न्यायालयाचे नाव | अपील |
|---|---|---|---|---|---|
| | | | **अ— महामंडळ** | | |
| दंड | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| शिक्षा | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| आपसी समझोता | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| | | | **ब ) संचालक** | | |
| दंड | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| शिक्षा | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| आपसी समझोता | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| | | | **क ) इतर अधिकारी** | | |
| दंड | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| शिक्षा | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| आपसी समझोता | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

## परिशिष्ट — ३

## संचालक मंडळाच्या बैठकीसंबंधी माहिती

### संचालक मंडळातील बदल

सद्यस्थितीत संचालक मंडळावर ८ सभासद आहेत

अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळावरील खालील संचालक निवृत्त झाले असून, महामंडळाच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेला बहुमूल्य पाठींबा, दिलेल्या सेवा, मार्गदर्शन इत्यादी बाबत महामंडळ त्यांचे आभारी आहे.

| अ. क्र | संचालकाचे नाव | पदनाम | नियुक्तीची दिनांक | सेवानिवृत्तीची दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती. इडझे अंगमो कुंदन, भाप्रसे | अध्यक्षा | १९/०३/२०२४ | १८/०६/२०२४ |
| २ | श्रीमती. व्ही. राधा, भाप्रसे | अध्यक्षा | २४/०६/२०२४ | १३/०८/२०२४ |
| ३ | श्री. रविंद्र बिनवडे, भाप्रसे | संचालक | २५/०६/२०२४ | ३१/१२/२०२४ |
| ४ | श्रीमती. जयश्री भोज, भाप्रसे | अध्यक्षा | १३/०८/२०२४ | ०२/०१/२०२५ |

### आर्थिक वर्ष २०२४—२५ मधील संचालकांची नियुक्ती

| अ.क्र | संचालकाचे नाव | पदनाम | नियुक्तीची दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. व्ही. राधा, भाप्रसे | अध्यक्षा | २४/०६/२०२४ |
| २ | श्री. रविंद्र बिनवडे, भाप्रसे | संचालक | २५/०६/२०२४ |
| ३ | श्रीमती. जयश्री भोज, भाप्रसे | अध्यक्षा | १३/०८/२०२४ |
| ४ | श्री. योगेश कुंभेजकर, भाप्रसे | व्यवस्थापकीय संचालक. | १७/०९/२०२४ |
| ५ | श्री. सुरज मांढरे, भाप्रसे | संचालक | ३१/१२/२०२४ |
| ६ | श्री. विकास चंद्र रस्तोगी, भाप्रसे | अध्यक्ष | ०२/०१/२०२५ |

### संचालक मंडळ सभा

अहवाल वर्ष २०२४—२५ मध्ये संचालक मंडळाच्या खालील प्रमाणे ४ सभा झाल्या

| अ.क्र. | संचालक मंडळ सभा क्र. | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २१७ वी सभा | ०८ जुलै, २०२४ | मंत्रालय, मुंबई |
| २ | २१८ वी सभा | २५ सप्टेंबर, २०२४ | मंत्रालय, मुंबई |
| ३ | २१९ वी सभा | २१ डिसेंबर, २०२४ | महाबीज भवन, अकोला |
| ४ | २२० वी सभा | २१ मार्च, २०२५ | महाबीज भवन, अकोला |

### संचालक मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थिती

| अ. क्र. | संचालकाचे नाव | संचालक मंडळ सभा | उपसमिती सभा | मागील ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरीता उपस्थिती दि. २१ डिंसेबर, २०२४ |
|---|---|---|---|---|
| | | एकूण ४ | एकूण १७ | एकूण १ |
| | | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती |
| १ | श्रीमती. व्ही. राधा, भाप्रसे | १ | लागु नाही | लागु नाही |
| २ | श्रीमती. जयश्री भोज, भाप्रसे | २ | लागु नाही | नाही |
| ३ | श्री. विकास चंद्र रस्तोगी, भाप्रसे | १ | लागु नाही | लागु नाही |
| ४ | श्री. रावसाहेब भागडे, भाप्रसे | १ | लागु नाही | होय |
| ५ | श्री. सुरज मांढरे, भाप्रसे | १ | लागु नाही | लागु नाही |
| ६ | श्री. अजित कुंभार, भाप्रसे | १ | ० | लागु नाही |
| ७ | श्री. सचिन कलंत्रे, भाप्रसे | ० | ७ | लागु नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | श्री. योगेश कुंभेजकर, भाप्रसे | ३ | १० | होय |
| ९ | श्री. वल्लभराव टी. देशमुख | ४ | १७ | होय |
| १० | डॉ. रणजित एन. सपकाळ | ४ | १५ | होय |
| ११ | डॉ. सौ. मनिंदर कौर व्दिवेदी, भाप्रसे | ० | लागु नाही | नाही |
| १२ | श्री. पि. के. पटनाईक | ० | लागु नाही | नाही |
| १३ | श्री. हेमंत सी. चिमुरकर | २ | ३ | होय |

*******

## फॉर्म नं. एओसी—२

**(कंपनी कायदा २०१३ चे कलम १३४, पोटकलम ३ च्या उपबंध (एच) आणि कंपनी (लेखा) नियम २०१४, च्या नियम ८(२) अन्वये)**

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८८ (१) नुसार महामंडळाने संबंधित पक्षकारांशी केलेले करार/व्यवहार/व्यवस्था व सलगी तत्वावर केलेल्या व्यवहारांचे निवेदन

१. सलगी न करण्याच्या तत्वावर केलेले करार किंवा व्यवस्था किंवा व्यवहारांचा तपशिल — नाही
२. सलगी तत्वावर केलेले करार किंवा व्यवस्था किंवा व्यवहारांचा तपशिल:—

| अ.क्र | तपशिल | विवरण |
|---|---|---|
| १ | संबंधित पक्षकारांचे नाव आणि नातेसंबंधाचा प्रकार | श्री.व्ही.टी.देशमुख, संचालक<br>श्री.बी.व्ही.देशमुख श्री.व्ही.टी.देशमुख यांचा मुलगा<br>श्री.डी.व्ही.देशमुख श्री.व्ही.टी.देशमुख यांचा मुलगा<br>श्री.एच.व्ही.देशमुख श्री व्ही.टी.देशमुख यांचा मुलगा<br>श्रीमती एन.व्ही.देशमुख श्री.व्ही.टी.देशमुख यांची पत्नी<br>श्रीमती एस.बी.देशमुख श्री.व्ही.टी.देशमुख यांची सुन<br>श्रीमती पी.डी.देशमुख श्री.व्ही.टी.देशमुख यांची सुन<br>डॉ. श्री. रणजित ना. सपकाळ, संचालक<br>राष्ट्रीय बिज निगम दिल्ली |
| २ | करार/व्यवस्था/व्यवहारांचा प्रकार | बियाणे खरेदी/विक्री |
| ३ | करार/व्यवस्था/व्यवहारांचा कालावधी | एक वर्ष |
| ४ | करार किंवा व्यवस्था किंवा व्यवहारांचे ठळक वैशिष्टे व किंमत | सन २०२४—२५ मध्ये रू. २.१९ लाख रुपयाचे बियाणे विक्री व रू. २४.९८ लाख रुपयाचे बियाणे खरेदी<br>राष्ट्रीय बिज निगम यांना रू. १४९.८४ लाख रुपयाचे बियाणे विक्री |
| ५ | संचालक मंडळाच्या मान्यतेचा दिनांक | लागु नाही |
| ६ | अग्रीम राशीचे शोधन केले असल्यास | लागु नाही |

**संचालक मंडळाच्या वतीने व करीता**

**(श्री. विकास चंद्र रस्तोगी, भा.प्र.से.)**
**अध्यक्ष**
**DIN:-०८८८१५७३**

**स्थान :— मुंबई**
**दिनांक:— २९/०९/२०२५**

## संचालकांच्या अहवाला करिता परिशिष्ट

## वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर भागधारकांना खुलासा

## वर्ष २०२४—२०२५

| निरीक्षण क्रमांक | उत्तर |
|---|---|
| १ अ | लेखापरीक्षकांच्या निरीक्षणांना प्रतिसाद म्हणून, आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की हे समायोजन सद्भावनेने केले गेले आहेत आणि दस्तऐवजीकरण केलेल्या नोंदीद्वारे समर्थित आहेत, ज्यामुळे महामंडळाच्या आर्थिक अहवालाची पारदर्शिता सुनिश्चित होते. |
| १ब | लेखापरीक्षकांच्या निरीक्षणांना प्रतिसाद म्हणून, आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की हे समायोजन सद्भावनेने केले गेले आहेत आणि दस्तऐवजीकरण केलेल्या नोंदीद्वारे समर्थित आहेत, ज्यामुळे महामंडळाच्या आर्थिक अहवालाची पारदर्शिता सुनिश्चित होते. |
| १क | लेखापरीक्षकांच्या निरीक्षणांना प्रतिसाद म्हणून, आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की हे समायोजन सद्भावनेने केले गेले आहेत आणि दस्तऐवजीकरण केलेल्या नोंदीद्वारे समर्थित आहेत, ज्यामुळे महामंडळाच्या आर्थिक अहवालाची पारदर्शिता सुनिश्चित होते. |
| बाबींवर लक्ष | |
| १ अ | गेल्या वर्षी शिल्लक रक्कम ६८.४३ लाख रूपये होती आणि चालू आर्थिक वर्षात ही रक्कम ६८.५९ लाख रूपये झाली आहे. बँक खात्यांमध्ये ओळख पटू न शकणारे ही रक्कम बिजोत्पादक/पार्टीच्या नावाशी संबंधित आहे यासाठी बँकेकडे स्पष्टीकरणासाठी पाठपुरावा केला जात आहे. |
| १ ब | गेल्या वर्षी शिल्लक रक्कम २३.२८ लाख रूपये होती आणि ती आता कमी होऊन २.२० लाख रूपये आहे. चालू आर्थिक वर्षात आम्ही आवश्यक समायोजन/लेखी बंद (write off)/लेखा नोंदी खात्यात करण्यात येईल. |
| २ | कर्मचाऱ्यांची कमतरता आणि कार्यरत पातळीवर मर्यादित लेखा कौशल्यामुळे विलंब होत आहे. भरती प्रक्रिया सुरू आहे आणि खात्यांचे वेळेवर अंतिमीकरण सुनिश्चित करण्यासाठी नवीन ERP प्रणालीचे काम प्रगतीपथावर सक्रियपणे सुरू आहे. |
| ३ | चालू आर्थिक वर्षात या समस्येचे निराकरण करण्यासाठी, प्रक्रियांची स्वतंत्र आणि सखोल तपासणी सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण अंतर्गत लेखापरीक्षण बाहयस्त्रोत एजन्सीव्दारे केले गेले आहे. आम्ही या वर्षी अंतर्गत लेखापरीक्षण कार्य अधिक मजबूत करू. |
| ४ | आम्ही मान्य करतो की महामंडळाच्या संचालक मंडळात सध्या स्वतंत्र संचालकचा समावेश नाही आणि नियामक आवश्यकतांनुसार स्वतंत्र संचालक नियुक्त करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील. |
| ५ | सदर माहितीची नोंद घेण्यात आली आहे. व्यवस्थापनाने या संदर्भात आवश्यक ती कारवाई सुरू केली आहे आणि नवीन ERP प्रणालीचे काम प्रगतीपथावर सक्रियपणे सुरू आहे. |

| | | |
|---|---|---|
| **मनिष यादव** | **बुवनेश्वरी एस., भा.प्र.से.** | **विकास चंद्र रस्तोगी, भा.प्र.से.** |
| **महाव्यवस्थापक (वित्त)** | **व्यवस्थापकीय संचालक** | **अध्यक्ष** |

**राम ठक्कर अँड असोसिएट्स**
**व्यावसायिक कंपनी सचिव**
**अकोला**

## सचिवीय अंकेक्षण अहवाल

**दि. ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरीता**
**{कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २०४(१) आणि कंपनी**
**(व्यक्तीची नियुक्ती आणि मानधन) नियम २०१४ च्या नियम ९ अनुसार}**

प्रति,
मा.सभासद
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या.
CIN:- U01200MH1976SGC018990
पत्ता:— महाबीज भवन, कृषी नगर,
अकोला— ४४४१०४
Email:- hocs@mahabeej.com

आम्ही महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित या कंपनीचे सचिवीय अंकेक्षण केलेले आहे ज्यांनी वैधानिक तरतुदींचे पालन चांगल्या प्रकारे केलेले आहे. सचिवीय अंकेक्षण, आम्हाला पुरविण्यात आलेल्या सर्व बाबींचे योग्य मुल्यांकन/वैधानिक पुर्तता आणि त्यावरील आमचे मत अशा पध्दतीने नोंदविण्यात आले आहे.

महामंडळाचे अभिलेखे, दस्तऐवज, इतिवृत्त नोंदवही, नमुने आणि भरलेली विवरणे याची आम्ही केलेली तपासणी आणि सचिवीय अंकेक्षणादरम्यान महामंडळाने, त्यांच्या अधिकाऱ्यांनी, एजंट व अधिकृत प्रतिनिधी यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे आम्ही याद्वारे विधान करतो की, दि. ३१ मार्च, २०२५ रोजी संपणारे लेखापरीक्षित वर्षामध्ये महामंडळाने निम्ननिर्देशीत यादीप्रमाणे वैधानिक तरतूदींची पूर्तता केलेली आहे आणि महामंडळामध्ये योग्य संचालक मंडळ प्रक्रिया आणि त्याच्या पूर्ततेची योग्य व्यवस्था आहे. त्यासंबंधीचा आमचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

दि. ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने ठेवलेले अभिलेखे, दस्तऐवज, इतिवृत्त नोंदवहया, नमुने आणि भरलेली विवरणे आणि इतर अभिलेखे याची आम्ही केलेली तपासणी कायद्यातील तरतूदीप्रमाणे आहे.

आम्ही महामंडळास लागु असलेल्या कायद्याच्या संबंधित तरतुदींची पुर्तता केल्याची बाब महामंडळाच्या संबंधित विभाग प्रमुखांनी दिलेल्या पूर्तता प्रमाणपत्रावर आधार मानून तपासलेली आहे.

(i) कंपनी कायदा, २०१३ आणि त्या अंतर्गत असलेले नियम
(ii) इतर कायदे विशेषत: लागु असलेले
- बियाणे कायदा.

अहवाल वर्षामध्ये महामंडळाने निम्ननिर्देशीत बाबींव्यतिरिक्त वर नमुद केल्यानुसार सर्वच अधिनियम, नियम, कायदे, मार्गदर्शक बाबी, मानके, इत्यादींच्या तरतूदींचे पुर्णपणे पालन केलेले आहे.

१. कंपनी (संचालकांची नियुक्ती आणि पात्रता) नियम, २०१४ च्या नियम ४ सह कलम १४९(४) च्या तरतुदीनुसार, स्वतंत्र संचालकाच्या नियुक्तीची तरतुद महामंडळाला लागू आहे, परंतु महामंडळाने सदर नियुक्त्या केलेल्या नाहीत.

२. कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १७७ च्या तरतुदीनुसार, संचालक मंडळाने मागील काळात अंकेक्षण समितीच्या रचनेला मंजुरी दिलेली आहे. मात्र समितीचे कामकाज स्वतंत्र संचालकाच्या नियुक्तीनंतरच चालु होईल, समितीमधील सदस्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविलेला असुन याबाबत शासनाच्या सुचना व मताची प्रतीक्षा आहे.

३. कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १७८ च्या तरतुदीनुसार, संचालक मंडळाने मागील काळात ''निर्मिती नामनिर्देशन आणि मानधन समिती'' (फॉर्मेशन नॉमीनेशन अँन्ड रिम्युनरेशन कमिटी) च्या रचनेला मंजुरी दिलेली आहे. मात्र समितीचे कामकाज स्वतंत्र संचालकांच्या नियुक्तीनंतरच चालु होईल, की ज्याच्या नावाचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविलेला असुन याबाबत शासनाच्या सुचना व मताची प्रतीक्षा आहे.

४. महामंडळाच्या आर्टिकल ऑफ असोसिएशनच्या तरतुदीनुसार वर्षभरात बहुतेक संचालकांना त्याच्या पदसिध्द क्षमतेनुसार नियुक्त केल्या जाते, जेव्हा हे संचालक पदसिध्द पदावर नियुक्त केले जातात व नंतर सोडून जातात अशा काही संचालकाची एमसीए सोबत नियुक्ती आणि अधिभार भरण्याची प्रकिया पुर्ण झाली नाही, याचे कारण संबधित संचालकाकडून डीन क्रमांकाची उपलब्धता नसणे असे स्पष्ट करण्यात आले.

५. महामंडळाकडे वेगवेगळया ठिकाणी अनेक कारखाने आहेत, जिथे कारखाने अधिनियमानूसार नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यापैकी काही कारखान्यांची नोंदणी अद्याप पूर्ण करावयाची आहे.

६. महामंडळाने पॉश कायद्याअंतर्गत २०२५ वर्षासाठी वार्षिक रिर्टन भरलेले नाही.

**कार्यासंबंधीची चांगली पध्दत/रित हयाबाबत दिलेल्या सुचना :**

आम्ही केलेल्या अंकेक्षण प्रक्रीये दरम्यान, महामंडळाला लागु असलेले नियम व कायदे यातील तरतुदींचे योग्य रीतीने पाठपुरावा आणि पुर्तता करण्याकरीता संचालक मंडळासमोर या बाबी स्वतंत्रपणे त्यांच्या माहितीसाठी व मंजुरीसाठी सादर करून त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

**आम्ही पुढील अहवाल सादर करतो की,**

संचालक मंडळाची रचना आर्टीकल ऑफ असोसीएशन च्या तरतुदीनुसार करण्यात आली आहे व महामंडळ पदसिध्द (Ex-officio) नियुक्त्या यात्र तरतुदीनुसार करत आहे. महामंडळाने स्वतंत्र संचालकाच्या नियुक्तीचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविलेला असुन याबाबत शासनाच्या सुचना व मताची प्रतीक्षा आहे. आढावा कालावधीत काही प्रसंगी संचालक मंडळाच्या रचनेत आर्टीकल ऑफ असोसिएशन च्या तरतुदीनुसार बदल घडुन आले आणि याबाबत आवश्यकतेनुसार कंपनी कायद्यानुसार अहवाल देण्यात आले,

संचालक मंडळाच्या ठरलेल्या सभेपुर्वी सभेची सुचना व विषयसूची संचालकांना सात दिवसापुर्वी टपालाने, ई मेलद्वारे आणि अस्तित्वात असलेल्या पध्दतीद्वारे विषयसुचीवर संचालक मंडळाचे सभेपुर्वी त्यांचेकडुन माहिती, सुचना काही स्पष्टता मागविण्याकरीता व त्याचा सभेमध्ये योग्य सहभाग रहावा या करिता पाठविण्यात आल्या आहेत.

सभेचे इतिवृतामध्ये बहुमताने घेतलेले निर्णय व सभासदांची संबंधित विषयावरील मतभिन्नतेचा समावेश करण्यात आला.

आम्ही अहवाल सादर करतो की, महामंडळाला लागु असलेल्या विविध नियम, कायदे, मार्गदर्शक बाबी यांची पुर्तता करण्यात आली आहे. आमचे असे मत आहे की, विविध नियम, कायदे, मार्गदर्शक बाबी यांच्या तरतुदींची पुर्तता ही भिन्न अधिकारी व विभाग प्रमुख यांचेमार्फत समर्थपणे व्हावी. विकेंद्रीत पध्दतीपेक्षा केंद्रीभुत पध्दतीचा अवलंब केल्यास याचा प्रभाव व पुर्तता वेळेवर होईल.

आम्ही अहवाल सादर करतो की, अंकेक्षण कालावधी दरम्यान महामंडळाकडे उपरोक्त उल्लेखित विविध नियम, कायदे, मार्गदर्शक तत्वे, आणि निश्चित मानके यांच्या अनुषंगाने महामंडळाच्या घडामोडीवर गोष्टीवर मोठा परिणाम असणारा कोणताही विशिष्ट कार्यक्रम/क्रिया नाहीत.

**स्वाक्षरी**

**राम ठक्कर ॲंड असोसीएटस्**
Mem, No-7452
C P No- 4903
UDIN : F007452G001600637
PBUINO:S2004MH073700

ठिकाण — अकोला
दिनांक — १७/१०/२०२५

# स्वतंत्र अंकेक्षकांचा अहवाल

सन्माननीय सभासद,
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या.
महाबीज भवन, कृषी नगर,अकोला ४४४ १०४

## वित्तीय विवरणांच्या लेखापरिक्षणा बाबतचा अहवाल

### पात्र मत

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. याचा दि. ३१ मार्च, २०२५ रोजीचा ताळेबंद व त्यात सम्मीलीत असलेले वर्ष अखेरचे नफा–तोटा पत्रक (विस्तृत/सर्वसमावेशक सर्व उत्पन्नासह), भागभांडवलात बदल आणि रोख प्रवाह विवरणा मधील बदलासह आणि महत्वपूर्ण लेखा धोरणाचा संक्षिप्त अहवाल आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती या वित्तीय विवरणाचे आम्ही अंकेक्षण केलेले आहे. (यांनतर "स्वतंत्र वित्तीय विवरण" असे संबोधित करण्यात येईल)

आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार वित्तीय विवरणे आणि उपरोक्त प्राप्त मताच्या वर्णन केलेल्या बाबी वगळता दिलेली माहिती कंपनी कायदा २०१३ च्या आवश्यक मानकानुसार सत्य आणि प्रामाणिक दृष्टीकोन प्रदान करणारे व भारतामध्ये मान्य असलेल्या लेखा तत्वाप्रमाणे आहेत याची खात्री केलेली आहे. त्यात भारतामध्ये स्विकार्य असणाऱ्या लेखांकन तत्वानुसार महामंडळाची वास्तविक आर्थिक स्थिती, वित्तीय उपलब्धता, तरल रोख विवरण तसेच कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ नुसार कंपनी Indian Accounting Standards नियम २०१५, सुधारीत केल्यानुसार (Ind AS) आणि इतर लेखांकन तत्वे साधारणपणे भारतामध्ये मान्य आहेत त्यानुसार महामंडळाच्या भागभांडवला मधील बदल व त्या संबंधीची सत्य व प्रामाणिक दृष्टी व माहिती ताळेबंदाच्या संबंधात महामंडळाची दर्शविलेली स्थिती ही दि. ३१ मार्च, २०२५ अखेरची आहे. नफा तोटा पत्रकाच्या संदर्भात दर्शविलेला नफा हा त्या वर्षा अखेरीचा आहे. भागभांडवल विवरणाच्या बदलाच्या संदर्भामध्ये दर्शविलेला भागभांडवलातील बदल व रोख तरल विवरणाचे बाबतीत दर्शविलेली रोख तरल हे त्या वर्षा अखेरीचे आहे.

### पात्र मताचा आधार

**१. मागील कालावधीतील बाबी:**

| अ.क्र | मुख्य खाते | जमा शिल्लक ( लक्षात ) |
|---|---|---|
| अ | मागील वर्षीचे विक्री खरेदी समायोजन | ८७.२५ |
| ब | अतिरिक्त तरतुदीचे रद्दकरण | २४०.७० |
| क | जुनी शिल्लक चे रद्दकरण करून किरकोळ जमा मध्ये | ८२६.९१ |
| | **एकूण जमा** | **११५४.८६** |

**अ. मागील वर्षीचे विक्री खरेदी समायोजन:**

आम्ही आर्थिक विवरणाच्या टिपणी २३.१ कडे लक्ष वेधतो, जे बियाणे विक्रीशी संबधित आहे. ''प्रमाणित व सत्यप्रत बियाणे'' एकूण रु. ४८,१४८.०६ लक्ष रक्कमेत रू. ८७.२५ लक्ष मागील वर्षाच्या विक्रीशी संबधित आहेत. जे मागील वर्षाच्या खात्यावर होते. चालू वर्षातही हेच दिसून येते. परिणामी, या समायोजनामुळे २०२४–२५ या आर्थिक वर्षातीत नफ्यात रू. ८७.२५ लक्ष वाढ झाली आहे.

**ब. अतिरिक्त तरतुदीचे रद्दकरण:**

आम्ही आर्थिक विवरणाच्या टिपणी २३.३ कडे लक्ष वेधतो जे इतर कार्यरत उत्पन्नाशी संबंधित आहे. मागील वर्षाच्या देयता संदर्भात रू. २४०.७० लक्ष ही रक्कम मागील वर्षाच्या अतिरीक्त खर्चाच्या आरक्षणा संबंधित आहे. जे यापुढे देय नाहीत म्हणून चालू वर्षात नफा व तोटा खात्यात

जमा करून परत लिहीण्यात आले आहेत. परीणामी, या समायोजनामुळे आर्थिक वर्ष २०२४—२५ च्या नफ्यात रू. २४०.७० लक्ष रूपयाने वाढ झाली आहे.

**क. जुनी शिल्लक चे रद्दकरण करून किरकोळ जमा मध्ये:**
आम्ही आर्थिक विवरणातील टिपणी २३.३ आणि टिपणी २४ कडे लक्ष वेधतो जे अनुक्रमे खर्चाची परतफेड व ''किरकोळ प्राप्त'' या इतर अपप्रचालन उत्पन्नाशी संबंधित आहे. ज्याची रक्कम ८२६.९१ लक्ष रूपये आहे. ज्यामध्ये विविध कर्जदार, बियाणे उत्पादकांची जुनी सुरूवातीची शिल्लक, बियाणे अनामत रक्कम, सुरक्षा ठेव, ३ वर्षाहून अधिक काळ राखुन ठेवलेली रक्कम आणि जीएसटी इनपुट कर जमा, सरकारकडून मिळालेली दर फरक व अतिरिक्त सबसीडी रक्कम, टिश्यू कल्चर प्रशिक्षण प्राप्ती इत्यादी समावेश आहे. जे वर्षभरात नफा व तोटा खात्यात जमा केले गेले आहेत. परिणामी, या समायोजनामुळे २०२४—२५ या आर्थिक वर्षातील नफ्यात रू. ८२६.९१ लक्ष रूपयांची वाढ झाली आहे.
कंपनी कायदा कलम १४३(१०) अंकेक्षणासंबंधी दिलेल्या मानकांचे आधारे आम्ही लेखापरीक्षण केलेले आहे, सदर मानकानूसार वित्तीय विवरणाचे अंकेक्षणासंबंधी असलेली आमची जबावदारी व मानक बद्दल सविस्तर माहिती आमच्या अहवालामध्ये वर्णन केलेले आहे. ICAI ने जाहिर केलेल्या नैतिकतेच्या अनुषंगाने आम्ही महामंडळ पेक्षा स्वतंत्र आहोत. सोबतच आर्थिक विवरणपत्रक संबंधित असलेल्या स्वंतत्र गरजेनूसार कायदयातील तरतूदी आणि त्या अंतर्गत केलेल्या नियम आणि ICAI ने नेमून दिलेल्या नैतिक जबाबदाऱ्या आम्ही पूर्ण केलेल्या आहेत. आम्ही असा विश्वास ठेवतो की वित्तीय विवरण पत्रकावरील लेखापरिक्षणच्या मतासाठी आम्ही पुरेसे व योग्य लेखा पुरावे प्राप्त केलेले आहे.

**बाबींवर भर**

**१.** आम्ही आर्थिक विवरणाच्या टिपणी २० कडे लक्ष वेधतो जे इतर चालू दायित्वाशी संबंधित आहे ''इतरासाठी'' एकूण रू. ९१३९.४० लक्ष या रक्कमेत रू. ७०.७९ लक्ष जे खालील लेख्यांशी संबंधित आहेत.

| अ.क्र | मुख्य खाते | जमा शिल्लक (लक्षात) |
|---|---|---|
| अ | ज्याची ओळख पटलेली नाही अशा बँक खात्यात जमा झालेली रक्कम | ६८.५९ |
| ब | मुदत बाहय धनादेश खाते | २.२० |
| | **एकूण जमा** | **७०.७९** |

**अ. ज्याची ओळख पटलेली नाही अशी बँक खात्यात जमा झालेली रक्कम:**
आम्हाला असे आढळले आहे की, महाबीज आपल्या लेख्यामध्ये ओळख न पटलेली व बँकेच्या खात्यात जमा झालेल्या रक्कमेची नोंद घेत आहे. या खात्यामध्ये एकुण निव्वळ जमा रक्कम रू. ६८.५९ लक्ष आहे. व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहितीनूसार यामध्ये मुख्य नोंदी या शेतकऱ्यांनी राज्यभरातील विविध बँकांमध्ये ठेवलेल्या रोख रकमेच्या आहेत आणि आम्ही अशा ठेवीदारांची ओळख पडताळण्यात अक्षम आहोत. या सर्व नोंदीचा समेट करणे आवश्यक आहे. समेट न केल्याने आर्थिक विवरणावर होणारा परिणाम अनिश्चित आहे.

**ब. मुदत बाहय धनादेश खाते:**
महामंडळाकडे मुदत बाहय (stale) धनादेश किंवा परत आलेल्या RTGS रकमेच्या बाबतीत, संबंधित खर्च किंवा देयकाची उलट नोंद (reversal entry) करण्याऐवजी ती रक्कम "चेक डेट बार खाते/आरटीजीएस रद्द खाते" या खात्यात वर्ग करण्याची पध्दत आहे. या खात्यातील एकूण उर्वरित क्रेडिट शिल्लक रक्कम रूपये २.२० लाख इतकी आहे. या नोंदीचे सेटलमेंट झाल्यावर होणारा आर्थिक परिणाम निश्चित करता आलेला नाही.

**२. लेखे अंतिम करण्यासाठी वेळेचे बंधन:**
लेखा खाते वेळेवर पूर्ण होत नाही आणि निम्न पातळी वरील कर्मचारी वर्गामध्ये योग्य लेखा ज्ञान नसल्यामुळे लेखा खाते ३ ते ६ महिने मागे पडतात. महामंडळाचे कार्याच्या व्याप्ती चा विचार करता ERP (सिडफ्लो) सॉफ्टवेअर मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा SAP सारख्या चांगल्या पर्यायाचा विचार करणे आवश्यक आहे. वेळेत लेखे अंतिमीकरण पुर्ण करण्यासाठी महामंडळ व्यवस्थापनाने दोन्ही बाबींवर लक्ष देण्याची गरज आहे.

**३. अंतर्गत अंकेक्षण:**
अंतर्गत लेखापरीक्षण विभाग मजबूत करणे आवश्यक आहे जे महामंडळाच्या अंतर्गत नियंत्रण प्रणालीला बळकट करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावेल. तसेच कंपनी नियम २०१४ च्या कलम १७७ आणि नियम ६ च्या अंतर्गत अंकेक्षण समिती स्थापन करण्याची आवश्कता आहे.

**४. स्वतंत्र संचालक:**
कंपनी नियम २०१४ च्या नियम ४ नुसार अनिवार्य असले तरी महामंडळ संचालकामध्ये स्वतंत्र संचालकाचा समावेश नाही.

**या प्रकरणात आमचे मत बदलत नाही.**

**वित्तीय विवरण पत्रका व्यतिरिक्त आणि लेखापरीक्षक अहवालाशिवाय इतर माहिती:**
इतर माहिती तयार करण्यासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे. इतर माहितीमध्ये व्यवस्थापनाशी चर्चा व विश्लेषण, संचालक मंडळाच्या अहवाल परिशिष्टासहीत, व्यावसायिक जबाबदारीचा अहवाल, कॉर्पोरेट गव्हर्नन्स व भागधारकाची माहिती याचा समावेश आहे, परंतु त्यामध्ये वित्तीय विवरणपत्रक व लेखा परीक्षकाचा अहवाल समाविष्ट नसतो.
आमचे मते वित्तीय विवरण पत्रकामध्ये इतर माहितीचा समावेश करीत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकारचे हमी व निष्कर्ष व्यक्त करीत नाही.
लेखापरिक्षकाच्या आर्थिक विवरण पत्रका संदर्भात, आम्हाला मिळालेली इतर माहिती वित्तीय विवरण पत्रकाशी बांधील आहे की नाही किंवा आम्हाला लेखापरिक्षणामध्ये माहिती प्राप्त झाली की नाही अन्यथा विवरण पत्रामध्ये चुकीची माहिती आहे. आम्ही केलेल्या कामकाजावरुन चुकीची माहिती वाटत असल्यास जर आम्ही असा निष्कर्ष काढतो की, आम्हाला मिळालेली इतर माहिती चुकीची आहे तर आम्हाला त्या वास्तविकतेची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच आमच्याकडे या संदर्भात अहवाल देण्यासारखे काही नाही.

**व्यवस्थापनाची वित्तीय विवरणासंबधी कारभारावरील जबाबदारी :**
कंपनीचे संचालक मंडळ हे कंपनी कायद्याच्या कलम १३४(५) मध्ये नमुद केलेल्या बाबींसाठी जबाबदार असून स्वतंत्र वित्तीय विवरण हे महामंडळाची आर्थिक स्थिती, आर्थिक कामगिरी, एकुण व्यापक उत्पन्न, भागभांडवलातील बदल व रोख प्रवाहाबाबत खरा आणि योग्य दृष्टिकोन देण्यासाठी काळजी घेतात व ते भारतात स्विकार असलेल्या कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या "Ind AS" च्या मानकानुसार तयार करण्यात येत असतात या जबाबदाऱ्यांमध्ये कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्याच्या कायद्यातील तरतूदीनुसार पुरेसे लेखा अभिलेख्याची देखभाल करणे आणि फसवणुक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी आणि त्याचा शोध घेण्यासाठी योग्य लेखाधोरणांची निवड आणि वाजवी व विवेकपुर्ण निर्णय आणि अनुमान काढणे आणि लेखापुस्तकांची अचुकता आणि संपुर्णता सुनिश्चित करण्यासाठी प्रभावीपणे कार्य करणाऱ्या वास्तविक आणि योग्य दृष्य देणारे स्वतंत्र आर्थिक विवरणाचे सादरीकरण आणि सामग्रीपासुन मुक्त असणारी पर्याप्त आंतरिक वित्तीय नियंत्रणे, डिझाइन, अंमलबजावणी आणि देखभाल, चुकीची माहिती, चुकीने अयोग्य माहिती याचा समावेश आहे.
स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रक तयार करतांना पुढील येणाऱ्या वर्षात व्यवसाय सुरळीत रित्या चालवणे शक्य आहे व त्यासंबंधित उद्‌भवलेले प्रकरण व लेखा धोरण याची खात्री करुन घेण्याची

जबाबदारी संचालक मंडळाची आहे शिवाय त्यांचा महामंडळ बंद करण्याच्या किंवा उत्पादन थांबवण्याचा हेतू नाही.

कंपनीच्या वित्तीय अहवालाच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी संचालक मंडळदेखील जबाबदार आहे.

**वित्तीय विवरणाबाबत लेखापरीक्षकाची जबाबदारी :**
स्वतंत्र आर्थिक विवरण पत्रक चुकीच्या विधानापासुन मुक्त आहे की नाही याविषयी वाजवी आश्वासन मिळविणे, फसवणुक किंवा त्रुटीमुळे झाले आहे की नाही याबाबत आमचे मत समाविष्ट असणारे लेखापरीक्षकांचा अहवाल देणे ही आमचे उद्दिष्टे आहेत. लेखापरिक्षणामध्ये एखादी सामग्री चुकीची नसते परंतु ती नेहमी बरोबर आढळेल याची हमी देता येत नाही. वाजवी आश्वासन ही उच्च पातळीची हमी असते. फसवणुक किवा त्रुटीमुळे चुकीचा दावा उद्भवू शकतो आणि लेखा मानकानुसार लेखापरिक्षणाचा एक भाग म्हणुन आम्ही व्यावसायिक कौशल्याचा उपयोग करुन व्यावसायिक संशयास्पदपणा कायम ठेवतो.

**याशिवाय सुध्दा**:

- वित्तीय विवरणपत्रकामध्ये दिलेल्या चुकीच्या माहितीची जोखीम ओळखून त्याचे मुल्यांकन करणे. ते कोणाच्या फसवणुकीमुळे किंवा चुकीने झाले आहे का? त्या जोखीमीस प्रतिसाद देणारा लेखापरीक्षण प्रक्रीयेचा आराखडा तयार करणे आणि आपल्या लेखापरीक्षणा विषयी मत देण्यासाठी योग्य पुरावे मिळवणे. चुकीची माहिती शोधुन न काढण्याची जोखीम चुकांमुळे उद्भवणाऱ्या त्रुटीपेक्षा जास्त आहे. फसवणुकीमध्ये मिलीभगत, खोटेपणा, हेतुपुरस्कर, चुकीची माहिती आणि अंतर्गत नियंत्रण अधिलिखित करण्याचा समावेश असू शकतो.
- अंतर्गत वित्तीय नियंत्रण जे लेखापरीक्षण प्रक्रीयेची रचना करण्यासाठी लेखापरीक्षण संबंधित आर्थिक नियंत्रणाची माहिती आकलन करणे. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३(३)(i) नुसार, कंपनीकडे पर्याप्त योग्य अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आहे की नाही अशा नियंत्रण प्रणालीची कार्यक्षमता प्रभावी आहे की नाही यावर आपले मत व्यक्त करण्यासाठी आम्ही जबाबदार असतो.
- व्यवस्थापनाने वापरलेल्या लेखा धोरणांचे, लेखा अंदाजाचा वाजवीपणा आणि व्यवस्थापनाने केलेले संबंधित खुलासे यांचे मुल्यमापन करणे.
- लेखांकनानुसार आणि लेखा परीक्षकाच्या पुराव्याच्या आधारावर, महामंडळ हे शाश्वत राहिल की नाही व व्यवस्थापनाच्या योग्यतेवर निष्कर्ष काढणे. कशाच्या संबंधित वास्तविक अनिश्चितता उपलब्ध असल्यास किंवा अशी परिस्थिती जी महामंडळ सुरु ठेवण्याच्या क्षमतेवर लक्षणीय शंका घेऊ शकते. जर आपण असा निष्कर्ष काढतो की वास्तविक अनिश्चितता उपलब्ध आहे. तर वित्तीय विवरण पत्रक तयार करतांना लेखा परीक्षकाच्या अहवालात खुलासा सादर करावा लागेल जर खुलासे पुरेशे नसतील तर आपले मत सुधारित करणे. लेखा परीक्षकांचा निष्कर्ष हा अहवालांच्या तारखेपर्यंत प्राप्त केलेल्या पुराव्यावर आधारित आहे. तथापि भविष्यातील कार्यक्रम किंवा परिस्थिती महामंडळाच्या व्यवसायावर नकारात्मक प्रभाव टाकू शकतात.
- वित्तीय विवरण पत्राची प्रस्तुती, रचना, त्यामधील खुलासे वित्तीय विवरण पत्रका अंतर्गत व्यवहार आणि कार्यक्रमाचे प्रतिनिधित्व करतात किंवा नाही याचे मुल्यांकन करणे.

वित्तीय विवरण पत्रात वास्तविक चुकीच्या बाबींची नोंद करणे हे संयुक्तरित्या आहे किंवा वैयक्तिकपणे किंवा सर्वांनी मिळुन आर्थिक निर्णय त्यात निपुण अशा व्यक्तिने केल्याने वित्तीय विवरण पत्रात त्याचा प्रभाव पडतो; गुणात्मक घटक, परिमाणात्मक वास्तविकता, लेखापरीक्षण कार्याचे (i) नियोजन करुन आम्ही केलेल्या कामाच्या व्याप्तीचे मूल्यांकन करु. (ii) वित्तिय विवरण पत्रामध्ये चुकीची माहिती आढळली तर त्याचे काय परिणाम होतील याचे मुल्यांकन करु.

आम्ही आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान ओळखल्या जाणाऱ्या अंतर्गत नियंत्रणातील कोणत्याही महत्वपुर्ण कमतरतासह अन्य गोष्टी बरोबरच अंकेक्षणाची नियोजित व्याप्ती आणि लक्षणीय अंकेक्षणाच्या निष्कर्षा विषयी जबाबदार लोकांशी आम्ही संवाद साधतो.

आम्ही निवेदन देतो, आम्ही स्वतंत्रपणे नैतिक आवश्यकताचे पालन केलेले आहे आणि त्यांच्याशी सर्व संबंधाच्या बाबतीत आणि इतर बाबींच्या बाबतीत, जेथे लागु असेल तेथे, सुरक्षततेच्या बाबतीत संवाद साधला आहे.

आम्ही चालु वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रामध्ये ही सर्वात महत्वाची बाब ठरविली आहे कि जे प्रकरण महत्वाचे आहे. व ज्या प्रकरणाची माहिती कंपनीच्या शासनाशी निर्गमीत आहे. अशी माहिती जर कायदा आणि नियम या प्रकरणाबद्दल सार्वजनिक प्रकटीकरण करणे आवश्यक असेल तर आम्ही आमच्या लेखा परीक्षकाच्या अहवालात या बाबींचे वर्णन करु किंवा अत्यंत दुर्मिळ परिस्थिती असेल तर आम्ही असे ठरवितो की आमच्या अहवालात कोणतीही बाब कळविणार नाही कारण प्रतिकुल परिणामाद्वारे अशा संवादाचे सार्वजनिक हितसंबंधाचे फायदे जास्त आहेत.

**इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतेनुसार अहवाल**

**१)** आम्ही कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३ च्या पोट कलम (११) च्या अनुषंगाने केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपनी (अंकेक्षकाचा अहवाल) आदेश २०२० ("आदेश") च्या आवश्यकतेनुसार आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारावर आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मध्ये निर्देशित केलेल्या बाबीं विषयी **परिशिष्ट "अ"** हे जोडले आहे.

२) आम्ही कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३(५) च्या अटीनुसार आमचा अहवाल आम्हाला उचित वाटल्याप्रमाणे आणि कंपनीच्या खाते पुस्तक आणि दस्ताऐवज तपासणीच्या आधारे जोडत आहोत. परिशिष्ट "ब" हे भारतीय नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी जारी केलेल्या निर्देश आणि ठराविक क्षेत्र उपनिर्देशांवरील विधान कायद्याच्या कलम १४३(३) नुसार आवश्यक असलेल्या परिशिष्ट "अ" मधील आमच्या टिप्पण्यांबद्दल आम्ही अहवाल देतो की

अ) आमच्या माहितीप्रमाणे अंकेक्षणकरिता आवश्यक असलेली माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविलेली आहेत

ब) आमच्या मतानुसार व आम्ही केलेल्या अंकेक्षणानुसार, महामंडळाने कायद्याच्या आवश्यकतेनुसार असणारे लेखापुस्तके योग्य रितीने आतापर्यंत ठेवलेली आहेत. त्या पुस्तकांचे आम्ही लेखापरीक्षण केलेले आहे.

क) ताळेबंद, इतर उत्पन्नासह नफा तोटा पत्रक, भागभांडवलातील बदलांचा अहवाल आणि रोखप्रवाह अहवाल या अहवालाशी संबंधित लेखापुस्तके हे परस्परांशी जुळतात.

ड) आमच्या मते वरील वित्तीय विवरणे कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ आणि कंपनी (लेखा) नियम, २०१४ च्या नियम ७ च्या मानांकनांचे पालन करतात

इ) दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी संचालक मंडळाने दिलेल्या लिखित विवरणानुसार दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १६४(२) नुसार नेमणुक झाल्यापासुन त्यांच्या संचालक पदाच्या कालावधीत कोणीही संचालक अपात्र ठरलेला नाही

फ) महामंडळाच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी कंपनीच्या वित्तीय अहवाल नियंत्रणाचे कार्यशिलते करिता आमचे **परिशिष्ट—क** पहा. आमचा अहवाल कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची पर्याप्तता आणि परिणामकारकता यावर असुधारित मत व्यक्त करतो.

ग) आमच्या मते व आमच्या सर्वोत्तम माहिती नुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार व कंपनीच्या (अंकेक्षण आणि अंकेक्षक) २०१४ नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात समाविष्ट केलेल्या इतर बाबींच्या संदर्भात.

१) महामंडळाने दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत त्यांच्या वित्तीय विवरण पत्रकामधील आर्थिक स्थितीवर प्रलंबित खटल्यांच्या प्रभावाचा खुलासा केला आहे. वित्तीय जबाबदाऱ्यांशी संबंधित नोट ३१ पहा

२) महामंडळ अशा कोणत्याही दिर्घमुदती करारामधे गुंतलेले नाही की, ज्यामुळे महामंडळाला नुकसान होईल

३) महामंडळाद्वारे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक असलेली रक्कम हस्तांतरित करण्यास विलंब झालेला नाही

४) अ) व्यवस्थापनाने असे सादर केले आहे की, आपल्या सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वासानुसार, आर्थिक विवरणा वरील टिपणी व्यतिरीक्त, महामंडळाने कोणताही निधी अग्रिम किंवा कर्ज किंवा गुंतवणूक स्वरूपात केलेला नाही (उधार घेतलेल्या निधीतून किंवा शेअर प्रीमियम किंवा इतर कोणत्याही स्त्रोतांमधून) किंवा कोणत्याही प्रकारचे परदेशी संस्थांसह अथवा व्यक्तीकडून लिखित स्वरूपात किंवा अन्यथा नोंदवलेले मध्यस्थीव्दारे महामंडळाने किंवा त्यांच्या वतीने (''अंतिम लाभार्थी'') प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कर्ज किंवा गुंतवणूक कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेल्या व्यक्तींना किंवा संस्थाना कोणतीही हमी किंवा सुरक्षा प्रदान अंतिम लाभार्थीच्या वतीने केलेली नाही.

ब) व्यवस्थापनाने असे सादर केले आहे की, आपल्या सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वासानुसार, आर्थिक विवरणा वरील टिपणी व्यतिरीक्त, महामंडळाला कोणत्याही व्यक्ती किंवा संस्था परदेशी संस्थांसह कुठलाही निधी मिळाला नाही अथवा लिखित स्वरूपात किंवा अन्यथा नोंदवलेले मध्यस्थीव्दारे महामंडळाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निधी देणाऱ्या पक्षाव्दारे किंवा त्यांच्या वतीने (''अंतिम लाभार्थी'')कर्ज किंवा गुंतवणूक कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेल्या व्यक्तींना किंवा संस्थाना कोणतीही हमी किंवा सुरक्षा प्रदान अंतिम लाभार्थीच्या वतीने केलेली नाही.

क) लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारावर ज्यांना आम्ही वाजवी आणि परिस्थितीमध्ये योग्य मानले, त्यांच्या निदर्शनास असे काहीही आले नाही ज्यामुळे त्यांना असा विश्वास वाटेल की उपखंड (i) आणि (ii) अंतर्गत सादरीकरणांमध्ये कोणतेही चुकीचे विधान आहे.

५) आमच्या परिक्षणाच्या आधारावर, ज्यामध्ये नमुना चाचणी तपासण्याचा समावेश आहे, महामंडळाने ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी आपली लेखा पुस्तके नोंदीकरीता लेखा संगणक प्रणालीचा वापर केला आहे, ज्यामध्ये लेखा सत्यापन नोंद करण्याची सुविधा आहे आणि तीचा वापर संगणक प्रणालीमध्ये नोंद केलेल्या सर्व संबंधित व्यवहारासाठी वर्षभर चालवले जाते. नंतर आमच्या लेखापरीक्षणा दरम्यान आम्हाला लेखा सत्यापन वैशिष्ट्यमध्ये कुठलीही छेडछाड झाल्याची उदाहरणे आढळली नाही.

**शाह बाहेती चांडक ॲण्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**सीए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार**
**सभासद क्रमांक १३२९००**
**UDIN No:- 25132900BMIJXY4522**

**ठिकाण:— अकोला**
**अहवालाची तारीख:— २३ सप्टेंबर, २०२५**

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितच्या स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाला नुसार
## "परिशिष्ट—अ"

(कायदेशीर व नियामक आवश्यकतांवरील अहवाल आम्ही परिच्छेद १ मध्ये अहवाल तारखेस दिलेले आहे.)

आम्ही मागविलेली माहिती आणि स्पष्टीकरणे या संदर्भात कंपनीने दिलेली पुस्तके आणि दस्तऐवज आमच्याव्दारे साधारण तपासणी केलेल्या लेखापरीक्षणाच्या अभ्यासातून आणि आमच्या ज्ञानातून आम्ही असे नमूद करतो की:—

**१ कंपनीची संपत्ती, यंत्रे आणि उपकरणे आणि अमूर्त मालमत्ता यांच्या संदर्भात**

**अ) (अ)** महामंडळाने सर्व अभिलेखे योग्य रितीने ठेवलेले आहेत, ज्यामध्ये मात्रात्मक व इतर परीपूर्ण विवरण आहे आणि संपत्ती, यंत्रे आणि उपकरणे यांची स्थितीजन्य माहिती आहे.

**(ब)** महामंडळाने अमूर्त संपत्तीचे संपूर्ण तपशील दर्शविणारे योग्य अभिलेखे ठेवले आहेत.

**ब)** महामंडळाची प्रमुख संपत्ती, यंत्रे आणि उपकरणे यांची व्यवस्थापनाने ठरावीक अंतराने भौतिकरित्या पडताळणी केली आहे आणि अशा पडताळणीत कोणतीही तफावत आढळून आलेली नाही.

**क)** आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार स्थावर संपत्तीचे शीर्षक (त्या संपत्तीशिवाय जिथे कंपनी भाडेतत्वावर आहे आणि भाडेपट्टेदाराच्या नांवे भाडेपट्टी कराराची अंमलबजावणी केली जाते) महामंडळाच्या नावावर आहेत. खालील जमीनी वगळता.

| अ.क्र | संपत्तीचे विवरण | एकूण वहन मूल्य (लक्षात) |
|---|---|---|
| १ | मुक्ततावा जमीन— महाबीज मुख्य कार्यालय, मौजे उमरी अ.क्र ९६, रेल्वे लाईन जवळ, पिडीकेव्ही गेस्ट हाऊस च्या मागे अकोला. | १८.८९ |
| २ | मुक्ततावा जमीन— भंडारा प्लॉट नं. १२१/१ शिट नं. ०५ मौजे भंडारा | ६९.०२ |

**१. मुक्ततावा जमीन— अकोला मुख्य कार्यालय**

- महाराष्ट्र शासनाने ११ फेब्रुवारी १९९३ रोजी महाराष्ट्र सरकारच्या ठरावाद्वारे मौजे उमरी अ.क्र. ९६, रेल्वे लाईनजवळ, पिडीकेव्ही गेस्ट हाऊस च्या मागे अकोला, येथे दोन एकर जमीन महामंडळाला दिली आणि ६ जून १९९४ रोजी ३० वर्षाच्या भाडेपट्टा तत्वावर जमिनीचा ताबा दिला.
- सदर जमीन महसूल नोंदी मधील ७/१२ च्या उताऱ्यात डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला, यांचे नावे उल्लेख असून यांनी ३० वर्षाच्या कालावधीसाठी जमीन भाडेतत्वावर दिली आहे.
- महामंडळाने सन १९९९—२००० मध्ये अधिग्रहण प्रकिया सुरू केली आणि मा. जिल्हाधिकारी अकोला यांच्या निर्देशानुसार एकूण १८,८९,३०० रूपयाचे शोधन पुढील प्रमाणे केले.
  २४ मार्च २००४ रोजी रू. ९,४५,०००/—
  ३१ मार्च २००८ रोजी रू. ९,४४,३००/—

- माननीय जिल्हाधिकारी, अकोला यांनी २४ मार्च २००८ च्या पत्र क्रमांक २७६ नुसार, अमरावती येथील विभागीय आयुक्तांमार्फत महामंडळाचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला.
- तसेच २१ जून २०१२ रोजी मंत्रालय येथे आग लागल्यामुळे ही प्रक्रिया होण्यास वेळ लागला, ज्यामध्ये जमिनीच्या हस्तांतरणाशी संबंधित कागदपत्रे जळाली/गहाळ झाली. सर्व कागदपत्रे आणि नोंदी १३ जून २०१८ रोजीच्या पत्र क्रमांक २०१८/१२२० द्वारे पुन्हा सादर करण्यात आले.

**२. मुक्तताबा जमीन— भंडारा**

- तहसीलदार, भंडारा यांच्याकडे महामंडळाने ०९ मार्च २०१८ रोजी धनादेश क्रमांक ०२०७७३ नुसार रू. ६८,५८,००० जमा केले
- महाराष्ट्र शासनाने २६ जुलै २०१८ रोजी प्लॉट क्रमांक १२१/१, शीट क्रमांक ०५, मौजे भंडारा येथे (१८०० चौ. मीटर) चा ताबा दिला.
- माननीय जिल्हाधिकारी, भंडारा यांनी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्यामार्फत दिनांक ३ ऑगस्ट २०१९ च्या पत्र क्रमांक ११८८/२०१९ द्वारे सदरील भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर केला.
- १९ सप्टेंबर, २०२४ च्या पत्र क्रमांक ६८३ मध्ये विनंती केल्याप्रमाणे, पेंच सिंचन उपविभागाच्या उपविभागीय अभियंत्याकडून पुनर्स्थापनेच्या खर्चाकरीता रू. ४४,१४९ चे शोधन केले, जे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मिळविण्यासाठी आवश्यक होते.

ड) महामंडळाने वर्षभरात त्यांच्या संपत्ती, यंत्रे आणि उपकरणे (वापरण्याच्या अधिकारासह) किंवा अमूर्त संपत्ती किंवा दोन्हीचे पुर्नमूल्यांकन केलेले नाही.

इ) वर्षभरात बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायद्या, १९८८ (२०१६ मध्ये सुधारीत केल्यानूसार) आणि त्या अंतर्गत बनविलेल्या नियमानुसार कोणतेही बेनामी संपत्ती धारण करण्यासाठी ३१ मार्च, २०२५ पर्यंत महामंडळा विरूध्द कोणतीही कार्यवाही सुरू अथवा प्रलंबित नाही.

**२ अ)** अहवाल वर्षामध्ये साठयाची प्रत्यक्ष भौतिक तपासणी व्यवस्थापनाने केलेली आहे. आमच्या मते अशी वेळोवेळी करण्यात येणारी तपासणी योग्य आहे आणि साठा पडताळणीमध्ये कोणत्याही त्रुटी आढळुन आल्या नाही.

**ब)** बॅंकेमध्ये महामंडळाला सुरक्षासाठी रु. ५० कोटी मर्यादेची मंजूरात आहे. परंतु आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये महामंडळाने तिचा वापर केलेला नाही.

**३** महामंडळाने वर्षभरात कंपन्या, भागीदारी कंपनी, मर्यादित दायित्व भागीदारी किंवा इतर कोणत्याही पक्षांना कुठलीही हमी किंवा सुरक्षितता प्रदान केली नाही किंवा कर्जाच्या स्वरुपात सुरक्षित किंवा असुरक्षित अशी कोणतीही कर्जे किंवा आगाऊ रक्कम दिली नाही, त्यानुसार, आदेशाच्या कलम ३(iii) च्या तरतुदी लागू होत नाहीत.

**४** आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८५ आणि १८६ च्या तरतुदीनुसार महामंडळाकडे कोणतेही कर्ज, गुंतवणूक किंवा सुरक्षीतता प्रदान केली नाही.

**५** महामंडळाने भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या निर्देशांनुसार आणि कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ७३ ते ७६ मधील तरतुदी तसेच इतर कोणत्याही संबंधित तरतुदी आणि तयार केलेल्या नियमांनुसार कुठल्याही ठेवी किंवा रक्कम स्विकारल्या नाहीत. त्यानुसार आदेशाचा खंड ३(V) च्या तरतुदी लागू होत नाही.

६ आमच्या माहिती आणि विश्वासानुसार महामंडळाच्या उत्पादन तसेच सेवांच्या संदर्भात केंद्र सरकारने कायदयाच्या कलम १४८ मधील उपकलम १ मध्ये अंतर्गत खर्चाच्या नोंदीच्या देखभाल निर्देशित केलेले नाहीत. त्यानुसार आदेशाचा खंड 3(vi) च्या तरतुदी लागू होत नाही.

७ **वैधानिक देयकांबद्दल आमचे मत :**

(अ) आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या रेकॉर्डच्या तपासणी नुसार, भविष्य निर्वाह निधी, आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवा कर, जकातकर, उत्पादन कर आणि इतर वैधानिक बादरहीत देयतांचे शोधन महामंडळ नियमित स्वरूपात संबंधीत प्राधिकरणाकडे जमा करते.

(ब) आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्याच्या तपासणी नुसार आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवा कर, जकात कर, उत्पादन कर याबाबतची कोणतेही देय राशी खाली नमुद केलेल्या बाबी व्यतिरिक्त जमा केलेली नाही किंवा रक्कम वादग्रस्त नाही.

| अधिनियमाचे नाव | देयतेचा प्रकार | वादग्रस्त रक्कम (रूपयामधे) | कालावधी | वाद प्रलंबित असलेले न्यायाधिकरण |
|---|---|---|---|---|
| मध्यप्रदेश प्रवेश कर | नियम ५२ प्रमाणे दंड | १२.७८ लक्ष | २००८—०९ | अपिलीय प्राधिकरण |
| **आयकर** | नियम २७०अ प्रमाणे दंड | ९८.८१ लक्ष | २०१९—२० | आयकर आयुक्ता कडे अपील २१/०४/२०२३ |
| **केंद्र व राज्य वस्तु व सेवा कर** | शोधन न केलेले आरसीएम | ४६६.९२ लाख | जुलै २०१७ ते मार्च २०२१ | संयुक्त राज्य कर आयुक्त (अपील) यांच्याकडे अपील केलेली आहे. |

८ वर्षभरात आयकर कायदा, १९६१ च्या कलम ४३ अंतर्गत कर आकारणीमध्ये समर्पण केलेले किंवा उत्पन्न म्हणून उघड केलेले पूर्वी निर्देशित न केलेल्या उत्पन्नाशी संबंधित कोणतेही व्यवहार नाहीत.

९ (अ) आमच्या मते महामंडळाने वर्षभरात कर्जाची किंवा इतर कर्जाची परतफेड करण्यात किंवा त्यावरील व्याज भरण्यात कोणतीही चूक केलेली नाही.

(ब) कुठलीही बॅंक किंवा वित्तीय संस्था, सरकार किंवा कोणत्याही सरकारी प्राधिकरणाने महामंडळाला हेतुपूरस्कर थकबाकीदार घोषित केलेले नाही.

(क) कंपनीने वर्षभरात कोणतेही मुदतीचे कर्ज घेतले नाही आणि वर्षाच्या सुरुवातीला कोणतेही अवापर झालेले मुदतीचे कर्ज नाही आणि त्यामुळे आदेशाच्या खंड (ix) (c) अंतर्गत अहवाल देणे लागू नाही .

(ड) महामंडळाच्या आर्थिक अहवालाच्या एकूण परीक्षणानूसार प्रथमदर्शनी महामंडळाने अल्पमुदतीच्या आधारावर उभारलेला निधी वर्षभरात दीर्घकालीन उद्देशांसाठी वापरला नाही.

(इ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार महामंडळाची कोणतीही उपकंपनी नाही त्यामुळे आदेशाच्या खंड 3(ix) आणि खंड 3(ix)(f) अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

१० (अ) महामंडळाने वर्षभरात कोणतेही प्रारंभिक किंवा सार्वजनिक पब्लिक ऑफर (कर्जरोखे) व्दारे रक्कम उभी केलेली नाही. म्हणून आदेशाचा कलम 3(X)(a) अंतर्गत अ हवाल देणे लागू होत नाही.

(ब) महामंडळाने अहवाल वर्षात कोणत्याही समभागाचे प्राधान्याने आवंटन किंवा खाजगी वाटप केलेले नाही किंवा अंशत: किंवा पुर्ण परिवर्तनीय ऋणपत्र (पूर्णपणे किंवा अंशत: बदलणारे) प्रारंभिक किंवा पुढील पब्लिक ऑफर, ऋणपत्रे घेतलेले नाहीत. म्हणून आदेशाचा क्रलम 3(x)(b) अंतर्गत अहवाल देणे लागू होत नाही.

११ (अ) आमच्या माहितीनुसार वर्षभरात महामंडळाने फसवणूक केली नाही किंवा महामंडळाची कोणतेही भौतिक फसवणूक झालेली नाही.

(ब) अहवाल तारखेस कंपनी कायदयाच्या कलम १४३ च्या उपकलम (१२) अंतर्गत कोणताही अहवाल फॉर्म ADT-4 मध्ये कंपनी लेखा आणि लेखापरीक्षक नियम २०१४ च्या नियम १३ अंतर्गत विहित केल्यानूसार केंद्र सरकारकडे वर्षभरात दाखल करण्यात आलेला नाही.

(क) व्यवस्थापनाने आम्हाला दर्शविल्याप्रमाणे महामंडळाला अहवाल तारखेपर्यंत कोणत्याही व्हिसल ब्लोअर तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.

१२ महामंडळ हे निधी कंपनी नाही. त्यामुळे आदेशातील क्लॉज (XII) महामंडळाला लागु होत नाही.

१३ आमच्या मते महामंडळ कंपनी कायद्या २०१३ च्या कलम १७७ आणि १८८ चे पालन करते महामंडळाचे संबंधित पार्टीसोबत झालेले व्यवहार संबंधीचा सर्व तपशिल वित्तीय विवरणामध्ये आवश्यक त्या लेखा मानांकनानुसार दिलेला आहे.

१४ (अ) आम्हाला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणानुसार आमच्या मते महामंडळाकडे त्यांच्या व्यवहाराच्या आकार आणि स्वरुपाशी सुसंगत अंतर्गत अंकेक्षण प्रणाली नाही.

(ब) आम्ही लेखापरीक्षण कालावधीसाठी अंतर्गत लेखापरीक्षकांचे अहवाल विचारात घेतले आहेत.

१५ आमच्या मते अहवाल वर्षात महामंडळ संचालक किंवा त्यांच्या कोणत्याही संबंधीत व्यक्तीसोबत कोणत्याही रोख नसलेल्या व्यवहारामध्ये गुंतलेले नाहीत. आणि त्यामुळे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १९२ च्या तरतुदी महामंडळाला लागू होत नाही.

१६ (अ) भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या कलम ४५ **(IA)** नुसार नोंदणी करणे आवश्यक नाही. म्हणून आदेशाच्या खंड **(xvi) (a), (b)** आणि **(c)** अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

(ब) आमच्या मते (मुख्य गुंतवणुक कंपन्या (रिझर्व्ह बँक) निर्देष २०१६ प्रमाणे) महामंडळासोबत कोणतीही मुख्य गुंतवणुक कंपनी नाही. त्यानूसार आदेषाच्या खंड **3 (xvi) (d)** अंतर्गत अहवाल देणे लागू होत नाही.

१७ आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानूसार आणि आयोजित लेखापरीक्षण प्रकियेच्या आधारे आमचे मत आहे की महामंडळाचे आर्थिक वर्ष आणि तत्काळ अगोदरच्या आर्थिक वर्षात कोणतेही रोख नुकसान झालेले नाही.

१८ आर्थिक वर्षात वैधानिक लेखापरीक्षकांनी राजीनामा दिलेला नाही आणि त्यानुसार, आदेशाच्या खंड **3(xviii)** च्या तरतुदी लागू होत नाहीत.

१९ आर्थिक गुणोत्तर, जुन्या आणि आर्थिक मालमत्तेची वसुली आणि आर्थिक दायित्वे भरण्याच्या अपेक्षित तारखा, वित्तीय विवरणांसह इतर माहिती आणि संचालक मंडळ आणि व्यवस्थापन योजनांबद्दलचे आमचे ज्ञान आणि आमच्या पुराव्याच्या तपासणीच्या व गृहीतकाच्या आधारावर असे काहीही आमच्या लक्षात आले नाही ज्यामुळे आम्हाला असा विश्वास होतो की लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत कोणतीही भौतिक अनिश्चितता अस्तित्वात आहे जे दर्शविते की महामंडळ ताळेबंद तारखेला अस्तित्वात असलेल्या दायित्वांची आणि ताळेबंद तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत जेव्हा ते देय असेल तेव्हा पूर्तता करण्यास सक्षम नाही. अशी कोणतेही नकारात्मक बाब आमच्या लक्षात आलेली नाही.

तथापि आम्ही असे सांगतो की, हे महामंडळाच्या भविष्यातील व्यवहार्यतेचे आश्वासन नाही. आमचा अहवाल लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंतच्या तथ्यांवर आधारित आहे आणि आम्ही कोणतीही हमी देत नाही की ताळेबंद तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत देय असलेल्या आणि जेव्हा ते देय पडतात तेव्हा सर्व दायित्वांचे निर्मूलन केले जाईल.

२० (अ) ताळेबंद तारखेनुसार चालू असलेल्या प्रकल्पांव्यतिरिक्त महामंडळाकडे कायदयाच्या कलम १३५(५) अन्वये खर्च केलेली कोणतीही रक्कम शिल्लक नाही. त्यानूसार, आदेशाच्या खंड **3(xx)(a)** अंतर्गत अहवाल देणे लागू नाही.

(ब) आम्हाला कळविण्यात आले आहे की महामंडळाने संयुक्त सामाजिक जबाबदारी साठी (CSR) कोणतीही अखर्चित रक्कम नाही आणि कायदयाच्या कलम १३५ च्या उपकलम (५) अंतर्गत कोणतीही रक्कम कलम १३५ च्या उपकलम (६) च्या तरतुदीचे पालन करुन विशेष खात्यात हस्तांतरित करण्याची आवश्यता नाही.

२१ खंड (xxi) अंतर्गत अहवाल महामंडळाच्या आर्थिक विवरणाच्या अंकेक्षणाच्या संदर्भात लागू होत नाही, त्यानुसार, या अहवालात या कलमाच्या संदर्भात कोणतीही टिप्पणी समाविष्ट केलेली नाही.

**शाह बाहेती चांडक अॅण्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**सीए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार**
**सभासद क्रमांक १३२९००**
**UDIN No:- 25132900BMIJXY4522**

**ठिकाण:— अकोला**
**अहवालाची तारीख:— २९ सप्टेंबर, २०२५**

*******

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितच्या स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाला नुसार

### परिशिष्ट 'ब'

(भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी वर्ष २०२४—२५ साठी जारी केलेल्या कायदेशीर आणि नियामक गरजेनुसार कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३(५) परिच्छेद—२ प्रमाणे)

आम्हाला कंपनीकडुन मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरण तसेच आम्ही केलेल्या अंकेक्षणा दरम्यान तपासलेल्या माहिती पुस्तके आणि रेकॉर्डच्या आधारे आम्ही असे विधान करतो की,

| अ. क्र. | विवरण | लेखा परीक्षकाचे निरिक्षण | वित्तीय प्रभाव |
|---|---|---|---|
| १ | माहिती आणि तंत्रज्ञान प्रणालीव्दारे सर्व लेखा व्यवहारावर प्रक्रिया करण्यासाठी महामंडळाकडे यंत्रणा आहे का? होय, असल्यास खात्यांच्या अखंडतेवर माहिती आणि तंत्रज्ञान प्रणाली बाहेरील लेखा व्यवहारांच्या प्रक्रियेचे परिणाम आणि आर्थिक परिणाम, जर काही असतील तर, सांगितले जाऊ शकतात. | i. महामंडळाकडे लेखा यंत्रणा (सिडफ्लो ईआरपी) प्रणाली आहे. तथापि बियाणे साठयाची देखरेख स्वहस्ते केली जाते. लेखा संगणक प्रणाली सिडफ्लो नुसार साठा आणि स्वहस्ते नोंद साठा हा जुळत नाही. वित्तीय विवरणातील साठा यादी ही कार्यालय स्तरावर ठेवलेल्या स्वहस्ते नोंदीनुसार घेतली जाते आणि मुख्य कार्यालयात एकत्रित केली जाते.<br>ii. स्थिर मालमत्तेचे तपशील घसारा इ. च्या कामकाजासह मुख्य कार्यालयातील संगणकात ''एक्सेल फाइल्स'' मध्ये राखले जातात. अशा प्रकारे हे रेकॉर्ड योग्य अधिकृतते शिवाय आणि लेखा सत्यापन शिवाय बदल/बदलासाठी खुले आहेत. | निरंक |
| २ | कर्जाची परतफेड करण्यात कंपनीच्या अक्षमतेमुळे कर्जाची पुर्नरचना आहे का किंवा कर्जदाराने कंपनीला दिलेले कर्ज/ व्याज ची माफी/सुट इत्यादी प्रकरणे आहेत का? होय असल्यास, आर्थिक परिणाम सांगितले जाऊ शकतात. अशा प्रकरणांचा योग्य हिशोब घेतला जातो की नाही? (जर, देणारी ही सरकारी कंपनी असेल, तर ही नियमावली त्या कंपनीच्या वैधानिक | वर्षभरात कर्ज/व्याज वगैरे माफ करण्याची कोणतीही प्रकरणे नाहीत. | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | लेखापरीक्षकासाठी देखील लागू आहे). | | |
| ३ | केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या संस्थाकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला/प्राप्त असलेला निधी (अनुदान) इ. त्याच्या अटी व शर्तीनुसार योग्य रीतीने जमा/वापरण्यात आला आहे का? फरक प्रकरणांची यादी करा. | निरंक | निरंक |

**विशिष्ट क्षेत्रानुसार असलेले उप—दिशानिर्देश**

| अ. क्र. | विवरण | लेखा परीक्षकाचे निरिक्षण |
|---|---|---|
| १ | भौतिक साठापडताळणी दरम्यान मिळालेल्या तुट किंवा अतिरिक्त साठ्याच्या बाबत समायोजन केल्यानंतर पॅकींग/सामुग्री प्रमाणीत वापरली जाते का आणि गुणवत्ता नष्ट होत असलेल्या जुन्या साठयाचा पुर्नविचार/योग्य विचार होत आहे का ? की ज्यामुळे साठयाची किंमत वाढत आहे? | होय, भौतिक साठापडताळणी दरम्यान मिळालेल्या तुट किंवा अतिरिक्त साठ्याच्या बाबत समायोजन केल्यानंतर पॅकींग/सामुग्री प्रमाणीत वापरली जाते. मागील वर्षाचा आलेला, ज्या साठयाची वैधता संपलेली आहे असा साठा पुनर्चाळणीसाठी किंवा कंपनी धोरणानुसार नॉन—सीड म्हणुन निविदेव्दारे विकला जातो. सर्व जुना साठा हा निव्वळ प्राप्त मुल्य या प्रकारे मोजमाप करण्यात येते, की ज्यामुळे सदरील साठयाची वाढीव किंमत येण्याची शक्यता खुप कमी आहे. |
| २ | कंपनीची कर्जे/अनुदान/शेतीविषयक इनपुट लाभार्थींना परत फेडीची कार्यक्षम यंत्रणा आहे का ? तसेच व्याजासहीत वसुलीची कार्यक्षम यंत्रणा आहे का ? | कंपनीची कर्जे/अनुदान/शेतीविषयक इनपुट लाभार्थींना परत फेडीची कार्यक्षम यंत्रणा आहे. तसेच व्याजासहीत वसुलीची कार्यक्षम यंत्रणा आहे. कंपनीने थेट लाभार्थींच्या बँक खात्यांवर NEFT/RTGS द्वारे परतफेड करण्याचे ठरविले आहे. |
| ३ | विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मिळालेले निधी/अनुदान हे लेखा मानकांनुसार मोजले आणि उदिष्टासाठी वापरले जाते? | होय, आर्थिक वर्ष २०२३—२४ मध्ये बियाणे गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेच्या बळकटीकरणासाठी रू. १८३.९६ लाखांचे अनुदान मिळाले आहे. आम्हाला कळविण्यात आले आहे की अनुदानाचा वापर उद्दिष्ट हेतु साठी आर्थिक वर्ष २०२३—२४ मध्ये रू. १४.०१ लाख झाला आहे. आणि शिल्लक रकमेचा वापर आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये रू. ३०.८९ लक्ष वापरले गेले आहे. तसेच, आरकेव्हीवाय अंतर्गत आर्थिक वर्ष २०२४—२५ मध्ये बियाणे गोदाम बांधकामासाठी रू. ६००.०० लक्ष अनुदान |

| | | |
|---|---|---|
| | | मिळाले आहे. त्याचा वापर अद्याप सुरू झालेला नाही. |
| ४ | लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा कंपनीच्या नफा आणि तोटा विवरणानुसार आहे का? | होय, लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा कंपनीच्या नफा आणि तोटा विवरणानुसार आहे |

**शाह बाहेती चांडक ॲण्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**सीए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार**
**सभासद क्रमांक १३२९००**
**UDIN No:- 25132900BMIJXY4522**

**ठिकाण:— अकोला**
**अहवालाची तारीख:— २९ सप्टेंबर, २०२५**

*******

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितच्या स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाला नुसार परिशिष्ट — क

( कंपनी कायदा २०१३ मधील कलम १४३(३)(i) नुसार वैधानिक व नियामक आवश्यकतेनुसार माहिती वर्ष २०२४—२५ साठी, हमी परिच्छेद 3(f) (मध्ये दिलेली आहे)

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३ च्या उप—कलम 3(i) अंतर्गत आर्थिक नियंत्रणावर अहवाल

आम्ही सदरील अहवाल वर्ष ३१ मार्च, २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या (कंपनी) वित्तीय विवरणाशी निगडीत असलेल्या, अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे अंकेक्षण केले आहे.

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणासाठी व्यवस्थापनाची जबाबदारी:**

सनदी लेखापाल संस्थेच्या (ICAI) मार्गदर्शक तत्वानुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रण जे की कंपनीने तयार केलेले आहे त्याची स्थापना आणि देखभाल करणे हे व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल करणे समाविष्ट आहे. कंपनी कायदा, २०१३ च्या अंतर्गत आवश्यक असलेल्या विश्वसनीय वित्तीय माहिती साठी कुशल आचरण, मालमत्तेचे संरक्षण, कंपनीचे धोरणांचे पालन, फसवणुक चुका शोधने आणि वित्तीय अचूकता आणि पूर्णता या सर्व गोष्टींचा समावेश होतो.

**अंकेक्षकाचे कर्तव्य :—**

कंपनीच्या आर्थिक उत्तरदायित्वावर आणि अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. सनदी लेखापाल संस्थेच्या (ICAI) अंतर्गत कायदयातील कलम १४३ (१०) नूसार निर्धारीत केलेल्या मानकांनुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे अंकेक्षण केले आहे. त्या मानकांनुसार आणि मार्गदर्शक तत्वानुसार पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केली गेली आहेत आणि ती काळजीपूर्वक राखून ठेवली आहेत. अशा नियंत्रणास सर्व भौतिक गोष्टींमध्ये प्रभावीरित्या कार्यरत असलेल्या आणि वाजवी हमीप्राप्त करण्यासाठी नैतिक आवश्यकतेची पुर्तता करण्यात आली आहे.

आमच्या लेखापरीक्षणात आर्थिक अहवाल आणि त्यांच्या प्रभावाखाली अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीच्या पर्याप्तितेबद्दल लेखापरीक्षण पुरावे प्राप्त करण्याची प्रक्रीया समाविष्ट आहे. ज्यामध्ये आर्थिक अहवाला अंतर्गत जोखिमींचे मूल्यमापन करणे, आर्थिक आराखडयाची तपासणी आणि मूल्यमापन करणे आणि अंतर्गत नियंत्रण यंत्रणा ही अशा मूल्यमापन केलेल्या जोखिमींवर आधारित आहे. वित्तिय विवरणाशी निगडीत असलेल्या प्रभावी जोखिमींचे मूल्यमापन, वित्तीय धोके किंवा त्रुटी आणि भौतिक चुकांमुळे होणाऱ्या जोखिमींच्या आकलनांचा देखील समावेश होतो.

आमचा असा विश्वास आहे की, आमचे अंकेक्षणीय मत प्रगट करण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रण यंत्रणा ही वित्तीय अहवालासाठी पुरेशी आणि योग्य आहे.

**आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा आशय :—**

कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रण यंत्रणा ही आर्थिक अहवालांची विश्वसनियता आणि सामान्यत: स्विकार्य लेखा नियमांनुसार आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आणि वाजवी आश्वासन पुरविण्यासाठी योग्य ठरेल अशी तयार करण्यांत आली आहे. कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रणात आर्थिक अहवालामध्ये अंतर्भूत असणारी धोरणे आणि पध्दतींचा समावेश होतो की, (१) अभिलेख्याच्या योग्यतेनुसार, पुरेसा तपशील, तपशीलाची अचुकता आणि त्याचा प्रामाणिकपणा दर्शविला जातो तसेच कंपनीच्या मालमत्तेबाबत योग्य माहिती दर्शविली जाते. (२) सामान्यत:

स्विकृत लेखापध्दती तत्वानुसार आर्थिक विवरणांची तयारी करण्यास आवश्यक असलेल्या व्यावहारिक तपशीलांची तरतूद करणे आणि कंपनीची प्राप्ती व खर्च हे फक्त व्यवस्थापन आणि संचालकांच्या अधिकृततेनुसारच दर्शविले जातात. (३) योग्य माहिती उपलब्ध करणे जेणेकरुन कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत संपादन, वापर किंवा मालमत्तेबाबत अयोग्य माहिती जिचा वित्तीय विवरणावर परिणाम होण्याची शक्यता असते अशी माहिती दर्शविली जाते.

**आर्थिक अहवालावर अंतर्गत वित्तिय नियंत्रणाच्या मुळ मर्यादा :—**

आर्थिक अहवालावर अंतर्गत वित्तिय नियंत्रणाच्या विहीत मर्यादेमुळे जसे की, अयोग्य व्यवस्थापन, व्यवस्थापनाचे संगनमत आणि फसव्या कारणांमुळे भौतिक दुर्वर्तन उद्‌भवू शकते; परंतु आढळू शकत नाहीत. तसेच भविष्यामध्ये होणाऱ्या व्यवहारांबाबत आर्थिक अहवालाच्या अटींमध्ये बदल झाल्यास किंवा प्रक्रिया आणि धोरणांच्या पूर्ततेत अधोगती झाल्यास अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे आर्थिक अहवालावर होणारे मूल्यमापन प्रभावित होण्याची शक्यता आहे.

**अहवाला बाबत पात्र मत :—**

आमच्या मते, कंपनीकडे सर्व महत्वपुर्ण विषयाबाबत वित्तीय अहवालावर पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दती आहे आणि अशा पध्दती ३१ मार्च, २०२५ पर्यंत प्रभावीपणे कार्यरत होत आहेत किंवा नाहीत आणि कंपनीद्वारा स्थापित वित्तीय अहवालावर अंतर्गत वित्तीय नियंत्रण मापदंडाच्या आधारावर तसेच भारताच्या सनदी लेखापाल संस्थेद्वारा निर्गमीत वित्तीय अहवाला अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परीक्षण व मार्गदर्शक तत्वानुसार अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकावर विचार करण्यात आलेला आहे.

**३१ मार्च, २०२५ पर्यंत लक्षात आलेल्या कमतरता खालीलप्रमाणे आहेत:**

अ. व्यापार प्राप्ती, व्यापार देय आणि बिजोत्पादकांना अग्रीम रक्कम इत्यादीची पुष्टी आणि समेट नियमितपणे केले गेले नाही.

ब. जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या आर्थिक विवरणांच्या संदर्भात, विभागीय कार्यालयात त्याची छाननी आणि देखरेख मजबूत करणे आवश्यक आहे.

क. वितरकांना दिल्या जाणारी सुट ही स्वहस्ते मोजल्या जात आहे आणि संगणक प्रणाली मध्ये नोंद केल्या जातात, ज्यामुळे आम्हाला त्याची अचूकता आणि परिणामकारकता यावर भाष्य करता येत नाही

ड. वितरकांकडून उशिरा शोधन केल्यावर आकारले जाणारे व्याज हे स्वहस्ते मोजले जात आहे आणि संगणक प्रणाली मध्ये नोंद केले जातात, ज्यामुळे आम्हाला त्याची अचूकता आणि परिणामकारकता यावर भाष्य करता येत नाही

इ. महामंडळाच्या अंतर्गत अंकेक्षण प्रणालीला अंकेक्षण क्षेत्र, व्याप्ती आणि कालावधी या क्षेत्रांमध्ये आणखी मजबूत करणे आवश्यक आहे.

फ. महामंडळाला आपले अंतर्गत आर्थिक नियंत्रण मजबूत करणे आवश्यक आहे आणि नियमित कालावधीत मुख्य कार्यालय आणि विभागीय कार्यालयांव्दारे त्याच्या कार्यक्षमतेची चाचणी घेणे आवश्यक आहे.

ग. काही कार्यालयात आर्थिक घटकांच्या हिशेबात विलंब होत असल्याचे निदर्शनास येते. व्यवस्थापनाने आर्थिक लेखा पुस्तके हे वेळेत ठेवणे व पुर्ण करणे आणि त्यामध्ये आठवडे किंवा महिन्यांचा विलंब होणार नाही हे सुनिश्चित केले पाहिजे.

घ. महामंडळाच्या सीड फ्लो (ERP) संगणकीय प्रणालीमध्ये खालील प्रमाणे अभाव दिसुन येतो.

१) प्रणालीमध्ये मागील तारखेच्या नोंदीना परवानगी आहे.

२) सीड फ्लो संगणकीय प्रणालीतील नोंदीमध्ये सुधारणा/हटविण्याची शक्यता आहे.

३) सीड फ्लो संगणकीय प्रणाली मधील तारखेव्यतिरिक्त इतर तारखेमध्ये नोंदी होऊ शकतात. व्हाउचर तारीख आणि नोंदीची तारीख वेगळी नोंदु शकत नाही.

४) बऱ्याच वेळेस लॉगिन फेल झाल्यानंतर पुन्हा प्रयत्न केले तर सीड फ्लो संगणकीय प्रणालीमध्ये कोणताही अडथळा येत नाही/ओळख गोठवून ठेवत नाही.

५) सर्व खरेदी/विक्रीची नोंद ही खरेदी/विक्री व्हाउचरव्दारे केली जात नाही, काही खरेदी/विक्री ची नोंद जनरल व्हाउचरव्दारे केली जाते आणि नंतर वर्षभरात एकूण खरेदी/विक्री मात्रेच्या प्रमाणात पोहोचण्यासाठी मात्रा स्वहस्ताने जोडली जाते.

६) सीडफ्लो मध्ये जैविक खत विक्रीसाठी सध्याची लेखा पध्दत अपुरी आहे आणि ती अद्ययावत करणे आवश्यक आहे.

**शाह बाहेती चांडक ॲण्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी कमांक १३०८९२W**

**सीए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार**
**सभासद कमांक १३२९००**
**UDIN No:- 25132900BMIJXY4522**

**ठिकाण:— अकोला**
**अहवालाची तारीख:— २९ सप्टेंबर, २०२५**

******

# ३१ मार्च, २०२५ रोजीचे ताळेबंद

(रुपये लक्षात)

| विवरण | टिपणी | ३१ मार्च, २०२५ रोजी | ३१ मार्च, २०२४ रोजी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **संपत्ती** | | | |
| **१अचल संपत्ती** | | | |
| अ)मालमत्ता, यंत्रसामग्री आणि उपकरणे | ३ | २९१७.५७ | २९८९.३५ |
| ब)काम चालू असलेली संपत्ती | ४/४६ | १७०.५८ | ७.८१ |
| क)इतर अमुर्त संपत्ती | ५ | १०.९५ | १६.२८ |
| ड)इतर अचल संपत्ती | ६ | ७४२.२६ | ९४४.७६ |
| इ)स्थगित कर संपत्ती (निव्वळ) | ४० | २३.८४ | |
| **२ चल संपत्ती** | | | |
| अ)साठा | ७ | ८०३३.०० | ७२९२.०० |
| ब)मालमत्ता, यंत्रसामग्री आणि उपकरणे व्यतिरिक्त असलेली जैविक संपत्ती | ८ | २७.०० | ३४.७७ |
| क) आर्थिक संपत्ती | | | |
| १. व्यापारी येणे | ९/४५ | ५५७७.४० | ६२५७.५० |
| २. रोख आणि रोख सममुल्य | १० | २४००४.९३ | १६४७५.५९ |
| ३. बँकेत जमा रक्कम (२ व्यतिरिक्त) | ११ | १२०९४.९७ | १८२१२.९८ |
| ४. इतर आर्थिक संपत्ती | ११.१ | २१३.१२ | २६७.०५ |
| ड) चल कर संपत्ती (निव्वळ) | १२ | ७९६.५५ | १२५८.७१ |
| इ) इतर चल संपत्ती | १३ | २३६५३.३७ | २२९९७.६० |
| **एकूण संपत्ती** | | **७८२६५.५४** | **७६७५४.२१** |
| **समभाग व देयता** | | | |
| **समभाग** | | | |
| अ) समभाग भांडवल | १४ | ४१८.४५ | ४१८.४५ |
| ब) इतर संचिती व अधिक्य | १५ | ४६०९१.७८ | ४४३०८.८० |
| **देयता** | | | |
| **१ अचल देयता** | | | |
| अ) भांडवल अनुदान | १६ | ३१०२.११ | २६४२.५८ |
| ब) राज्य सरकारच्या फिरता ऋणनिधी | १७ | ५००.०० | ५००.०० |
| क) स्थगित कर देयता (निव्वळ) | ४० | ०.०० | ३८.०४ |
| **२ चल देयता** | | | |
| अ)आर्थिक देयता | | | |
| १. कर्ज | १८ | ०.०० | ०.०० |
| २. व्यापारी देयता | १९/४४ | ६११०.३८ | ७७५८.३९ |
| ब) इतर चल देयता | २० | २०५७८.६८ | २०२३१.०५ |
| क) तरतुदी | २१ | २८.६३ | ५४.०८ |
| ड) चालु कर देयता (निव्वळ) | २२ | ६३५.५३ | ८०२.८० |
| **एकूण समभाग आणि देयता** | | **७८२६५.५४** | **७६७५४.२१** |

**आमच्या सोबतच्या अहवालाला लावलेली टिप्पणी १ ते ४७**
**आमच्या अहवालाच्या सम तारखेच्या अटी संदर्भात**

**मे. शाह बाहेती चांडक अॅण्ड कंपनी करीता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**संचालक मंडळाच्या वतीने व करीता**

**श्रीमती. भुवनेश्वरी एस, भा.प्र.से**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डिन क्र. ०८९५९०६८**

**श्री. विकास सी. रस्तोगी, भा.प्र.से**
**अध्यक्ष**
**डिन क्र. ०८८८१५७३**

**सी.ए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार,**
**सभासद क्र. १३२९००**
**UDIN No:- २५१३२९००BMIJXV४५२२**

**विनय वर्मा**
**कंपनी सचिव**
F-9585

**मनिष यादव**
**महाव्यवस्थापक (वित्त)**
F-38568

**अकोला, २९ सप्टेंबर, २०२५**

**मुंबई, २९ सप्टेंबर, २०२५**

## ३१ मार्च, २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा तोटा पत्रक

(रूपये लखात)

| | विवरण | टिपणी | ३१ मार्च, २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता | ३१ मार्च, २०२४ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता |
|---|---|---|---|---|
| I | व्यवसायातुन प्राप्ती | २३ | ५९०२५.३० | ५३७५६.७४ |
| II | इतर उत्पन्न | २४ | २४१४.६१ | २३७३.२१ |
| III | **एकूण उत्पन्न (I+II)** | | ६१४३९.९१ | ५६१२९.९५ |
| | | | | |
| IV | **खर्च** | | | |
| | वापर झालेल्या सामग्रीचा खर्च | २५ | १२६५.०५ | १२८९.४२ |
| | व्यापारातील सामग्रीची खरेदी | २६ | ४७०७८.६६ | ३९५७६.५२ |
| | तयार मालाच्या साठ्यातील बदल | | | |
| | तयार होत असलेला माल आणि व्यापारातील माल | २७ | —७९३.२३ | ११०६.२३ |
| | कर्मचारी लाभ खर्च | २८ | ५०४१.३६ | ४७६१.३६ |
| | वित्तीय खर्च | २९ | ४.९६ | ४.६६ |
| | घसारा आणि परिशोधन | ०३ | ३३७.४७ | ३४२.६३ |
| | इतर खर्च | ३० | ६२५३.१० | ५८७७.५७ |
| | **एकूण खर्च (IV)** | | ५९१८७.३७ | ५२९५८.३९ |
| | | | | |
| V | **अपवादात्मक बाबी आणि करपुर्व नफा/तोटा** | | २२५२.५४ | ३१७१.५७ |
| VI | करपुर्व नफा/तोटा | | २२५२.५४ | ३१७१.५७ |
| VII | कर खर्च | | | |
| | १. चालु कर | | ६३५.५३ | ८०२.८२ |
| | २. स्थगित कर | ४० | —६१.८८ | —४२.३१ |
| | **एकूण कर खर्च** | | ५७३.६५ | ७६०.५१ |
| VIII | चालु कामातुन कालावधीसाठी नफा/(तोटा) **(VI-VII)** | | १६७८.८९ | २४११.०६ |
| | | | | |
| IX | चालु कालावधीतील नफा/(तोटा) **(VIII)** | | १६७८.८९ | २४११.०६ |
| X | इतर सविस्तर उत्पन्न | | | |
| | अ) परिभाषित फायद्याची योजनेअंतर्गत आणि पुर्नमोजनीमुळे येणारा नफा/तोटा | २८ | २२९.६२ | १५२.५३ |
| XI | कालावधीसाठीचा एकूण सविस्तर उत्पन्न **(IX+X)** | | १९०८.५१ | २५६३.५९ |
| XII | कमाई प्रति समभाग(अखंडीत कामामधुन मिळालेले) | | | |
| | १. बेसिक (रुपयामध्ये) | ३९ | ४०१.२२ | ५७६.१९ |
| | २. डाईल्युटेड(रुपयामध्ये) | | | |
| XIII | कमाई प्रति समभाग(खंडीत व अखंडीत कामामधुन मिळालेले) | | | |
| | १. बेसिक(रुपयामध्ये) | ३९ | ४०१.२२ | ५७६.१९ |
| | २. डाईल्युटेड(रुपयामध्ये) | | | |

**आमच्या सोबतच्या अहवालाला लावलेली टिप्पणी १ ते ४७**
**आमच्या अहवालाच्या सम तारखेच्या अटी संदर्भात**

**मे. शाह बाहेती चांडक अँण्ड कंपनी करीता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**संचालक मंडळाच्या वतीने व करीता**

**श्रीमती. भुवनेश्वरी एस, भा.प्र.से**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डिन क्र. ०८९५९०६८**

**श्री. विकास सी. रस्तोगी, भा.प्र.से**
**अध्यक्ष**
**डिन क्र. ०८८८१५७३**

**सी.ए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार,**
**सभासद क्र. १३२९००**
**UDIN No:- २५१३२९००BMIJXY४५२२**

**विनय वर्मा**
**कंपनी सचिव**
**F-9585**

**मनिष यादव**
**महाव्यवस्थापक (वित्त)**
**F-38568**

**अकोला, २९ सप्टेंबर, २०२५**

**मुंबई, २९ सप्टेंबर, २०२५**

## ३१ मार्च, २०२५ रोजी समभागातील बदलाचे विवरण

**अ) समभाग भांडवल** (रुपये लक्षात)

| समभाग भांडवल | अहवाल वर्षातील प्रारंभिक शिल्लक | अहवाल वर्षातील समभाग भांडवलातील बदल | अहवाल वर्षातील अंतिम शिल्लक |
|---|---|---|---|
| **३१ मार्च, २०२४ ची शिल्लक** | ४९८.४५ | ०.०० | ४९८.४५ |
| **३१ मार्च, २०२५ ची शिल्लक** | ४९८.४५ | ०.०० | ४९८.४५ |

**ब) इतर समभाग** (रुपये लक्षात)

| इतर समभाग | संचिती आणि अधिक्य | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | भांडवली संचिती | संशोधित संचिती | साधारण संचिती | रोखलेली कमाई | |
| **३१ मार्च, २०२४ ची शिल्लक** | | | | | |
| अहवाल कालावधीतील प्रारंभिक शिल्लक | १४.३० | १२७४.८६ | १०९८.७४ | ३९४२८.४५ | ४१८१६.३५ |
| लेखा धोरण किंवा पुर्वीच्या कालावधीतील त्रुटीमधील बदल | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **०.००** |
| अहवाल वर्षातील प्रारंभिक पुर्नसंचयित शिल्लक | १४.३० | १२७४.८६ | १०९८.७४ | ३९४२८.४५ | ४१८१६.३५ |
| वर्षातील एकूण सविस्तर उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | २५६३.५९ | **२५६३.५९** |
| लाभांश | ०.०० | ०.०० | ०.०० | (७१.१४) | **(७१.१४)** |
| राखुन ठेवलेल्या कमाईकडे हस्तांतरण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **०.००** |
| राखुन ठेवलेल्या कमाईकडून हस्तांतरण | ०.०० | ५१.२७ | ६४.०९ | (११५.३६) | **०.००** |
| **अहवाल वर्षातील अंतिम शिल्लक** | **१४.३०** | **१३२६.१३** | **११६२.८३** | **४१८०५.५४** | **४४३०८.८०** |
| **३१ मार्च, २०२५ रोजीची शिल्लक** | | | | | |
| अहवाल कालावधीतील प्रारंभिक शिल्लक | १४.३० | १३२६.१३ | ११६२.८३ | ४१८०५.५४ | ४४३०८.८० |
| लेखा धोरण किंवा पुर्वीच्या कालावधीतील त्रुटीमधील बदल | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **०.००** |
| अहवाल वर्षातील प्रारंभिक पुर्नसंचयित शिल्लक | १४.३० | १३२६.१३ | ११६२.८३ | ४१८०५.५४ | ४४३०८.८० |
| चालु वर्षातील एकूण सविस्तर उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | १९०८.५१ | **१९०८.५१** |
| लाभांश | ०.०० | ०.०० | ०.०० | (१२५.५३) | **(१२५.५३)** |
| राखुन ठेवलेल्या कमाईकडे हस्तांतरण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **०.००** |
| राखुन ठेवलेल्या कमाईकडून हस्तांतरण | ०.०० | ३८.१७ | ४७.७१ | (८५.८८) | **०.००** |
| **अहवाल वर्षातील अंतिम शिल्लक** | **१४.३०** | **१३६४.३०** | **१२१०.५४** | **४३५०२.६४** | **४६०९१.७८** |

**आमच्या अहवालाच्या सम तारखेच्या अटी संदर्भात**
**मे. शाह बाहेती चांडक ॲण्ड कंपनी करीता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**संचालक मंडळाच्या वतीने व करीता**

**श्रीमती. भुवनेश्वरी एस, भा.प्र.से**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डिन क्र. ०८९५९०६८**

**श्री. विकास सी. रस्तोगी, भा.प्र.से**
**अध्यक्ष**
**डिन क्र. ०८८८१५७१**

**सी.ए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार,**
**सभासद क्र. १३२९००**
**UDIN No:- २५१३२९००BMIJXY४५२२**

**विनय वर्मा**
**कंपनी सचिव**
**F-9585**

**मनिष यादव**
**महाव्यवस्थापक (वित्त)**
**F-38568**

**अकोला, २९ सप्टेंबर, २०२५**

**मुंबई, २९ सप्टेंबर, २०२५**

## ३१ मार्च, २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता रोखप्रवाह विवरण

(रुपये लक्षात)

| विवरण | टिपणी | ३१ मार्च, २०२५ रोजी | | ३१ मार्च, २०२४ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| **अ) रोख प्रवाह प्रत्यक्ष व्यवहारातुन** | | | | | |
| अहवाल वर्षातील नफा | | | २२५२.५४ | | ३१७९.५७ |
| **समायोजनेसाठी** | | | | | |
| घसारा | | ३३७.४७ | | ३४२.६३ | |
| व्याज उत्पन्न | | —२०४६.२३ | | —१८९०.३७ | |
| आयकर खर्च | | ५७३.६५ | | ७६०.५९ | |
| भांडवल अनुदान समायोजन | | —१७६.२२ | | —१९१.४३ | |
| आर्थिक खर्च | | ४.९६ | | ४.६६ | |
| **मागील वर्षीय समायोजन** | | ०.०० | | ०.०० | |
| **संपत्ती विक्रीतुन नफा** | | —०.२० | | —०.०३ | |
| **वजा/वळती केलेले भाडे** | | ३.०७ | | २.०७ | |
| | | | —१३०४.३९ | | —९७१.९५ |
| **व्यावहारीक संपत्ती आणि देयता मधिल बदलपुर्व व्यावहारीक नफा समायोजनेसाठी** | १ | | ९४८.१५ | | २१९९.६१ |
| जैविक संपत्तीतील घट/(वाढ) | | ७.७७ | | —१७.२७ | |
| साठ्यातील घट/वाढ | | —७४९.०० | | ११२३.५० | |
| व्यापारी आणि इतर येणे मधिल घट/(वाढ) | | ९८०.२० | | १०२६.८३ | |
| इतर संपत्तीमधील घट/(वाढ) | | ५१४५.०१ | | —४०९.७५ | |
| व्यापारी देय, इतर देय आणि तरतुदी मधिल घट/(वाढ) | | ९५.७८ | | ३६१०.५५ | |
| परिभाषिक लाभांची पुर्नमोजणीचा परिणाम | | २२१.६३ | | १५०.५३ | |
| | २ | | ५४१७.२८ | | ५५६१.४० |
| **व्यवहारातुन रोख निर्मिती** | (१-२) | | ६३६५.४३ | | ७७६१.०१ |
| | | | | | |
| शोधन केलेला आयकर | | —३४०.६७ | | —२०७३.३५ | |
| **एकूण व्यवहारातुन मिळालेली रोख** | (२+३) | | ६०२४.७६ | | ६६९५.६६ |
| | | | | | |
| **ब) गुंतवणुकीतुन रोख प्रवाह** | | | | | |
| मालमत्ता विक्री किंवा विल्हेवाट | | ०.०० | | ०.०० | |
| मालमत्ता, वनस्पती व उपकरणे आणि इतर अमुर्त संपत्तीची खरेदी | | —४११.१६ | | —८३.८० | |
| भांडवली काम प्रगतीपथावर | | ०.०० | | ०.०० | |
| व्याज येणे | | २०४६.२३ | | १८९०.३७ | |
| **गुंतवणुक कृतीमध्ये वापरलेली निव्वळ रोख** | ४ | | १६३५.०७ | | १८०६.५७ |
| | | | | | |
| **क) आर्थिक व्यवहारातुन रोख प्रवाह** | | | | | |
| लाभांश शोधन (लाभांश करासहित) | | —१२५.५३ | | —७१.१४ | |
| आर्थिक खर्च | | —४.९६ | | —४.६६ | |
| **आर्थिक व्यवहारातुन निव्वळ रोख निर्मिती** | ५ | | —१३०.५० | | —७५.८० |
| | | | | | |
| **ड) रोख व रोख समतुल्यमधील निव्वळ वाढ/(घट)(अ.ब.क)** | (१+२+३+४+५) | | ७५२९.३४ | | ८४२६.४४ |
| **इ) प्रारंभिक रोख व रोख समतुल्य** | | | १६४७५.५९ | | ८०४९.१६ |
| **अंतिम रोख व रोख समतुल्य** | | | २४००४.९३ | | १६४७५.५९ |
| **रोख व रोख समतुल्यातील सभेट** | | | ७५२९.३४ | | ८४२६.४४ |
| **रोख व रोख समतुल्यामध्ये समाविष्ट असलेल्या :** | | | | | |
| **हातातील रोख** | | | १.७३ | | ०.६० |
| बँकेत असलेली रोख | | | | | |
| अ.चालू खाते | | | ८५०३.२० | | ७७५४.९९ |
| ब.निश्चित ठेव | | | १५५००.०० | | ८७२०.०० |
| मुदत ठेवी (३ महिन्यापेक्षा कमी) | | | | | |
| **ताळेबंदाप्रमाणे रोख व रोख समतुल्य** | | | २४००४.९३ | | १६४७५.५९ |

**लेखा मानकांच्या कलम ०७ नुसार रोख समालोचन**
**आमच्या अहवालाच्या सम तारखेच्या अटी संदर्भात**

**संचालक मंडळाच्या वतीने व करीता**

**मे. शाह बाहेती चांडक अ‍ॅण्ड कंपनी करीता**
**सनदी लेखापाल**
**फर्म नोंदणी क्रमांक १३०८९२W**

**श्रीमती. भुवनेश्वरी एस, भा.प्र.से**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डिन क्र . ०८९५९०६८**

**श्री. विकास सी. रस्तोगी, भा.प्र.से**
**अध्यक्ष**
**डिन क्र . ०८८८१५७३**

**सी.ए. दिपक व्ही. मुंदडा**
**भागीदार,**
**सभासद क्र . १३२९००**
**UDIN No:- २५१३२९००BMIJXY४५२२**

**विनय वर्मा**
**कंपनी सचिव**
**F-9585**

**मनिष यादव**
**महाव्यवस्थापक (वित्त)**
**F-38568**

**अकोला, २९ सप्टेंबर, २०२५**

**मुंबई, २९ सप्टेंबर, २०२५**

# ३१ मार्च, २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता वित्तीय विवरणावर टिपणी

## १ .महामंडळाची माहिती

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज) या कंपनीची स्थापना, कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदीनुसार भारतात स्थापन झालेली कंपनी आहे. या कंपनीचे नोंदणीकृत मुख्य कार्यालय महाबीज भवन, कृषि नगर, मुर्तिजापूर रोड, अकोला — ४४४१०४ येथे आहे. कंपनीचे कामकाज २८ एप्रिल, १९७६ पासून सुरु झालेले आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितचे मुख्य कार्यालय अकोला येथे असुन, २७ जिल्हा कार्यालये, ६ विभागीय कार्यालये व महाराष्ट्र राज्यामध्ये २३ बिज प्रक्रिया केंद्र आहेत. तसेच इतर राज्यामध्ये ४ कार्यालये आहेत. महामंडळाचे भागधारक महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, बिजोत्पादक शेतकरी आणि कृषी विद्यापीठे हे आहेत.

अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन हे महामंडळाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. दैनंदिन कारभार स्वंतत्र व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडून सांभाळण्यात येतो. महामंडळाचे संचालक मंडळामध्ये कृषक भागधारकांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी व राष्ट्रीय बियाणे महामंडळ यांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. महामंडळाचा व्यवसाय बिजोत्पादन आणि विपणन हा आहे. महामंडळाची शेतकरी बांधवांमध्ये चांगली प्रतिष्ठा असून 'महाबीज—आपल्या विश्वासाचे बियाणे' या नावाने महामंडळाचे बियाणे बाजारामध्ये उत्कृष्ठ गुणवत्तेकरीता ओळखले जाते.

महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार कडुन शेतकऱ्यांकरिता विविध योजना राबविण्यात येतात. यामध्ये तेलबिया आणि तेल पाम राष्ट्रीय योजना (NMOOP) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSM) ग्राम बिजोत्पादन योजना (SVS) व इतर योजना राबविण्यात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ महत्वाची भूमिका पार पाडत आहे.

## २ .महत्वाचे लेखाधोरण

### २.१ वित्तीय विवरणे तयार करण्याचा आधार

**अ) नियमांचे पालन:**

कंपनीने वित्तीय विवरणे (भारतीय लेखा मानक) (सुधारणा) नियम, २०१६ अन्वये आणि कंपनी अधिनियम, २०१३ मधील तरतुदींनुसार भारतीय लेखा मानक, २०१५ च्या अंतर्गत अधिसूचीत भारतीय लेखामानकानुसार सर्व साहित्यासंबंधीची पूर्तता करुन वित्तीय विवरणे तयार केलेली आहेत.

**ब) मापन आधार:**

कंपनीची आर्थिक विवरणे, सामान्यत: स्विकृत भारतीय लेखांकन तत्वानुसार (GAAP) असून, मागील किंमत व त्यासोबत मालमत्तेचा मेळ लावून वित्तीय विवरण तयार केलेले आहेत. यामध्ये काही असे तत्व ज्याची वास्तविक किंमत संबधित लेखामानकानुसार करणे आवश्यक असते त्याचा समावेश नसून ते खाली दिलेल्या धोरणामध्ये स्पष्ट केले आहे.

**क) अंदाजाचा उपयोग:**

वित्तीय विवरणे तयार करतांना मालमत्ता व देयता रकमेचे जाहीर प्रगटीकरण करण्यासाठी अहवालाच्या तारखेला कळविलेली रक्कम आणि त्याचा अहवाल वर्षात होणारा परिणाम याचा अंदाज व अनुमानाचे व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. जरी मालमत्ता व देयताबाबतचे अंदाज व्यवस्थापनाने त्यांच्या चांगल्या अनुभवानुसार चालू घटना व क्रिया विचारात घेऊन केलेले असले तरी त्याचा प्रत्यक्षात परिणाम वेगळा होतो. व्यवस्थापनाचे दृष्टीकोनातुन वित्तीय विवरणे तयार करतांना उपयोगात आणलेले अनुमानानुसार वित्तीय विवरणे हे दूरदर्शी व वाजवी

आहेत. लेखा अंदाज अपेक्षित बदल सद्यस्थितीत व भविष्यात काळात मान्य असू शकतात.

**ड) चलनाचे कार्यात्मक सादरीकरण**

वित्तीय विवरणे हे भारतीय रुपयामध्ये तयार केलेले असुन रुपया हे महामंडळाचे वास्तविक चलन आहे.

अ) परकीय चलनाचे व्यवहार हे ज्यावेळेस असे व्यवहार करण्यात आले असतील त्यावेळेस असलेल्या विनिमय दराला गृहीत धरुन नफा व तोटा पत्रकात दर्शविण्यात आले आहे.

ब) आर्थिक बाबी या विनिमय दराला गृहीत धरुन ताळेबंदाच्या तारखेपर्यंत रुपयापासुन परकीय चलनामध्ये रुपांतरीत करुन नफा व तोटा पत्रकात दर्शविण्यात आले आहे.

**२.२ महत्वपुर्ण लेखाधोरणे सारांश**

**I. कॅश फ्लो स्टेटमेंट:**

कॅश फ्लो स्टेटमेंट भारतीय लेखामानक ७ मधील अप्रत्यक्ष पध्दतीने तयार केलेले आहे. भारतीय लेखामानक ७ प्रमाणे रोख आणि बँकेतील रोख समकक्षामध्ये आणि हातातील रोख व डिमांड डिपॉझिट्स ज्यांची वैधता मूळ मुदतीसह तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी असते आणि अशा गुंतवणूकीची रोख रक्कमेत सहजतेने रुपांतर करता येते. बँक ओव्हर ड्राफ्टच्या बदलाचे मूल्य जे की, जोखिमीच्या अधिन असतात ते कंपनीच्या रोख व्यवस्थापनाचे अविभाज्य भाग मानले जातात.

**II. मालमत्ता, यंत्रसामग्री व उपकरणे:**

१. मालमत्ता, यंत्रसामग्री व उपकरणे यांची किंमत घसारा मूल्यासह आणि हानी जर असेल तर त्या किंमतीसह दर्शविली आहे.

२. किंमतीमध्ये मालमत्तांची प्रत्यक्ष अधिग्रहण किंमत आणि स्थावर मालमत्तेचा स्थापना खर्च असे सर्व थेट खर्च समाविष्ट आहेत, ज्यामध्ये कर, मालवाहतूक व आकस्मिक खर्च आणि निश्चित मालमत्तेला कार्यान्वित करण्याच्या स्थितीत आणण्यासाठी येणारा खर्च इत्यादीचा समावेश आहे.

३. भाडेतत्वावर असलेल्या जमीनीकरीता भरलेले अधिग्रहण अधिमूल्य किंमत म्हणून गृहीत धरलेले आहे.

४. प्रगतीपथावर असलेल्या मालमत्तेची किंमत ही त्या मालमत्तेची थेट किंमत, संबंधित प्रासंगिक खर्च आणि त्याकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज या तत्वावर घेण्यात आलेली आहे.

५. मुख्य प्रकल्प आणि पुनर्विकास खर्चाच्या खात्या अंतर्गत दर्शविण्यात आलेला खर्च हा प्रकल्पाच्या बांधकाम अंमलबजावणी नंतर झालेल्या सर्व खर्चाचे भांडवलीकरण प्रोराटा पध्दतीचे अनुसरण करुन स्थावर मालमत्तेची किंमत अंतिम करुन लेख्यात घेण्यात येईल.

६. पुर्नस्थापनेची किंमत, प्रमुख बदल, महत्वपुर्ण भागाची दुरुस्ती आणि दिर्घकालीन बांधकाम प्रकल्प याचे भांडवलीकरण मानांकीत मापदंड पूर्ण झाल्यास करण्यात येईल.

७. मालमत्ता विक्रीनंतरचे मूल्य व संचयित घसारा हे वित्तीय विवरण व परिणामी नफा नुकसान यामधून वगळून नफा व तोटा पत्रकामध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

**III. अमूर्त मालमत्ता:**

अमुर्त मालमत्तेमध्ये भविष्यात होणारे आर्थिक फायदे ज्याची किंमत विश्वसनियपणे मोजली जाऊ शकते. अशी मालमत्ता मागील गृहीत धरलेली किंमत वजा अपायकारक नूकसान या सूत्रावर निर्धारीत करण्यात आलेली आहे.

**IV. मालमत्तेची तरतूद/परतफेड:**

व्यवस्थापनाने विविध व्यावसायिक प्राप्ती व अल्पकालीन मालमत्ता ज्याची पुर्नप्राप्तीची संभावना संशयास्पद आहे. अशा मालमत्तेवर १०० टक्के तरतूद केलेली आहे.

**V. महसूल आधार:**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १२८ (१) नूसार कंपनीने खाते व्दिनोंद पध्दतीचा अवलंब करुन प्रत्यक्ष स्वरुपात झालेल्या व्यवहाराला गृहीत धरुन तयार केलेले आहे. खालील बाबी वगळता सर्व जमा खर्च हा प्रत्यक्ष स्वरुपात झालेल्या व्यवहाराच्या तत्वानूसार लेखांकीत करण्यात आलेला आहे.

अ) रोजंदारी श्रमिका बाबतचे उपदान व रजेचे रोखीकरण.

ब) बिजोत्पादका कडून वसूल करावयाचे रीग्रेडींग, रीस्मॅपलींग आणि तपासणी शूल्क.

क) विमा कंपनीकडून मिळालेली दाव्याची रक्कम.

ड) शासनाच्या विविध योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाची परतफेड.

इ) निम्नस्तर नापास बियाणे विक्रीपोटी वसूल केलेला सेवा खर्च.

फ) स्वमालकीच्या व भाडयाच्या मालमत्तेवरील कर.

ग) बीज प्रमाणिकरण यंत्रणेला दिलेले प्रमाणिकरण शुल्क आणि खर्च

**VI. भाडेपट्टी:**

१) भाडेपट्टेधारक

अ) भाडेपट्टी सुरू होण्याच्या तारखेला कंपनी वापरात येणारी मालमत्ता आणि भाडेपट्टी दायित्व ओळखते. मालमत्ता वापरण्याचा अधिकार सुरूवातीला किंमतीवर मोजल्या जातो, ज्यामध्ये सुरूवातीच्या तारखेला किंवा त्यापूर्वी केलेल्या कोणत्याही भाडेपट्टी शोधनासाठी समायोजीत केलेल्या भाडेपट्टी दायित्वाची प्रारंभीक रक्कम, तसेच कोणतीही प्रारंभिक थेट किंमत आणि मूलभूत मालमत्ता काढुन टाकण्यासाठी किंमतीचा अंदाज समाविष्ट असतो. मूलभूत मालमत्ता ज्या जागेवर आहे ती पुर्नसंचयित करण्यासाठी कोणत्याही भाडेपट्टीला प्रोत्साहन प्राप्त होते.

ब) भाडेपट्टीचा वापर अधिकार आणि मालमत्ता सुरूवातीच्या तारखेपासून शेवटच्या किंवा भाडेपट्टा मुदत समाप्तीच्या आधी सरळ रेषा पध्दतीचा वापर करून अवमूल्यन केले जाते. उपयोगात असलेल्या मालमत्तेचे अंदाजे उपयुक्त जिवीत मालमत्ता आणि उपकरणाच्या आधारावर अवमूल्यन निश्चित केल्या जाते. याव्यतिरिक्त मालमत्तेच्या वापराचा अधिकार अधूनमधून तोटा असेल तर कमी केला जातो आणि भाडेपट्टीच्या मोजमापासाठी समायोजित केला जातो.

क) भाडेपट्टी सुरूवातीला भाडेपट्टी शोधनाच्या चालू मूल्यावर मोजली जाते. जी सुरूवातीच्या तारखेला दिली जात नाही. भाडेपट्टीमध्ये अंतर्भूत व्याज दर वापरून सूट दिली जाते किंवा, जर तो दर सहजपणे निर्धारित केला

जाऊ शकत नसेल तर कंपनीचा वाढीव कर्ज घेण्याचा दर निर्धारित केल्या जातो.

ड) भाडेपट्टी देयक हे प्रभावी व्याज पध्दतीचा वापर करून अमूर्त किंमतीत मोजली जाते. भविष्यात भाडेपट्टीच्या शोधनामध्ये निर्देशांक किंवा दरामध्ये बदल झाल्यावर बदल केला जातो. जेव्हा उपयोगात असलेल्या मालमत्तेची वहन राशीत घट करून शून्य केली असता, भाडेपट्टी देणे हे तद्नुसार परत मोजले जाते. उपयोगात असलेल्या संपत्तीच्या वहन राशीचे एक समान समायोजन केले जाते व त्या राशीची नफा व तोट्यात नोंद केली जाते.

इ) कंपनी वापरात येणारी योग्य मालमत्ता सादर करते जी गुंतवणुकीच्या मालमत्तेची व्याख्या वापर मालमत्तेचा अधिकार मध्ये स्वतंत्रपणे ताळेबंदातील "इतर आर्थिक दायित्वांमध्ये" भाडेपट्टी सादर करते.

फ) अल्पमुदतीच्या मालमत्तांचे अल्प मुदती भाडे आणि भाडे कंपनी १२ महिन्यांच्या किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या भाडेपट्टे आणि कमी किंमतीच्या मालमत्तेच्या भाडेपट्टे असलेल्या अल्पकालीन भाडेपट्टयांसाठी वापरात नसलेली मालमत्ता आणि भाडेपट्टी देयता ओळखते व निवडते. या भाडेपट्टीशी संबधित भाडे शोधन कंपनी भाडेपट्टी मुदतीवर सरळ रेषेच्या आधारावर खर्च म्हणून ओळखते.

**२) भाडेपट्टेदार:**

जेव्हा कंपनी भाडेपट्टेदार म्हणून कार्य करते. तेव्हा प्रत्येक भाडेपट्टी आर्थिक भाडेपट्टी आहे की, कार्यरत भाडेपट्टी आहे हे भाडेपट्टी सुरू झालेवर ठरवते. प्रत्येक भाडेपट्टीचे वर्गीकरण करण्यासाठी कंपनी एक संपूर्ण मूल्यांकन करते की, अंतर्भूत मालमत्तेच्या मालकीला परतावा देते की भाडेपट्टी संपूर्णपणे जोखीम हस्तांतरीत करते. जर असे असेल तर भाडेपट्टी आर्थिक भाडेपट्टी आहे जर नसेल तर ती कार्यरत भाडेपट्टी आहे. मूल्यांकनाचा एक भाग म्हणून कंपनी काही विशिष्ट निर्देशकांचा विचार करते जसे की, भाडेपट्टी मालमत्तेच्या मिळकतीचा मुख्य भाग आहे का.

कंपनी 'इतर उत्पन्नाचा' भाग म्हणून भाडेपट्टी मुदतीवर सरळ रेषेच्या आधारावर कार्यरत भाडेपट्टी अंतर्गत प्राप्त भाडेपट्टी शोधनाला इतर मिळकत म्हणून ओळखते.

**VII. घसारा आणि परिशोधन:**

**मालमत्ता, यंत्रसामग्री आणि उपकरणे:**

अ) कंपनी कायदा, २०१३ च्या परिशिष्ट II मध्ये निर्देशित केल्यानुसार, मालमत्तेच्या उपयुक्त कालावधीवर लिखित मूल्य पध्दती Written Down Value Method (WDV) नूसार घसारा आकारण्यात आलेला आहे.

ब) कंपनी कायदा, २०१३ नूसार खरेदी/विक्री केलेल्या मालमत्तेवर घसारा प्रोराटा आधारावर आकारण्यात आलेला आहे.

क) कंपनी कायद्याच्या परिशिष्ट II नूसार सर्व उपयोगीता मालमत्तेचे मूल्य ज्याचा उपयोगी कालावधी ३१ मार्च, २०१४ रोजी संपलेला आहे व त्याची ५ टक्के पेक्षा कमी रक्कम पुढे नेण्यात आली आहे अशी मालमत्ता व इतर सर्व मालमत्ता बाबतीत उर्वरीत मूल्य मालमत्तेच्या मूळ किंमतीच्या ५ टक्के गृहीत धरण्यात आलेले आहे.

मालमत्ता यंत्रसामग्री व उपकरणे यांचे वर्तमान आणि तुलनात्मक कालावधीसाठी मालमत्तेचे अंदाजे उपयुक्त आयुष्य खालीलप्रमाणे आहे.

| विवरण | अंदाजे उपयुक्त आयुष्य |
|---|---|
| कार्यालयीन इमारत | ६० वर्षे |
| गोडावून | ३० वर्षे |
| यंत्रसामग्री व उपकरणे | १५ वर्षे |
| संगणक | ०३ वर्षे |
| कार्यालयीन उपकरणे | ०५ वर्षे |
| फर्निचर ॲन्ड फिक्स्चर | १० वर्षे |
| वाहन | ०८ वर्षे |

ड) परिशिष्ट II नुसार मोजण्यात येणाऱ्या भाडेपट्टयावरील संपत्तीचा अनुमानित उपयुक्त कालावधी हा किमान गृहीत धरुन मालमत्तेचे भांडवलीकरण करण्यात येते.

इ) अहवाल तारखेत घसारा पध्दती उपयुक्त जीवनमान व अवशिष्ट मूल्याचे पुनरावलोकन केले जाते.

ई) भाडेपट्टयाचे कालावधी शिवाय भाडेपट्टयाचे जमिनीचे प्रिमियम भाडेपट्टयाचे कालावधीच्या वेळेस परिशोधीत केलेले आहे.

## VIII. अमूर्त मालमत्ता:

अमूर्त मालमत्तेचा संबधित अंदाज उपयुक्त कालावधीवर सरळ रेषेत बसण्यासाठी उपलब्ध असलेल्या तारखेपासून अंमलबजावणी केली जाते. अमूर्त मालमत्तेचा अंदाजीत उपयोगीता कालावधी खालील प्रमाणे आहे

| अमूर्त मालमत्ता | उपयुक्त आयुष्य | स्वत: तयार केलेले/खरेदी केलेले |
|---|---|---|
| सॉफ्टवेअर | ६ वर्षे | खरेदी केलेले |

प्रत्येक अहवालाच्या तारखेला कर्जेमाफीच्या पध्दती, उपयुक्त जीवन आणि शेष मुल्यांचे पुनरावलोकन केले जाते.

## IX. गैरआर्थिक मालमत्तेचा अपव्यय:

अ) Ind AS-36 च्या प्रावधानानुसार नुकसानीचे काही संकेत आहेत का हे निर्धारित करण्यासाठी महामंडळाच्या मालमत्तेची चालू किंमत प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेवर तपासली जाते.

ब) जेव्हा मालमत्तेवरील खर्च हा त्याच्या वसूली योग्य मूल्यापेक्षा जास्त होतो, तेव्हा त्याला मालमत्तेचे मूल्य कमी होणे असे म्हणतात. असा खर्च हा सदरील अहवाल वर्षातील नफा आणि तोटा तक्त्यामध्ये दर्शविण्यात आला आहे.

क) प्रत्येक अहवालाच्या तारखेस महामंडळ नुकसानाची अनुमानित रक्कम मोजतो. पुर्वसूचनेच्या कालावधीमध्ये ओळखल्या गेलेल्या नुकसानीस तोटा परत मिळविता येण्याजोग्या अंदाजानूसार बदल झाला आहे आणि अशा प्रकारचे नुकसान यापुढे अस्तित्वात नाही किंवा कमी झाले आहे. नफ्यात झालेल्या नुकसानाची परतफेड नफा आणि तोटा विवरणामध्ये ओळखली जाते.

## X. स्कंध (साठा) मुल्यांकन:

अ) विविध प्रकारचे बियाणे व प्रक्रिया सामुग्री व इतर उपलब्ध सामुग्रीचे मूल्यांकन प्रत्यक्षपणे साठयाची पडताळणी करून व्यवस्थापनाद्वारे प्रमाणित करण्यात आले आहे.

पायाभुत बियाणे, प्रमाणित बियाणे यांच्या साठयाचे मूल्यांकन हंगामातील सरासरी भारांकीत मूल्य वा नक्त वसुलीयोग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्या

आधारावर करण्यात आलेले आहे. सदर मूल्यात खरेदी मूल्य, प्रक्रिया खर्च याचा समावेश आहे.

महामंडळाच्या व्यवसायाचे स्वरूप हे हंगामी असल्याने प्रती क्विंटल खर्चाचे मापन हे त्यापुर्वीच्या हंगामातील प्रति क्विंटल सरासरी मूल्याच्या आधारावर करण्यात आले आहे.

प्रक्रिया सामुग्रीचे मूल्यांकन हे भारांकीत सरासरी ज्यात प्रत्यक्ष खर्च व अन्य खर्चाचा समावेश नाही. या आधारावर करण्यात आलेले आहे.

ब) ज्या बियाण्याची वैधता संपलेली आहे, असे बियाणे पुर्नप्रमाणित करण्यात येते अथवा नॉनसीड म्हणुन विकण्यात येते. ज्या बियाण्याचे पुर्नप्रमाणिकरण झालेले आहे; परंतु ज्याचे निकाल ३१ मार्च नंतर प्राप्त झाले, अशा संभाव्य प्रमाणित बियाण्याचे मूल्यांकन उपरोक्त (अ) प्रमाणे करण्यात आलेले आहे. नापास/निम्नस्तर/नॉन सीड इत्यादीचे मूल्यांकन नक्त वसुलीयोग्य किंमतीच्या आधारावर करण्यात आलेले आहे.

क) प्रक्रियेत असलेल्या नवीन साठ्याचे त्याचप्रमाणे ज्या नवीन साठ्याचे निकाल अद्याप अप्राप्त आहेत अशा बियाण्याच्या साठ्याचे मूल्यांकन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**i. महामंडळाच्या स्वत:च्या साठ्याबाबत:**

चांगले बियाणे व निकाल अप्राप्त असलेल्या बियाण्याचे बाबतीत खरेदी खर्च, अधिक वापरात आणलेला बारदाना व कापडी पिशव्या यावरील खर्च अशा एकूण किंमतीने मूल्यांकन केलेले आहे. तथापि, ३१ मार्च नंतर जो साठा नापास झाला त्याची किंमत एकूण किंमतीतुन कमी करण्यात आलेली नाही.

**ii. बिजोत्पादकांच्या साठ्याबाबत:**

ज्या बियाण्याबाबत निकाल हा अप्राप्त आहे अशा बियाण्याबाबत वापरात आणलेला बारदाना व कापडी पिशव्याच्या किंमतीचे मूल्यांकन केलेले आहे.

ड) नूतनीकरण साठ्याबाबत पुन:प्रक्रिया करण्याचा खर्च रिप्लेसमेंट कॉस्ट म्हणुन त्याची गणना करण्यात आलेली आहे.

**XI. जैविक मालमत्ता:**

१. जैविक मालमत्तेत वाढ होत असलेल्या रोपांचा समावेश आहे. जे की प्रत्येक अहवाल वर्षाच्या शेवटी विक्रीसाठी कमी किंमतीवर मोजली जातात. महामंडळ मालाच्या किंमतीमध्ये जैविक मालमत्तेसाठी पुर्नउत्पादित जैविक मालमत्ते पासून मिळणारे फायदे आणि नुकसान यांचे वर्गीकरण करते.

२. उभी रब्बी पीके व नर्सरीचा साठा याची किंमत खरे मूल्य वजा विक्री मूल्य म्हणजे सदर साठा विपणन योग्य करण्यासाठी खर्च तसेच अद्याप पर्यंत खर्च करावयाचा भत्ता मिळविल्यानंतर आणि शेतविषयक जोखिमींची कामे याचा खर्च गृहीत धरुन ठरविण्यात येतो. पुर्व खरीपाचे किंमती हे त्याच्या उचित किंमतीचे अंदाज लावून ठरविल्या जातात आणि जैविक मालमत्ता खात्याच्या अंतर्गत याचा समावेश होतो.

३. पडीत जमीन/बांधावर उगवलेली व्यावसायीक झाडे किंवा वृक्षारोपणाकरीता उपयोगात येणाऱ्या झाडाच्या कटाईसाठी आवश्यक प्राधिकरणाची परवानगी घेण्यात येते. उभ्या वृक्षाचे मूल्य हे वनविभागाव्दारे निश्चित केलेल्या वृक्षाच्या घेरानूसार प्रति क्यूबिक मिटर प्रमाणे ठरविण्यात येते.

| अ.क्र. | विवरण | रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|
| १. | सुरुवातीचे शिल्लक | ३४.७७ |
| २. | खरेदी | १०४.९० |
| ३. | विक्री | ११२.६७ |
| ४. | अखेरचा साठा | २७.०० |

**XII. घेतलेल्या कर्जाची लागत:**

१. घेतलेल्या कर्जाची लागत ही संपादित करण्यासाठी संपत्तीचे एकत्रिकरण व भांडवलीकरण करुन पात्र संपत्तीची एकूण किंमत गृहीत धरण्यात येते. पात्र संपत्ती म्हणजे अशी संपत्ती जीच्या नियोजित वापरासाठी किंवा विक्रीसाठी तयार होण्यास बराच कालावधी लागतो.

२. इतर सर्व घेतलेल्या कर्जाची लागत ही नफा व तोटा पत्रकात दर्शविली आहे.

**XIII. शासकीय अनुदान:**

भारतीय लेखामानक २० अनूसार शासकीय अनुदानाकरीता खालील लेखाधोरण अनूसरीत करण्यात आलेले आहे.

अ) खेळते भांडवल म्हणून मिळालेले शासकीय अनुदान उत्पन्न म्हणून संबोधले आहे जे की हेतुपरस्पर संबधित असलेल्या खर्चाशी पध्दतशीर सुंसगत केलेले आहे.

ब) विशिष्ट प्रकल्पाकरीता मिळालेले अनुदान हे स्थगित उत्पन्नाशी संयोजित करुन ताळेबंदामध्ये दर्शविले आहे. संयोजित केलेले स्थगित उत्पन्न हे संपत्तीच्या उपयुक्त जीवनाशी पध्दतशीर सुसंगत केले आहे.

क) महसुली स्वरूपाचे जे अनुदान मिळालेले आहे त्या पैकी ज्या अनुदानाचा वापर झालेला आहे ते नफा–तोटा खात्याला जमा केलेले आहे.

**XIV. कर्मचाऱ्यांचे लाभ:**

**अ) कर्मचाऱ्यांचे अल्पमुदती लाभ:**

महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे सेवा संबंधी अल्प मुदती लाभाचे मान्यताप्राप्त खर्च नफा–तोटा पत्रकामध्ये दर्शविण्यात येतात.

**ब) कर्मचाऱ्यांना निवृत्ती नंतरचे लाभ:**

**i. भविष्य निर्वाह निधी**

कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे महामंडळाचे अंशदानाचा मासीक दर निश्चित आहे. हे निश्चित मासीक अंशदान नियमीतपणे दरमहा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठन, भारत सरकार यांचेकडे विहीत काल मर्यादेत जमा केल्या जाते व ही रक्कम नफा–तोटा पत्रकामध्ये नावे टाकण्यात येते.

**ii. उपदान**

महामंडळाच्या आस्थापनेवरील पात्र कर्मचाऱ्यांकरीता उपदान (सेवा निवृत्ती लाभ) योजना आहे. निवृत्त होणारे कर्मचारी, नोकरी दरम्यान मृत्यु अथवा बडतर्फ कर्मचारी यांना सेवा झालेल्या प्रत्येक पुर्ण वर्षाकरीता १५ दिवसांच्या वेतनाऐवढा लाभ दिला जातो. कंपनीने भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे उपदान निधी पॉलीसी काढलेली आहे. या निधी करीता भारतीय आयुर्विमा महामंडळ प्रोजेक्टेड युनिट क्रेडीट मेथड पध्दतीने महामंडळाची देयता दरवर्षी

निश्चित करते व ही देयता रक्कम नफा–तोटा पत्रकामध्ये नावे टाकण्यात येते.

iii. **अर्जित रजा रोखीकरण–**

नियमीत कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा रोखीकरणा करीता भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे पॉलीसी काढलेली आहे या पॉलीसी च्या देय रकमेचे निर्धारण भारतीय आयुर्विमा महामंडळ प्रोजेक्टेड युनिट क्रेडीट मेथड पध्दतीने महामंडळाची देयता दरवर्षी निश्चीत करते व ही देयता रक्कम नफा–तोटा पत्रकामध्ये नावे टाकण्यात येते.

**XV. विविध कर:**

**उत्पन्नावरील कर विक्रीकर, वस्तू व सेवा कर**

i. अहवाल वर्षातील करामध्ये वर्तमान आयकर आणि स्थगित कर यांचा समावेश आहे.

ii. चालू वर्षाचा कर हा आयकर कार्यालयाकडे प्रचलीत कर दरानूसार परिगणना करुन अपेक्षीत रक्कमेचा भरणा करण्यांत येतो.

iii. कराचा दर व कर आकारण्याकरीता ज्या देशामध्ये महामंडळाचे व्यवसायिक क्षेत्र आहे व ज्या क्षेत्रामध्ये करयोग्य रक्कम कमविण्यात आलेली आहे त्याचा विचार करुन कर भरण्यात येतो.

iv. चालू करामध्ये इतर सर्वसाधारण उत्पन्न म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्पन्नाचा समावेश असून त्याला (OCI) म्हणून संबोधित करण्यात येते.

v. विक्रीकर, उत्पन्न कर आणि वस्तू व सेवा कर याबाबतीत देय किंवा प्राप्त असलेल्या शासकीय आदेशाचे लेखाकंन ज्यावर्षी असे आदेश प्राप्त झाले आहेत त्याचवर्षी करण्यात येते.

vi. खरेदी केलेल्या वस्तूवर आकारलेल्या विक्रीकर आणि वस्तू व सेवाकर पोटी मिळालेल्या टॅक्स क्रेडीट/सेंटऑफ यामधील फरक प्रत्यक्ष मिळालेल्या टॅक्स क्रेडीट/सेंटऑफ च्या पोटी खाते जमा करण्यात येतो व त्याचे लेखाकंन ज्यावर्षी शासकीय आदेश प्राप्त झाले आहेत त्याचवर्षी करण्यात येते.

**स्थगित कर:**

भारतीय सनदी लेखापाल संस्थेने निर्धारीत केलेल्या भारतीय लेखा मानांक १२ (Ind AS) नूसार 'मिळकतीवरील कर' प्रमाणे

i. स्थगित मिळकत कर संपत्ती आणि देयता हे तात्पुरत्या फरकासाठी ओळखले जाते. जे की अहवाल तारखेस असलेल्या कर दर आणि कर कायदा यामधील आकडेमोडी नंतर गुणन केले जाते.

ii. स्थगित मिळकत कर संपत्ती, कर दायित्व असलेला नफा हा वजायोग्य तात्पुरते फरक असलेला, वर्षानुवर्ष पुढे चालत आलेला परंतु न वापरात आलेला आणि तसेच जमा असलेला कर आणि न वापरलेला तोटा असलेला कर यासोबत वापरण्यात येवु शकतो.

iii. स्थगित मिळकत कर संपत्तीची प्रवाहीत किंमत ही प्रत्येक अहवाल तारखेला पुनरावलोकीत केली जाते आणि तिच किंमत स्थगित मिळकत कर दायित्व असलेला नफा हा स्थगित मिळकत कर संपत्ती यासोबत वापरण्यात येण्यापर्यंत वजा होवू शकतो.

iv. OCI (इतर सविस्तर उत्पन्न) शी संबधित असलेले स्थगित कर हे इतर सविस्तर उत्पन्न म्हणून संबोधले जातात.

**XVI. प्रति भाग उत्पन्न :**

१. मुळ प्रतिभाग लाभ हा अहवाल वर्षातील नफा किंवा तोटा याला अहवाल वर्षातील थकबाकीत असलेले सरासरी सर्व समभाग यांनी विभागून निर्धारीत

केला जातो. समभागांची विभागणी आणि अधिलाभांश भाग निर्धारीत करण्यासाठी अहवाल वर्षातील थकबाकीत असलेले सरासरी सर्व समभाग हे समायोजित केले जातात.

२. सौम्य प्रतिभाग लाभ हा अहवाल वर्षातील नफा किंवा तोटा याला अहवाल वर्षातील थकबाकीत असलेले सरासरी सर्व समभाग यांनी विभागून निर्धारीत केला जातो. सर्व संभाव्य समभाग निर्धारीत करण्यासाठी अहवाल वर्षातील थकबाकीत असलेले सरासरी सर्व समभाग आणि समभागधारक हे समायोजित केले जातात.

**XVII. संभाव्य देयता आणि संभाव्य मालमत्ता:**

**अ) संभाव्य देयता खालील दिलेल्या बाबींनूसार दर्शविल्या जातात.**

i. मोजमापनामध्ये अंर्तभूत केलेल्या अशा तरतुदी की, ज्या मध्ये अंदाज पत्रकाचा उल्लेखनीय सहभाग असतो मागील घटना मध्ये अशा तरतुदी विश्वसनीय पध्दतीनूसार अंदाजपत्रक करुन निर्धारीत करण्यात आले आहे. किंवा

ii. आजच्या दायित्वाची संपूर्णपणे विश्वसनीय अंदाजपत्रक दिल्या जाऊ शकत नाही किंवा

iii. शक्य असलेले दायित्व ज्यांची अंदाजपत्रकामध्ये परतावा होण्याची शक्यता असते.

ब) शक्य असलेले अंर्तभूत होणारे आर्थिक लाभ हे संभाव्य संपत्ती म्हणून दर्शविल्या जाते.

क) प्रत्येक अहवालाच्या तारखेला संभाव्य देयता आणि संभाव्य संपत्तीचे पूनरावलोकन केले जाते.

ड) संभाव्य देयता ही निव्वळ अंदाजपत्रीत तरतुदीचा तोडगा काढण्याची संबधीत शक्य असलेला बर्हीप्रवाह आहे.

**XVIII. समभागधारकांना देण्यात येणारा लाभांश:**

वर्षाकरीता देय असलेला लाभांश हा समभागधारक किंवा संचालक मंडळ यांनी मान्य केल्या नंतर त्याच वर्षी देय राहील.

**XIX. संशोधन व विकास खर्च:**

Ind-AS-३८ च्या पुर्ततेकरीता (अमुर्त संपत्ती) महामंडळामार्फत नवीन संशोधित बियाणे वाण विकसीत करण्यासाठी महसुली/भांडवली खर्च करण्यात येतो तो नफा–तोटा पत्रकामध्ये त्याच वर्षी नावे टाकण्यात येते.

**XX. वाजवी मूल्यमापन:**

अ) कंपनी अहवाल दिनांकापर्यंत काही आर्थिक साधनाचे वाजवी मुल्यांकन करते. वाजवी मूल्य ही अशी किंमत आहे की, जी मालमत्ता विकण्यासाठी प्राप्त होईल किंवा दायित्व हस्तांतरीत करण्यासाठी दिली जाईल, यामुळे निश्चित तारखेला बाजार सहभागींमधील सुस्थितीत व्यवहार कळतो. असे गृहीत केले जाते की, वाजवी मूल्याचे मापन हे मालमत्ता विक्रीसाठी किंवा दायित्वाचे हस्तांतरण करण्यासाठी मुख्य बाजारापेठ किंवा मुख्य बाजारपेठ नसताना, मालमत्ता आणि दायित्वसाठी मूल्यमापन हे फायदेशीर ठरते.

ब) कंपनीसाठी मुख्य किंवा सर्वात फायदेशीर बाजार उपलब्ध असणे आवश्यक आहे. मालमत्ता किंवा दायित्वाचे वाजवी मूल्य बाजारातील सहभागी

असणाऱ्यांच्या हितासाठी सर्वोत्तम कार्य करतात, असे गृहीत धरून मालमत्ता किंवा दायित्वाची किंमत ठरविताना बाजारातील सहभागी वापरतील अशा गृहितकांचा वापर करून मोजले जाते. कंपनी मुल्यांकनाचे तंत्र वापरते ज्या परिस्थितीमध्ये योग्य मूल्य मोजण्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध असते, संबंधित निरीक्षण करण्यायोग्य स्त्रोताचा जास्तीत जास्त उपयोग करणे आणि न पाहता येणाऱ्या साधनाचा उपयोग कमी करणे.

**XXI) वित्तीय साधने:—**

**प्रारंभिक ओळख:**

आर्थिक मालमत्ता आणि देयता तेव्हा अधिकृत केले जातात जेव्हा कंपनी दस्तऐवज कराराच्या तरतुदींचा पक्ष बनते. आर्थिक मालमत्ता आणि देयता हे सुरुवातीला वाजवी मूल्यावर मोजली जातात. आर्थिक मालमत्ता आणि देयतेच्या (आर्थिक मालमत्ता आणि नफा व तोटा याव्दारे वाजवी मूल्यावर देयते व्यतिरीक्त) बरोबर असणारी किंवा संपादन करण्यासाठी थेट कारणीभूत असलेले व्यवहार खर्च आर्थिक मालमत्तेच्या किंवा आर्थिक देयतेच्या सुरुवातीच्या वाजवी मूल्यामध्ये जोडले जातात.

त्यानंतरचे मोजमाप

आर्थिक मालमत्ता

**आर्थिक मालमत्तेचे खालील श्रेणींमध्ये वर्गीकरण केले आहे:**

**अ. परिशोधीत खर्चावर**

जेव्हा या आर्थिक मालमत्ता रोख प्रवाह गोळा करण्याच्या उद्दिष्टानूसार एखाद्या व्यवसायात गुंतवल्या जातात तेव्हा या मालमत्तेचा रोख प्रवाह गोळा करण्यासाठी करार केला जातो आणि आर्थिक मालमत्ता कराराच्या अटीनूसार केवळ मुद्दल आणि थकित व्याजाच्या देयकासाठी निर्दिष्ट तारखांना रोख प्रवाह वाढवतात.

**ब. इतर सर्वसमावेशक उत्पन्नाव्दारे वाजवी मूल्य**

आर्थिक मालमत्ता या इतर सर्वसमावेशक उत्पन्नाव्दारे वाजवी मूल्याने मोजल्या जातात जर या आर्थिक मालमत्ता एखाद्या व्यवसायात ठेवल्या गेल्या असतील ज्याचे उद्दिष्ट करारात्मक रोख प्रवाह गोळा करुन आणि आर्थिक मालमत्ता विकून कराराच्या अटी या दोन्हीव्दारे साध्य केले जाते. आर्थिक मालमत्तेवर विनिर्दिष्ट तारखांना रोख प्रवाह वाढवतात जे केवळ मुद्दल आणि थकित मूळ रक्कमेवरील व्याजाची देयके असतात.

कंपनीने व्यापारासाठी न ठेवलेल्या भांडवल गुंतवणुकीच्या वाजवी मूल्यामध्ये नंतरच्या इतर सर्वसमावेशक उत्पन्नामध्ये बदल सादर करण्यासाठी एक अपरिवर्तनीय निवड केली आहे.

**क. वाजवी मूल्याच्या माध्यमातून नफा व तोटा**

आर्थिक मालमत्तेचे मोजमाप जोपर्यंत नफा व तोटा याव्दारे वाजवी मूल्यावर केले जाते तोपर्यंत ते परिशोधित खर्चावर किंवा सुरुवातीच्या वेळी इतर सर्वसमावेशक उत्पन्नाव्दारे वाजवी मूल्यावर मोजले जात नाही. व्यवहाराच्या किंमतीवरुन थेट

आर्थिक मालमत्ता आणि देयतेच्या संपादनाशी संबंधित तोटा हा वाजवी मूल्यावर नफ्याव्दारे ताबडतोब ओळखला जातो.

**ड. सहाय्यकामधील गुंतवणूक**

सहाय्यक कंपनीमध्ये गुंतवणूकीचे मोजमाप हे Ind AS -27 विभक्त वित्तीय विवरणानुसार खर्चावर केले जाते.

**आर्थिक देयता**

आर्थिक देयता खालीलप्रमाणे वर्गीकृत आहेत:

**अ) परिशोधित खर्चावर आर्थिक देयता**

आर्थिक देयता सुरुवातीला व्यापार आणि इतर देय, सुरक्षा ठेवी आणि धारण रुपये इत्यादीव्दारे दर्शविल्या जाणा—या मूल्यावर आणि नंतर प्रभावी व्याजदर पध्दतीचा वापर करुन परिशोधित खर्चावर ओळखली जातात.

**ब) FVTPL वर आर्थिक देयता**

कंपनीने FVTPL मध्ये कोणतेही आर्थिक देयता नियुक्त केले नाही.

**ड) ओळख रद्द करणे**

**आर्थिक मालमत्ता**

एखादी आर्थिक मालमत्ता (किंवा, जेथे लागू असेल, आर्थिक मालमत्तेचा एक भाग किंवा तत्सम आर्थिक मालमत्तेच्या गटाचा एक भाग) ज्या मालमत्तेच्या मालकी बक्षीस मान्यता रद्द केली जाते जेव्हा मालमत्तेतून रोख प्रवाहाचा कराराचा अधिकार संपुष्टात येतो किंवा ती आर्थिक मालमत्ता नाहीसे होते आणि त्यापुढे महत्वपुर्ण आवश्यक प्रमाणात सर्व जोखीम हस्तांतरित करते.

**आर्थिक देयत्ता**

जेव्हा देयता, अंतर्गत देयता सोडले जाते किंवा रद्द केले जाते तेव्हा आर्थिक देयतेची मान्यता रद्द केली जाते. जेव्हा विद्यमान आर्थिक देयता समान देणेदाराकडून बरेच भिन्न अटींवर बदलले जाते किंवा विद्यमान देयतेच्या अटींमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले जातात, जेव्हा देवाणघेवाण किंवा बदलामुळे मूळ देयतेची मान्यता रद्द होते आणि नवीन देयतेची सुरुवात होते असे मानले जाते, संबधित वहन रक्कमेतील फरक नफा आणि तोटा पत्रकामध्ये ओळखला जातो.

५ वर्षाहुन अधिक काळ व्यवहार न चालवणाऱ्या पक्षांची सुरक्षा आणि ईएमडी खात्यांमध्ये नावे जमा परत लिहीली जाते.

**फ. आर्थिक मालमत्तेचे नुकसान:**

कंपनीने कमकुवत तोटा ओळखण्यासाठी अपेक्षीत नावे नुकसान (ECL) मॉडेल लागू केलेले आहे. व्यापारात प्राप्त होणारे कमकुवत नुकसान विचारात घेउन कंपनी 'सरलीकृत दृष्टिकोन' अवलंबते. सरलीकृत पध्दतीच्या वापरामुळे कंपनीच्या नावे जोखीम मधील बदलांचा मागोवा घेण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी,

अपेक्षीत नावे नुकसान (ECL) हे सुरुवातीपासुन ते अहवाल तारखेपर्यंत आजीवन कमकुवत नुकसान विचारात घेते.

कंपनी परिशोधित खर्चावर आणि इतर सर्वसमावेषक उत्पन्नाव्दारे वाजवी मूल्याचे कर्जसाधनाच्या आधारे मालमत्तेशी संबंधित नुकसानाचे अंदाजानूसार मूल्यांकन करते. जोखमीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे की नाही यावर ही पध्दत लागू होते.

या कालावधीतील विचारात घेतले जाणारे अपेक्षीत नावे नुकसान (परतवण्यासाठी) हे नफा आणि तोट्याच्या विवरणात उत्पन्न/खर्च म्हणून ओळखले जाते.

**ग. लेखांकन धोरण — जमा पुष्टीकरण**

महामंडळ जमा पुष्टीकरणाची एक प्रक्रिया अवलंबते ज्यामध्ये खालील खातेदाराकडून जमा पुष्टीकरण घेतले जात नाही.

१. विविध देणेकरी जे योग्य लेखा दस्तऐवज ठेवत नाहीत आणि पूर्णपणे महामंडळाच्या लेखा पुस्तकावर अवलंबून असतात.

२. असे विक्रेत्याचा शोध घेणे शक्य नाही सद्यस्थितीत जे सक्रिय नाहीत, आणि त्याचे जमा पुष्टीकरण सहज मिळवता येत नाही.
महामंडळाच्या आर्थिक अहवालाची प्रामाणिकता राखताना पुष्टीकरण प्रक्रियेत व्यावहारिकता आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी हा दृष्टिकोन लागू केला जातो.

**XXII) इतर उत्पन्न**

निविदा फार्मच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न, व्याजाचे उत्पन्न, सरकारी अनुदान, खाते बंद केलेली विविध शिल्लक (निव्वळ) प्राप्त विमा दावा, भंगार विक्री, वसूल दंड, अतिरिक्त केलेली तरतूद परत करणे इतर विविध अशा उत्पन्नाची प्राप्ती अनिश्चित असल्यास उत्पन्नाचा हिशोब जमा आधारावर केला जातो.

**XXIII) अहवाल कालावधीनंतर घडणाऱ्या घटना**

ताळेबंद तारखेनंतर घडणाऱ्या सामग्री समायोजन घटना (ज्या ताळेबंद तारखेला अस्तित्वात असलेल्या स्थितीचा पुरावा देतात) आर्थिक विवरणांमध्ये ओळखल्या जातात. ताळेबंद तारखेनंतर (ज्या ताळेबंद तारखेनंतर उध्दभवणाऱ्या अटी दर्शवतात) घडणाऱ्या गैर समायोजित घटना आर्थिक स्थितीवर परिणाम करणारे भौतिक बदल आणि बचनबध्दतेचे प्रतिनिधित्व करतात.

## स्थावर मालमत्ता, यंत्रसामुग्री आणि उपकरणे २०२४–२५

(रुपये लाखात)

| संपत्ती | ०१.०४.२०२४ रोजी | स्थुल संग्रह: वाढ: स्वनिधी | वाढ: अनुदान | काढलेली रक्कम: विक्री समायोजन | काढलेली रक्कम: अनुदाना पैकी | एकुण ३१.०३.२०२५ | घसारा: ०१.०४.२०२४ रोजी | वर्षाकरीता | विक्री | IND AS Transaction | एकुण ३१.०३.२०२५ | नक्त संग्रह: ३१.०३.२०२५ रोजी | ३१.०३.२०२४ रोजी |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| **१.स्थावर मालमत्ता, यंत्रसामुग्री आणि उपकरणे** | | | | | | | | | | | | | |
| जमीन | ३४८.३४ | ११.५५ | ०.०० | ०.०० | ०.०० | ३५९.८९ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३५९.८९ | ३४८.३४ |
| भाडेपट्टा जमीन | १७२.३६ | ०.०० | ०.०० | २.०७ | ०.०० | १७०.२९ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १७०.२९ | १७२.३६ |
| इमारती | ५६९२.५५ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ५६९२.५५ | ३६९४.६७ | ७७.२३ | ०.०० | ३३.३३ | ४०५४.५३ | १६३८.०२३२ | १९९७.८८ |
| यंत्रसामुग्री | ३५४४.८० | १४.२५ | २१.२१ | ०.०० | ०.०० | ३५८०.२६ | ३२००.९९ | २५.२८ | ५.०० | ५६.५४ | ३२६९.८२ | ३१०.४४ | ३४३.८० |
| विद्युतस्थापना | ६२४.८० | १३३.८० | ३५.६४ | ४.५९ | ०.०० | ७८९.६५ | ४७३.३५ | ३७.२७ | ४.३५ | १०.९६ | ५१७.२३ | २७२.३२ | १५१.४५ |
